


सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

धाराशिव | बुधवार, २४ डिसेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २९४ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



## विचारपुष्प



नि आळस आणि थकणे या दोन्ही गोष्टींशी मित्रता करू नये. निरीक्षण ही एक कला आहे. आपल्या अंगची क्षमता वाढविणे हेच तर जीवनामधले खरे शिक्षण. आपण जे बघतो त्यावर सर्वंकष विचार करण्याची सवय लावून घ्यावी, यातूनच तर आपला विकास घडतो. सूक्ष्म निरीक्षण क्षमता यातूनच जन्म घेते.

**भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

## विनम्र अभिवादन



साने गुरुजी यांची आज जयंती

# राज्यात नवा राजकीय पट

## उबाठा-मनसे युतीची आज घोषणा

◆ **मुंबई, २३ डिसेंबर**

नगरपरिषद आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये दारूण पराभव झाल्यानंतर महाविकास आघाडीतील पक्षांची उरलेसुरले राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी धडपड सुरू झाली आहे. यासाठी राजकीय शत्रुत्वाला मुठमाती देत मुंबई महानगरपालिकेसाठी उद्धव आणि राज एकत्र आले आहेत. उबाठा आणि मनसेसाठी प्रतिष्ठेची झालेली मुंबई मनपा निवडणूक एकत्र लढण्याचा निर्णय दोन्ही पक्षांनी घेतला आहे.





उबाठाचे पक्षप्रमुखउद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे बुधवारी युतीची घोषणा करणार आहेत, अशी माहिती उबाठाचे नेते खासदार संजय राऊत यांनी दिली. बुधवरी दुपारी १२ वाजता वरळीच्या हॉटेल ब्यूल सीमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले असून, यात दोघेही युतीबाबतची घोषणा करण्याची शक्यत वर्तविली जात आहे. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मिरा- भाईंदर, नाशिक, पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी मनसे आणि शिवसेना ठाकरे गटामध्ये युती होणार असे देखील खा. राऊत म्हणाले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

## पुण्यात काका-पुतणे येणार एकत्र

मुंबई जशी ठाकरेंसाठी प्रतिष्ठेची आहे तशीच स्थिती पुण्यात अजित पवार आणि शरद पवार यांच्यासाठी आहे. पुणे हातचे गमावणे म्हणजे दोघांसाठी मोठी राजकीय पिछेहाट ठरू शकते. स्वतंत्र लढल्यास पराभव पक्का असल्याची जाणीव झाल्याने काका-पुतणे शरद पवार आणि अजितदादा यांनी पुणे मनपा निवडणूक एकत्रपणे लढण्याचे ठरविले आहे. याबाबत येत्या शुक्रवारी घोषणा करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी सांगितले.



**शरद पवारांचे दोन्ही तबल्यांवर हात**

मनसे-उबाठा युतीत निवडणूक लढल्यास, ठाकरे बंधुंनी केवळ १० ते १२ जागा देण्याचा प्रस्ताव शरद पवारांसमोर ठेवला आहे. त्यामुळे शरद पवारांनी आपला पारंपारिक मित्र काँग्रेससोबत चर्चा करण्यास सुरुवात केली असून, मुंबई पालिकेची निवडणूक महाविकास आघाडीम्हणून लढविण्याच्या दृष्टीनेदेखील मनधरणीचे प्रयत्न चालविले आहेत. पवारांच्या काही नेतेमंडळींनी मंगळवारी काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड यांची भेट घेऊन चर्चा केली. ■

### काँग्रेस-वंचित चर्चा फिस्कटली

काँग्रेसने आपला जुना खेळ पुन्हा सुरू केला आहे. लोकांमध्ये जे बोलतात त्याविरुद्ध ते वागतात. आम्ही कोणाकडेही गेलो नाहीत. काँग्रेसचे लोकं आमच्याकडे आले. आणि पुन्हा आमच्यासोबत विधानसभेप्रमाणे खेळ खेळणे चालवले असल्याचा आरोप वंचित बहूजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकरांनी केला. आम्ही पूर्ण जागांवर उमेदवार उभे करू शकतो एवढी आमची ताकद दाखवू ,असा इशारादेखील त्यांनी दिला आहे. ■

### भेटी-गाठींना आला वेग

महापालिका निवडणुकीच्या रणसंग्रामाला सुरुवात झाली असून, नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाल्यानंतर आता विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या भेटीगाठींना वेग आला असल्याचे चित्र आहे. भाजपा-शिवसेना नेते एकमेकांच्या भेटी घेत आहेत, दुसरीकडे काँग्रेस, शरद पवार गट आणि वंचितचे नेते ऐकमेकांना भेटत आहेत. मंगळवारी काँग्रेस नेत्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन एकत्र लढण्यावर चर्चा केली. बुधवारी दोन्ही पक्षांचे नेते पुन्हा भेटणार आहेत. ■

## श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिने राहणार बंद



**पुणे** : बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असणारे श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर हे विकास आराखड्याअंतर्गत विविध विकासकामे करण्यासाठी तीन महिने भाविकांना दर्शनासाठी बंद करण्याबाततचा निर्णय घेण्यात आला आहे.

भीमाशंकर देवस्थान ट्रस्ट, स्थानिक ग्राम स्थांचे म्हणणे आणि बैठकीचा अहवाल प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना सादर केल्यानंतर मंदिर बंद करण्याबाबतचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांकडून काढणात येणार आहे. आंबेगाव-जुन्नरचे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाला स्थानिक ग्रामस्थांनी सहमती दर्शविली आहे. श्री क्षेत्र भीमाशंकर येथे देशभरातून लाखो भाविक, पर्यटक आणि निसर्गप्रेमी येत असतात. २०२७ मध्ये नाशिक येथे कुंभमेळा होत आहे. प्रयागराज येथे झालेला कुंभमेळा वाराणसी, अयोध्या, उज्जैन या तीर्थक्षेत्रांप्रमाणेच नाशिक येथे २०२७ रोजी होणार आहे. या कुंभमेळांच्या काळात भीमाशंकर आणि अन्य तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी गर्दी होते.

## निषेध बांगलादेशचा



बांगलादेशात हिंदूंवर सातत्याने होत असलेल्या अत्याचारांमुळे देश खवळून उठला आहे. युनूस सरकारविरोधात अनेक शहरांमध्ये आंदोलन करण्यात आले. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने मंगळवारी दिल्लीतील बांगलादेश उच्चायुक्तालयावर विशाल मोर्चा काढत निषेध व्यक्त केला

(वृत्त पान २ वर)




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

**नफा वसुलीमुळे बाजारात शांतता**

**मुंबई** : सलग दोन दिवसांच्या तेजीनंतर मंगळवारी भारतीय शेअर बाजारात शांतता पाहायला मिळाली. नफावसुली आणि निफ्टीच्या एक्सपायरीमुळे बाजारात दिवसभर चढ-उतार सुरू होते. सत्राअखेरीस निर्देशांक ४३ अंकांनी घसरला तर निफ्टी अवघ्या ४ अंकांनी वाढला. एकूणच बाजारातील वातावरण सुस्त दिसत असले तरी छोट्या शेअर्समधील खरेदीमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ३० हजार कोटी रुपयांची भर पडली. निर्देशांकातील सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ४७५.३२ लाख कोटींवरून ४७५.६२ लाख कोटींवर पोहोचले. बांधकाम क्षेत्रातील शेअर्सवर विक्रीचा दबाव दिसून आला. विशेषतः इन्फोसिस आणि टेक महिंद्रा या मोठ्या आयटी कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली.



**आयटीआर भरण्यासाठी एक आठवड्याची मुदत**


**नवी दिल्ली** : आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी विलंब शुल्कासह आयकर रिटर्न भरण्यासाठी फक्त सात दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. हे काम तुम्हाला ३१ डिसेंबरपूर्वी पूर्ण करायचे आहे. त्यानंतर तुम्ही रिटर्न फाइल करू शकणार नाही, ज्यामुळे नोटीस येण्यासोबतच दंड आणि इतर कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागू शकते. जर तुम्ही ५ लाखांपेक्षा कमी उत्पन्नाचा बिलेटेड (निश्चित तारखेनंतर) आयकर रिटर्न फाइल करत असाल, तर तुम्हाला १,००० रुपये विलंब शुल्क भरावे लागेल. तर, ५ लाख किंवा त्याहून अधिक उत्पन्नावर ५,००० रुपये विलंब शुल्क भरावे लागेल.

**गाझा ९.३ लाख कोटींमध्ये स्मार्ट सिटी बनणार**

**गाझा** : अमेरिकेने युद्धग्रस्त गाझाला पुन्हा उभे करण्यासाठी एक मोठी योजना सादर केली आहे. या योजनेअंतर्गत गाझाला सुमारे ९.३ लाख कोटी (११२ अब्ज डॉलर) खर्च करून एका आधुनिक स्मार्ट सिटीमध्ये रूपांतरित केले जाईल. यापैकी सुमारे ५ लाख कोटी (६० अब्ज डॉलर) अमेरिकन सरकार मदत करेल. या प्रकल्पात लक्झरी रिसॉर्ट्स, बीच हॉटेल्स आणि हाय-स्पीड ट्रेनसारख्या सुविधा निर्माण करण्याची चर्चा आहे. ही योजना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे जावई जॅरेड कुशनर आणि अमेरिकेचे विशेष प्रतिनिधी स्टीव्ह विटकॉफ यांनी तयार केली आहे. याला 'प्रोजेक्ट सनराईज' असे नाव देण्यात आले आहे.

### शेअर बाजार

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८५,५२४.८४ | (-४२.६४) |
| निफ्टी | २६,१७७.१५ | (+४.७५) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टँडर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३६,३०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. २,१०,९०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.१ | १३.६ |
| अमरावती | ३१.६ | ११.० |
| भंडारा | -.- | १०.० |
| बुलडाणा | ३०.२ | १४.० |
| चंद्रपूर | २९.८ | १२.५ |
| गडचिरोली | २९.० | १०.६ |
| गोंदिया | २७.२ | ९.० |
| नागपूर | २९.२ | ९.६ |
| वर्धा | ३०.० | १०.५ |
| वाशीम | ३१.० | ११.० |
| यवतमाळ | ३१.० | १०.५ |

# बांगलादेशविरुद्ध देशभरात संताप

## हिंदू संघटनांची निदर्शने, दिल्लीत बांगलादेशच्या दूतावासाला घेराव ● हिंदू तरुणाच्या निर्घृण हत्येचा निषेध

**नवी दिल्ली, २३ डिसेंबर**

बांगलादेशमध्ये कट्टरवाद्यांकडून हिंदू नागरिकांवर होणारे हल्ले आणि दीपू दास या हिंदू तरुणाला जिवंत जाळल्याच्या घटनेचे तीव्र पडसाद मंगळवारी देशभरात उमटले. विश्व हिंदू परिषद, हिंदू युवा वाहिनी आणि बजरंग दलच्या कार्यकर्त्यांनी देशभरातील प्रमुख शहरात रस्त्यावर उतरत निदर्शने केली. राजधानी दिल्लीत बांगलादेश दूतावासासमोर हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी देत कार्यालयाच्या परिसराला घेराव घातल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. यावेळी रॅपिड ॲक्शन फोर्स तैनात करण्यात आली होती.

पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवत निदर्शकांना थोपवून धरले, तर बॅरिकेट्स तोडून आत प्रवेश करणाऱ्या काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. बांगलादेशातील हिंदू नागरिकांवर अत्याचार करणाऱ्या कट्टरवाद्यांना कठोर शिक्षा आणि हिंदूंच्या सुरक्षेची मागणी करण्यासाठी दिल्ली, मुंबई, लखनौ, पाटणा, जयपूर, जम्मू, श्रीनगरसह देशभरातील विविध शहरात रस्त्यावर उतरत हिंदू संघटनांनी जोरदार निदर्शने केली. दिल्लीत विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि इतर हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी चाणक्यपुरी येथून निषेध मोर्चा काढला. हिंदू संघटनांचे कार्यकर्ते निदर्शन करीत बांगलादेश दूतावासाबाहेर पोहोचले. हिंदू तरुण दीपू दास याच्या हत्येसाठी जबाबदार असलेल्यांना कठोर शिक्षा देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. तणावाची परिस्थिती पोलिसांसह निमलष्करी दल तैनात करण्यात आले होते. बॅनर आणि पोस्टर घेऊन निदर्शकांनी घोषणाबाजी केली आणि बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षिततेची मागणी त्यांनी केली. बांगलादेश दूतावासाबाहेर लावलेले बॅरिकेट्स तोडल्यानंतर पोलिसांनी काही निदर्शकांना ताब्यात घेतले. देशातील विविध शहरातदेखील हिंदू संघटनांनी रास्ता रोको आंदोलन करीत हिंदू तरुणाच्या हत्येचा निषेध केला. ◀(वृत्तसंस्था)



बांगलादेशात हिंदू युवकाची जाळून हत्या केल्याची घटनेनंतर भारतात विविध शहरांमध्ये निषेध मोर्चे काढण्यात आले. कोलकाता येथील बांगलादेशच्या उपउच्चायुक्त कार्यालयावर मंगळवारी हिंदू जागरण संघटनेने मोर्चा काढला. पोलिसांनी रोखल्यानंतर घोषणाबाजी करताना युवती

### कट्टरवाद्यांचा उन्माद सुरूच, हिंदूंचे घर जाळले

बांगलादेशात कट्टरवाद्यांनी सोमवारी रात्री एका हिंदूंचे घर जाळले. यावेळी कुटुंबातील सदस्य पळून जाण्यात यशस्वी झाल्याने अनर्थ टळला. परंतु घराबाहेर असलेल्या पाळीव प्राण्यांचा होरपळून मृत्यू झाला. जाळपोळ करणाऱ्यांनी घटनास्थळाजवळ एक धमकीचा फलक देखील लावला होता. त्यात इस्लामविरोधी टिप्पणी केल्यास गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा दिला.

### बांगलादेशी क्रिकेटपटूंवर बंदी घाला

हिंदू युवा वाहिनीचे राष्ट्रीय अध्यक्ष विक्रम सिंह राठोड यांनी सांगितले की, बांगलादेशातील हिंदूंवरील हिंसाचार त्वरित थांबला पाहिजे. बांगलादेशी क्रिकेटपटूंवर आयपीएल आणि इतर कोणत्याही क्रीडा स्पर्धेत बंदी घालावी. भारत सरकारने शेजारील देशातील हिंदूंवरील हिंसाचार थांबवण्यासाठी धोरणांचा वापर करावा. हिंदू समुदायाची घरे लुटणे आणि महिला-मुलींना असभ्य वागणूक देणे मानवतेला काळीमा फासणारा प्रकार आहे.

### अमेरिका, रशियाची बांगलादेशला तंबी

हिंदूंच्या छळाची दखल घेत रशियाचे राजदूत अलेक्झांडर जी खोजीन यांनी भारतासोबतचे संबंध तत्काळ सुधारण्याची तंबी बांगलादेशला दिली. भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशांमधील तणाव वाढू देऊ नये अशा सूचना केल्या. दुसरीकडे अमेरिकेच्या दूतावासाने बांगलादेशातील हिंदूंच्या परिस्थितीवर चिंता व्यक्त करीत शांततेसाठी तातडीने पावले उचलण्याचे आवाहन केले.

### व्हिसा संबंधित प्रक्रिया स्थगित

भारताने चितगावमधील भारतीय दूतावासाच्या सेवा स्थगित करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मंगळवारी दिल्लीतील बांगलादेश दूतावासाने व्हिसा संबंधित प्रक्रिया स्थगित केली. दिल्लीतील आंदोलनाची दखल घेत बांगलादेशाच्या परराष्ट्र मंत्रालयाने बांगलादेशमधील भारतीय उच्चायुक्त प्रणय वर्मा यांना समन्स बजावत दूतावासाची सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या सूचना केल्या.

# किडनी रॅकेटच्या मुख्य सूत्रधाराला अटक

**आरोपी कृष्णाला चार दिवसांची पोलिस कोठडी ● पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांची माहिती**



पत्रपरिषदेत माहिती देताना पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, सोबत अप्पर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे

**चंद्रपूर, २३ डिसेंबर**

किडनी रॅकेट प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला चंद्रपूर पोलिसांनी रविवारी रात्री सोलापूर येथून अटक केली. कृष्णा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. डॉ. कृष्णा हे नाव धारण करून तो सोलापुरात वास्तव्यास होता. आरोपीला सोमवारी न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी मंगळवारी पत्रपरिषदेत दिली.

नागभीड तालुक्याच्या मिंथुर येथील शेतकरी रोशन कुळे हे खाजगी सावकाराच्या कर्जामुळे प्रचंड मानसिक तणावात होते. कर्ज फेडण्यासाठी कोणताही मार्ग उरला नसल्याने त्यांनी समाज माध्यमाचा आधार घेतला. फेसबुकवर किडनी विक्री संदर्भात शोध घेत असता, त्यांची भेट डॉ. कृष्णाशी झाली. आरोपीने रोशन यांच्या हतबलतेचा फायदा घेत किडनीच्या बदल्यात ८ लाख रुपये देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर विमानाचे तिकीट आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करून रोशन यांना कंबोडिया देशात नेण्यात आले. कंबोडियातील एका खाजगी रुग्णालयात रोशन कुळे यांची किडनी काढण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर त्यांना ठरलेली रक्कम देण्याऐवजी आरोपीने टाळाटाळ केली. केवळ नावापुरते काही पैसे देण्यात आले आणि त्यांना भारतात परत पाठवण्यात आले. भारतात परतल्यावर एका किडनीवर जगताना रोशन यांची प्रकृती खालावली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी धाडस करून पोलिसांत तक्रार दिली.

यामागे एक मोठे रॅकेट सक्रीय असून, या रॅकेटचे लक्ष कर्जबाजारी शेतकरी, बेरोजगार तरुण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोक असू शकतात. कृष्णा हा फेसबुक आणि टेलिग्राम ग्रुप्सचा वापर करून गरजूंचा शोध घ्यायचा. त्याने आतापर्यंत कुणाकुणाला कंबोडियाला पाठवले आणि या व्यवहारात कोणत्या मोठ्या डॉक्टरांचा किंवा रुग्णालयाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे, अशी माहिती मुमक्का सुदर्शन यांनी दिली. पत्रपरिषदेला अप्पर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे उपस्थित होते. ◀(तभा वृत्तसेवा)

**आरोपीनेही विकली होती स्वतःची किडनी**

आरोपी कृष्णा याने २०१५ मध्ये एक छोटी कंपनी सुरू केली होती. या व्यवसायात तो अपयशी ठरल्याने कर्जात बुडाला होता. आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी कृष्णाने कंबोडिया येथील रुग्णालयात आपली किडनी विकली होती. २०१८ पासून तो त्या रुग्णालयाच्या संपर्कात होता. आतापर्यंत १० ते १२ लोकांना किडनी काढण्यासाठी कंबोडियात नेल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली.

# सामान्य रुग्णालयातील बालरुग्ण विभागाला आग

**थोडक्यात जीवितहानी टळली, लाखोंचे नुकसान**

**वर्धा, २३ डिसेंबर**

जिल्हा सामान्य रुग्णालयातील बालरुग्ण विभागाला मंगळवारी दुपारी दीडच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे आग लागली. आग लागताच कर्मचाऱ्यांनी बाल रुग्ण विभागातील सर्व बालक व नातेवाईकांना तातडीने बाहेर काढल्याने थोडक्यात जीवितहानी टळली. मात्र, या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. आग लागताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळ गाठून पाण्याचा मारा केला आणि आग विझविली.

जिल्हा सामान्य रुग्णालयातील इमारत क्रमांक २ मध्ये तळमजल्यावर क्ष-किरण आणि सिटी स्कॅन विभाग, पहिल्या माळ्यावर स्त्री शल्य विभाग, तर दुसऱ्या माळ्यावर बालरुग्ण विभाग आहे. बाल रुग्ण विभागाला लागूनच रेकॉर्ड रूम आहे. बाल रुग्ण विभागात १० बालकांवर उपचार सुरू होते. यावेळी त्या विभागात रुग्णांसह ३० ते ३३ नातेवाईक हजर होते. दीडच्या सुमारास अचानक बाल रुग्ण विभागात शॉर्टसर्किटमुळे आग लागली. कर्मचाऱ्यांनी तातडीने रुग्ण व नातेवाईकांना बाहेर काढले. या विभागाच्या बाजूला असलेली रेकॉर्ड रूम जळून खाक झाली. तातडीने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने घटनास्थळ गाठून वीज पुरवठा बंद केला व पाण्याचा मारा करीत आग विझविली. या ठिकाणात सिलेंडर, औषधांचे बॉक्स होते. औषधांच्या बॉक्ससह इतर आवश्यक साहित्याची राखरांगोळी झाली.



बाल रुग्ण विभागात लागलेली आग. दुसऱ्या छायाचित्रात जळून खाक झालेले रेकॉर्ड रूम

**रुग्णालयातील अग्निशमन यंत्रणा कुचकामी**

आगीच्या घटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी सामान्य रुग्णालयात ९१ लाख रुपये खर्च करून अग्निशमन यंत्रणा बसविण्यात आली. रुग्णालय परिसरात उभारण्यात आलेल्या जलकुंभाला थेट पाईपलाईन जोडण्यात आली. ही यंत्रणा हाताळण्यासाठी काही कर्मचारी नियुक्त करण्यात आले. त्यांना प्रशिक्षणही देण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, आग लागली असताना ही अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित झाली नाही. पाईपमध्ये पाणी नसल्याची गंभीर बाब उजेडात आल्याने रुग्णालय प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

**दोषींना माफी नाही : बकाने**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता देवळीचे आ. राजेश बकाने आणि आरोग्य महासंचालक शंभरकर यांनी सायंकाळी सामान्य रुग्णालयाला भेट दिली. रुग्णालय प्रशासनाला फायर ऑडिट आणि इलेक्ट्रिक ऑडिट करण्याच्या सूचना केल्या. दोषी आढळल्यास कारवाई करण्याचे संकेत आ. बकाने यांनी दिले.

**मुंबई विमानतळावर ४८ कोटींचे मादक पदार्थ जप्त**

**मुंबई** : मुंबई विमानतळावर सीमा शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत ४८ कोटींचे मादक पदार्थ जप्त केले. या कारवाईत आठ तस्करांना अटक करण्यात आली. एका अधिकाऱ्याने सांगितले की, गोपनीय माहितीच्या आधारे बँकॉक आणि मस्कत येथून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी केली असता, शॅम्पूच्या बॉटलमध्ये ४८ किलो हायड्रोपोनिक आढळून आले. जप्त केलेल्या मादक पदार्थांची किंमत ४८ कोटी आहे. या प्रकरणात आठ आरोपींना अटक करण्यात आली.



शिखांचे दहावे गुरू गोविंदसिंह यांचे पुत्र बाबा फतेह सिंह आणि जोरावर सिंह यांचा हौतात्म्य दिन 'वीर बाल दिवस' म्हणून २६ डिसेंबरला साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त अमृतसरमध्ये निघालेल्या 'नगर कीर्तन' शीर्ष कवायती सादर करताना युवक

# काँग्रेसकडून ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर

## सपकाळ, वडेट्टीवार, नाना पटोले, वासनिक, यशोमती ठाकूर यांचा समावेश

**मुंबई, २३ डिसेंबर**

राज्यात होणाऱ्या महापालिका निवडणुकासाठी काँग्रेसने आज ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली. त्यात रमेश चेन्निथला, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, सचिन पायलट, अमित देशमुख, अझरुद्दीन, राज बब्बर अशा दिग्गज नेत्यांची नावे आहेत.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महापालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली. ही यादी १९ डिसेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना कळवण्यात आली. काँग्रेसच्या महापालिका निवडणुकीतील स्टार प्रचारकांच्या





यादीमध्ये छत्रपती शाहू महाराज, सतेज उर्फ बंटी पाटील, मुकुल वासनिक, रेवंत रेड्डी, पृथ्वीराज चव्हाण, सचिन पायलट बाळासाहेब थोरात यांचा समावेश आहे. माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझरुद्दीन, रजनी पाटील, माणिकराव ठाकरे, नाना पटोले, इम्रान प्रतापगढी, चंद्रकांत हंडोरे, आरिफ नसिम खान, राज बब्बर, यशोमती ठाकूर, प्रणिती शिंदे, अमिन पटेल यांचीही या यादीत नावे आहेत. ◀(वृत्तसंस्था)

**ऑनलाईन तभा वाचण्यासाठी epaper.dainiktarunbharat.com वर भेट द्या!**

# आधी भारतात या, मगच याचिकेवर सुनावणी

**फरार विजय मल्ल्याला हायकोर्टाचा झटका**

**मुंबई, २३ डिसेंबर**

देशात फरार घोषित करण्यात आलेले उद्योगपती विजय मल्ल्याला मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला. मुंबई उच्च न्यायालयाने मल्ल्याला स्पष्ट केले की तो न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात परत येईपर्यंत त्याच्या याचिकेवर सुनावणी केली जाणार नाही. उच्च न्यायालयाने मल्ल्याला तो भारतात कधी परत येईल, हे प्रतिज्ञापत्रात सांगण्याचे निर्देश दिले.

सुनावणीदरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंकर यांच्या खंडपीठाने म्हटले की, आम्ही असा आदेश दिला आहे की एफईओ कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर याचिकाकर्ता या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात स्वतःला सादर करेपर्यंत सुनावणी घेतली जाऊ नये. मल्ल्या यांनी आणखी एक याचिका दाखल केली आहे. विजय मल्ल्या यांनी त्यांना फरार घोषित करण्याच्या आदेशाविरुद्ध वैधानिक अपील दाखल केले आहे. न्यायालयाने हे अपील स्वीकारले, परंतु अद्याप त्यावर सुनावणी झालेली नाही. मल्ल्याच्या वतीने सांगण्यात आले की, त्यांचे आजवरचे सर्व कर्ज फिटले आहे. जिथे सहा हजार कोटींचे देणे होते तिथे मल्ल्यांची मालमत्ता विकून १४ हजार कोटींहून जास्त रक्कम उभी करण्यात आली आहे. त्यावर न्यायालयाने सांगितले की तुम्ही न्यायालयासमोर हजर न राहता सर्व प्रकरणे कसे काय निकालात काढणार? आधी भारतात यावेच लागेल. ◀(वृत्तसंस्था)

## संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मीक कराडसह

# सर्व आरोपींविरुद्ध आरोप निश्चित

**बीड, २३ डिसेंबर**

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंगळवारी बीड येथील मकोका न्यायालयात हायव्होल्टेज सुनावणी पार पडली. या सुनावणीत न्यायालयाने वाल्मीक कराडसह सर्व आरोपींवर अधिकृतपणे आरोप निश्चित केले आहेत. यावेळी मुख्य आरोपी वाल्मिक कराड याने पहिल्यांदाच मौन सोडून न्यायालयासमोर आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, न्यायालयाने पुढील कारवाई सुरू ठेवली.

न्यायाधीशांनी १८०० पानांच्या दोषारोपपत्रातील संपूर्ण घटनाक्रम आरोपींना वाचून दाखवला. तुम्हाला हे आरोप मान्य आहेत का? असा थेट प्रश्न जेव्हा विचारला गेला, तेव्हा वाल्मिक कराडसह सर्व सहा आरोपींनी 'मान्य नाहीत' असे उत्तर दिले. यावेळी कराड स्वतःहून म्हणाला, मला काही बोलायचे आहे.



मात्र, कायद्याच्या प्रक्रियेनुसार आता प्रत्यक्ष साक्षीदार आणि पुराव्यांचे काम सुरू होणार आहे.

**खंडणीचा अडथळा आणि क्रूर हत्येचा व्हिडिओ**

विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी न्यायालयात पुन्हा एकदा ठामपणे सांगितले की, आवादा कंपनीकडून मिळणाऱ्या खंडणीच्या व्यवहारात संतोष देशमुख हे अडथळा ठरत होते. याच रागातून आरोपींनी त्यांना टाकळी शिवारात नेऊन अमानुष मारहाण केली. आरोपींनी केवळ हत्या केली नाही, तर त्याचे १५ व्हिडीओ आणि ८ फोटो काढून त्या क्रूरतेचा आनंद साजरा केला. हे व्हिडीओ आता आरोपींच्या वकिलांना देण्यात आले असून, हेच व्हिडीओ या खटल्यातील सर्वात मोठा पुरावा ठरणार आहेत.

**पुढील सुनावणी ८ जानेवारीस**

आजच्या सुनावणीनंतर उज्ज्वल निकम यांनी आरोपींच्या वकिलांवर खटला लांबवणे आणि दिशाभूल करणे, असा गंभीर आरोप केला. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ जानेवारीला होणार असून, लवकरच प्रत्यक्ष साक्षीदारांची उलटतपासणी सुरू होईल. ◀(वृत्तसंस्था)

# राममंदिराला भक्ताची ३० कोटींची भेट

**सोने-चांदी-हिऱ्यांनी जडलेली मूर्ती केली अर्पण**

**अयोध्या, २३ डिसेंबर**

अयोध्येतील रामलला मंदिराच्या परिसरात लवकरच एक अत्यंत भव्य आणि मौल्यवान मूर्ती स्थापित केली जाणार आहे. सोन्यासारखी चमक असलेल्या या मूर्तीमध्ये हिरे, पाचू आणि अनेक रत्ने जडवलेली आहेत. कर्नाटकातील एका अज्ञात भक्ताने ती दान केली आहे. मंगळवारी सायंकाळी ही मूर्ती कर्नाटकातून अयोध्येत आणण्यात आली. मूर्ती १० फूट उंच आणि ८ फूट रुंद आहे. अंदाजित किंमत २५ ते ३० कोटी रुपये आहे. तिची घडवणूक दक्षिण भारतातील शिल्पकलेनुसार करण्यात आली आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सदस्य डॉ. अनिल मिश्र यांनी सांगितले की, ही मूर्ती कोणी पाठवली आहे, हे अद्याप समजू शकलेले नाही. तिचे वजन केले जात आहे. तथापि, ही मूर्ती ५ क्विंटल वजनाची असेल असा अंदाज आहे. लवकरच संपूर्ण माहिती दिली जाईल. ही मूर्ती संत तुलसीदास मंदिराशेजारील अंगद टीला येथे स्थापित करण्याचा विचार सुरू आहे. स्थापनेपूर्वी तिचे अनावरण केले जाईल. अनावरणानंतर प्राणप्रतिष्ठा सोहळा होईल, ज्यामध्ये देशभरातील संत आणि महंतांना बोलावले जाईल. ही प्रतिमा रामजन्मभूमीत प्रतिष्ठापित रामलला मूर्तीची हुबेहूब प्रतिकृती आहे. यात सोन्यासोबतच हिरा, पन्ना, नीलम यांसारख्या मौल्यवान रत्नांचा वापर केला आहे, ज्यामुळे तिची भव्यता आणि आध्यात्मिक प्रतिष्ठा आणखी वाढली आहे. ◀(वृत्तसंस्था)





**विशेष व्हॅनमधून सहा दिवसांचा प्रवास**

कर्नाटकातून अयोध्येत अंतर १,७५० किमी आहे. मूर्ती विशेष व्हॅनमधून आणण्यात आली. मंगळवारी सायंकाळी ३:३० वाजता मूर्ती राम मंदिर परिसरात आणण्यात आली. ती अयोध्येत आणण्यासाठी ६ दिवस लागले. सूत्रांनुसार, ही मूर्ती कर्नाटकातील काही भाविकांनी एकत्रितपणे तयार करून घेतली आहे. या मूर्तीच्या निर्मितीमध्ये तंजावर येथील कुशल आणि अनुभवी कारागिरांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे, ज्यांनी तिला अत्यंत कलात्मक आणि आकर्षक स्वरूप दिले आहे. मूर्ती रत्न आणि सोन्याने जडलेली आहे. धातूचा प्रकार अद्याप समजू शकलेला नाही.

# पठाणकोटमध्ये हल्ल्याचा कट

## ‘लष्कर’च्या दहशतवाद्याला अटक ● नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला हादरविण्याची योजना

**◆ पठाणकोट, २३ डिसेंबर**

पाकिस्तानी दहशतवादी पठाणकोटमध्ये दहशतवादी हल्ल्याचा कट रचत असल्याची माहिती पंजाब पोलिसांनी नुकत्याच अटक केलेल्या दहशतवाद्याच्या चौकशीतून समोर आले आहे. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला पाकिस्तानी दहशतवादी पठाणकोट येथील वायुतळ आणि इतर लष्करी तळावर हल्ला करण्याच्या तयारीत असून, त्यांना मदत करण्यासाठी सीमावर्ती भागात त्यांचे स्लीपर सेल सक्रिय झाले असल्याचे तपासात उघड झाले.

पोलिस अधीक्षक दलजिंदर सिंग यांनी सांगितले की, गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, पंजाब पोलिसांनी गंडला लहरी भागातून लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी बिल्लू गुज्जरला अटक केली. त्याचा साथीदार नजाकत हुसैन पसार झाला असून, त्याचा शोध सुरू आहे. अटकेतील दहशतवाद्याने चौकशीत सांगितले की, पाकिस्तानमधील दहशतवादी संघटना पुन्हा एकदा पठाणकोटमध्ये मोठ्या हल्ल्याचा कट आखत आहे. जम्मू-काश्मीर आणि पठाणकोटमध्ये घुसखोरी करण्याची त्यांनी योजना आखली आहेत. त्यांना मदत करण्यासाठी सीमावर्ती भागात स्लीपर सेल सक्रिय झाले आहे. पाकिस्तानातील रहिवासी लष्कर ए तोयबाचा दहशतवादी मुझफ्फर अहमद हा या कटाचा सूत्रधार आहे. पठाणकोट वायुतळ, रेल्वे स्थानक, लष्करी तळावर त्यांनी २५ ते ३१ डिसेंबरदरम्यान हल्ल्याची योजना आखली आहे. दहशतवाद्यांनी संपर्कासाठी व्हर्च्युअल नंबरचा वापर केला आहे, ज्यामुळे त्यांची ओळख पटवणे कठीण झाले आहे. पठाणकोट जिल्ह्यातील दमतल, धांगू, भदरोया आणि मिलवान यासारख्या संवेदनशील भागात सुरक्षा वाढवत पोलिस, सैन्य आणि विशेष कमांडो तैनात करण्यात आले आहेत.



काश्मीर खोऱ्यातील अनंतनाग जिल्ह्यात सैला गावात शोधमोहिमेवर असलेले जवान

### श्रीनगर ते जम्मूपर्यंत सुरक्षा दलाची मोहीम

पंजाब पोलिसांनी अटक केलेल्या दहशतवाद्याकडून मिळालेली माहिती आणि गुप्तचर संस्थांच्या इशाऱ्यानंतर लष्कर, बीएसएफ आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्त शोधमोहीम सुरू केली आहे. ही शोधमोहीम सीमावर्ती भागातील ८० हून अधिक गावांमध्ये राबवली जात आहे.

दोन दहशतवादी एका घरातून अन्न घेऊन जवळच्या माजलता जंगलात पळून गेल्याची माहिती समोर आल्यानंतर सुरक्षा दलाने शोधमोहिम तीव्र केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### शोधमोहीम या भागात सुरू

- जम्मू, सांबा, कठुआ आणि राजौरीसारख्या संवेदनशील सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये जवान घरोघरी जाऊन शोध घेत आहेत.
- सांबा येथील बाबर नाला, पालोरा, त्रेयाल, मनसर आणि चिल्ला डांगा यांसारख्या भागांमध्ये दहशतवादी आणि स्लीपर सेलच्या सदस्यांना पकडण्यासाठी शोध सुरू आहे
- अखनूर सेक्टरमधील प्रगवाल आणि आसपासच्या गावांमध्येही सुरक्षा दलांनी शोध मोहीम तीव्र केली आहे
- जम्मू जिल्ह्यातील पंसर, मनियारी, पहाडपूर, तप्पन, मरीड, तरनाह नाला, बैन नाला आणि किशनपूर कांडीसह अनेक गावांमध्ये घरोघरी दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे.
- स्फोटके, शस्त्रे आणि दारूगोळा शोधण्यासाठी स्निफर डॉग आणि मेटल डिटेक्टर तैनात करण्यात आले ■

# युनोत उमटले बांगलादेशातील हिंसाचाराचे पडसाद

### हिंदू तरुणाच्या हत्येचा निषेध

**◆ न्यूयॉर्क, २३ डिसेंबर**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी बांगलादेशात एका हिंदू व्यक्तीच्या हत्येचा निषेध करत हिंसाचाराच्या इतर घटनांबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

बांगलादेशातील अल्पसंख्याकांवर झालेल्या हल्ल्यांबद्दल, विशेषतः हिंदूंच्या अलिकडच्या लिंचिंगबद्दल महासचिवांच्या प्रतिसादाबद्दल विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले, बांगलादेश असो किंवा इतर कोणत्याही देशात, अल्पसंख्याक लोकांना आणि सर्व बांगलादेशींना सुरक्षित वाटण्याची गरज आहे. आम्हाला विश्वास आहे की सरकार प्रत्येक बांगलादेशी व्यक्तीची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल. गेल्या आठवड्यात, बालुका येथे जमावाने दीपू दासला ईशनिंदेचा आरोप केल्यानंतर त्याला मारहाण करून ठार मारले आणि त्याचे शरीर जाळले. दास यांच्या हत्येप्रकरणी रविवारी आणखी दोघांना अटक करण्यात आली.

डेली स्टार वृत्तपत्राने पोलिस आणि रॅपिड ॲक्शन बटालियनच्या सूत्रांचा हवाला देत वृत्त दिले आहे की, या अटकेसह, हत्येत सहभागी असल्याच्या आरोपाखाली आतापर्यंत १२ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

गुटेरेस यांनी शांतता राखण्याचे आणि सर्वांनी हिंसाचारापासून दूर राहण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, बदलामुळे केवळ फूट वाढेल आणि सर्वांचे हक्क कमकुवत होतील. मी अधिकाऱ्यांना हादीच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या हल्ल्याची त्वरित, निष्पक्ष, सखोल आणि पारदर्शक चौकशी करण्याचे आणि जबाबदार असलेल्यांवर योग्य प्रक्रिया आणि जबाबदारी सुनिश्चित करण्याचे आवाहन करतो, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)




पुणे येथील प्राध्यापक आणि खगोलशास्त्रज्ञ सुहृद श्रीकांत मोरे यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मंगळवारी विज्ञान युवा शांतीस्वरूप भटनागर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

# २०२६ मध्ये बदलणार राज्यसभेचे गणित

## ७५ जागांवर होणार निवडणूक

**◆ नवी दिल्ली, २३ डिसेंबर**

२०२६ हे वर्ष राज्यसभेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. या वर्षात राज्यसभेच्या तब्बल ७५ जागा रिक्त होणार असून एप्रिल, जून आणि नोव्हेंबर या टप्प्यांत त्या जागांसाठी निवडणुका होतील. याच काळात पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि आसाममध्ये विधानसभा निवडणुका होणार असल्याने देशाचे राजकीय वातावरण तापणार आहे.



या निवडणुकांनंतर राज्यसभेत एनडीए आणि इंडिया आघाडी यांच्यातील ताकदीचे गणित बदलू शकते. बिहारमधून पाच तर उत्तरप्रदेशातून दहा राज्यसभा सदस्यांचा कार्यकाळ संपणार आहे. याशिवाय महाराष्ट्र, झारखंड, आंध्रप्रदेश, तेलंगणा, पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि ईशान्येकडील अनेक राज्यांमधील जागाही रिक्त होतील.

सध्या राज्यसभेत एनडीएचे १२९ खासदार आहेत, तर विरोधी पक्षांकडे केवळ ७८ आहेत. २०२६ मधील निवडणुकांमध्ये एनडीएचे वर्चस्व आणखी वाढेल की कमी होईल, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. विधानसभा निवडणुकांचे निकाल, पक्षांच्या आघाडीची गणितं आणि उमेदवारांची निवड, या सगळ्यांचा मिळून राज्यसभेच्या भविष्यातील राजकारणावर निर्णायक प्रभाव पडणार आहे.

### दिग्गजांचा कार्यकाळ संपण्याच्या मार्गावर

२०२६ मधील राज्यसभा निवडणुका केवळ आकड्यांचा खेळ नाहीत, तर संसदेत पुढील कायदेविषयक अजेंड्याची दिशा यावरून ठरणार आहेत. या वर्षात ज्यांचा कार्यकाळ संपतोय, त्यात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी पंतप्रधान एच. डी. देवगौडा, दिग्विजय सिंह, शरद पवार यांच्यासह केंद्रीय मंत्री हरदीपसिंह पुरी आणि रामदास आठवले यांचा समावेश आहे. यातील किती जण पुन्हा सभागृहात परतणार आणि किती नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार, हे अद्याप स्पष्ट नाही. ◂(वृत्तसंस्था)

### बिहार ते महाराष्ट्र: निवडणुकांचा प्रभाव

एप्रिल ते जून या काळात बिहारमधील पाचही राज्यसभा जागा रिक्त होतील. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांत एनडीएला मिळालेल्या यशामुळे बिहारमध्ये भाजप आणि जेडीयू प्रत्येकी दोन जागांवर दावा सांगू शकतात, अशी शक्यता वर्तवली जाते. काही जुन्या नेत्यांचे पुनरागमनही यामुळे शक्य आहे. महाराष्ट्रात एप्रिलमध्ये सात राज्यसभा जागांसाठी निवडणूक होऊ शकते. ■

# कार्ती चिदम्बरमच्या अडचणीत वाढ

**◆ नवी दिल्ली, २३ डिसेंबर**

दिल्ली न्यायालयाने चिनी व्हिसा घोटाळ्याशी संबंधित सीबीआय प्रकरणात काँग्रेस खासदार कार्ती पी. चिदंबरम आणि इतरांविरुद्ध आरोप निश्चित करण्याचे आदेश दिले आहेत. हे प्रकरण २०११ शी संबंधित आहे, जेव्हा कार्तीचे वडील पी. चिदंबरम गृह मंत्रालयाचे मंत्री होते.

पंजाबमधील तलवंडी साबो पॉवर लिमिटेड नावाच्या कंपनीच्या अंतर्गत २०११ मध्ये एक ऊर्जा प्रकल्प सुरू होता, ज्यात चिनी कर्मचारी काम करत होते. या लोकांसाठी विशेष प्रकल्प व्हिसा जारी करण्यात आले होते. कार्ती चिदंबरम यांच्यावर आरोप आहे की, त्यांनी चिनी नागरिकांना भारतात काम करण्यासाठी व्हिसा मिळवून देण्यात अवैध मार्गाने मदत करण्याच्या बदल्यात लाच घेतली आणि यासंबंधीच्या नियमांमध्ये अनियमितता घडवून आणली. ◂(वृत्तसंस्था)

# अरुणाचल प्रदेशात हेरगिरीचा भंडाफोड

**◆ इटानगर, २३ डिसेंबर**

सुरक्षा संबंधित एका मोठ्या प्रकरणात, अरुणाचल प्रदेश पोलिसांनी हेरगिरी टोळीचा भंडाफोड करीत जम्मू-काश्मीरचे रहिवासी असलेल्या दोघांना अटक करण्यात आली. अरुणाचल प्रदेशच्या संवेदनशील भागातून महत्त्वाची माहिती गोळा करून ती पाकिस्तानातील त्यांच्या हँडलरला पाठवल्याचे आरोपींनी चौकशीत कबूल केले. अटक केलेल्या आरोपींची नावे ऐजाज अहमद भट आणि बशीर अहमद गनई अशी आहे.

पोलिस महानिरीक्षक चुकू आपा यांनी सांगितले की, जम्मू-काश्मीरच्या कुपवाडा येथील दोन आरोपी अरुणाचल प्रदेशच्या संवेदनशील भागात फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्यांना चांगलांग जिल्ह्यातील मियाओ येथून पकडण्यात आले. संवेदनशील भागातून महत्त्वाची माहिती गोळा करून ती पाकिस्तानातील त्यांच्या हँडलरला पाठवल्याचे आरोपींनी कबूल केले. त्यानंतर इटानगर येथून नझीर अहमद मलिक, साबीर अहमद मीर आणि आलो शहरातून कापड व्यापारी हिलाल अहमद यांना अटक करण्यात आली. सर्व आरोपी पाकिस्तानसाठी हेरगिरी करायचे. आरोपी प्रामुख्याने ब्लँकेट विकायचे. या व्यवसायाच्या नावाखाली ते राज्याच्या विविध भागात फिरत असत आणि सुरक्षा आणि इतर धोरणात्मक महत्त्वाची संवेदनशील माहिती गोळा करायचे. येत्या काही दिवसांत आणखी काही लोकांची अटक होण्याची शक्यता आहे. ते पाकिस्तानमध्ये कोणाच्या संपर्कात होते आणि आतापर्यंत किती माहिती त्यांनी पाकिस्तानला पाठवली याचा तपास सुरू आहे. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### माधुरीला मिळाला होता नाक बदलण्याचा सल्ला



**मुंबई :** हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात देखणी अभिनेत्री कोण, असे विचारले तर आजही अनेकांच्या तोंडी मधुबालानंतर माधुरी दीक्षितचेच नाव येईल. आजही माधुरी अनेकांची आवडती अभिनेत्री आहे. असे असूनही सुरुवातीच्या काळात माधुरीला तिच्या शरीरयष्टीवरून, चेहऱ्याच्या ठेवणीवरून बरेच काही ऐकावे लागले होते. याविषयी माधुरीने सांगितले की, जेव्हा मी सुरुवात केली तेव्हा अनेक लोक मला म्हणायचे, तुझे शरीर असे आहे, तुझे नाक असे आहे, तू अमूक कर...वगैरे. मी अशा टीकेमुळे अस्वस्थ व्हायची तेव्हा आईकडे जायची. आई म्हणायची, काळजी करू नकोस. एकदा का तुझा चित्रपट यशस्वी झाला की लोक तुझ्या याच गोष्टीचे कौतुक करतील. पुढे काही वर्षातच आईचे म्हणणे खरे झाले. ‘तेजाब’ सुपरहीट झाल्यापासून आजतगायत कोणीही मला कोणत्याही बाबतीत काही बोललेले नाही. लोकांनी मी जशी आहे तसे मला स्वीकारले. आजच्या अभिनेत्रींनीही अमूक असे दिसण्याचा अट्टहास करू नये. आपल्यातील वेगळेपण ओळखून ते जपण्याचा प्रयत्न करा. ■




नितीन नबीन यांची भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांचे मंगळवारी पाटण्यात आगमन झाले. स्वागतानंतर भव्य ‘रोड शो’ चे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी भाजपचा एक कार्यकर्ता घोड्यावर स्वार होत सहभागी झाला

# ९ दिवसांनी लागू होणार आठवा वेतन आयोग

**नवी दिल्ली :** ७ व्या वेतन आयोगाची मुदत ३१ डिसेंबर २०२५ या दिवशी औपचारिकपणे संपणार आहे. यामुळे ८ व्या वेतन आयोगाबाबत अपेक्षा वाढल्या आहेत. ऑक्टोबर २०२५ मध्ये, केंद्र सरकारने ८ व्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मान्यता दिली. वेतन, भत्ते आणि पेन्शनबाबतच्या शिफारसी सरकारला सादर करण्यासाठी आयोगाला नोव्हेंबर २०२५ पासून अंदाजे १८ महिने देण्यात आले आहेत.

सरकारी पद्धतीनुसार, १ जानेवारी २०२६ ही नवीन वेतन रचनेची कागदी प्रभावी तारीख मानली जाऊ शकते. याचा अर्थ असा नाही की, कर्मचाऱ्यांच्या पगारांना त्या तारखेपासून वाढीव वेतन मिळण्यास सुरुवात होईल. प्रभावी तारीख आणि प्रत्यक्ष देयकामध्ये अनेकदा मोठा फरक असतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ◂(वृत्तसंस्था)

### कमाईच्या बाबतीतही ‘धुरंधर’



**मुंबई :** ‘धुरंधर’ चित्रपट बॉक्स ऑफिसवर सातत्याने मोठे विक्रम मोडत आहे. प्रदर्शनाच्या १८व्या दिवशी चित्रपटाचे एकूण वर्ल्डवाइड कलेक्शन ८७७ कोटी झाले आहे. यासोबतच ‘धुरंधर’ या वर्षातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बनला आहे. आतापर्यंत हा विक्रम ऋषभ शेट्टीच्या कन्नड चित्रपट कांतारा: द लीजेंड-चॅप्टर १ कडे होता, ज्याचे एकूण कलेक्शन ८५० कोटी रुपये आहे. मात्र, भारतीय सिनेमाच्या इतिहासात कमाईच्या बाबतीत हा चित्रपट ११व्या क्रमांकावर आहे. भारतात चित्रपटाचे एकूण कलेक्शन ५९८ कोटी झाले. ‘धुरंधर’ चित्रपट प्रदर्शनानंतर अवघ्या १८ दिवसांतच स्त्री २, सीक्रेट सुपरस्टार, सुलतान, छावा यांसारख्या चित्रपटांना मागे टाकत सर्वाधिक कमाई करणारा सहावा हिंदी चित्रपट बनला आहे. ■

# भाजपचा माजी मंत्री काँग्रेस नेत्याच्या प्रेमात

### आर्य समाज पद्धतीने केला विवाह

**◆ भोपाळ, २३ डिसेंबर**

राजकारणापायी एकमेकांची डोकी फोडणाऱ्यांच्या डोक्यात प्रकाश पाडणारी घटना मध्यप्रदेशात घडली आहे. मध्यप्रदेशचे माजी मंत्री दीपक जोशी यांनी काँग्रेस नेत्या पल्लवी सक्सेना यांच्याशी लग्नगाठ बांधली आहे. दीपक जोशी हे मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कैलाश जोशी यांचे सुपुत्र आहेत. त्यांनी पल्लवी यांच्यासोबत अत्यंत खाजगी कार्यक्रमात आर्य समाजाच्या पद्धतीने लग्न केले.

या विवाह सोहळ्याचे फोटो सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहेत. आधी हे फोटो पल्लवी यांनी आपल्या सोशल मीडियावर शेअर केले होते. नंतर मात्र त्यांनी हे फोटो डिलीट केले. या फोटोवर काँग्रेस नेते विजेंद्र शुक्ला यांनी देखील प्रतिक्रिया दिली होती.



दीपक जोशी यांची पहिली पत्नी विजया जोशी यांचा २०२१ मध्ये कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत मृत्यू झाला होता. दीपक जोशी यांच्यावर दोन महिलांशी संबंध असल्याचे देखील वैयक्तिक आरोप झाले होते. राजकारणाच्या बाबतीत बोलायचं झालं तर ते मध्य प्रदेशचे शालेय शिक्षण मंत्री राहिले आहेत. मात्र, ते २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले. त्यानंतर त्यांनी २०२३ मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मात्र पुन्हा पराभव झाल्यानंतर त्यांनी भाजपामध्ये घरवापसी केली.

दीपक जोशी यांचे वडील कैलाश जोशी हे मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री राहिले आहेत. एवढा मोठा राजकीय वारसा असूनही दीपक जोशी यांची वैयक्तिक आणि राजकीय आयुष्य हे वादग्रस्त राहिलं आहे. दरम्यान, दीपक जोशी यांच्याबद्दल दोन महिलांनी देखील लग्नाचे दावे केले होते. शिखा यांनी २०१६ ला लग्नाचा दावा केला होता. तर दीपक यांची पहिली पत्नी विजया यांचे २०२१ मध्ये निधन झाले होते. शिखा यांचे पती गौतम हे २०१८ - १९ पर्यंत एकत्र होते. ◂(वृत्तसंस्था)

### पहिली पत्नी फरार

नम्रता यांच्यासोबत दीपक जोशी यांचे घटस्फोट प्रकरण सध्या कोर्टात आहे. दीपक जोशींची नवविवाहित पत्नी पल्लवी यांनी नम्रता ही फरार असल्यानं तिच्याविरूद्ध आयटी ॲक्ट अंतर्गत वॉरंट जारी असल्याचे सांगितलले पल्लवी यांनी भावूक होत सांगितलं की हे फक्त लग्नाचे नाते नाही तर आम्ही एकमेकांचा आधार आहोत. पल्लवी गेल्या १७ वर्षापासून घटस्फोटाच्या वेदना झेलत आहेत. त्यांना पॅरेलेसिसचा अटॅक देखील आला होता. त्यामुळे त्या डिप्रेशनमध्ये गेल्या होत्या. दीपक जोशी यांनी त्यांना मानसिक आधार दिला अन् बळ दिले. ■

# स्वेच्छेने देशाबाहेर जाणाऱ्यांना अमेरिका देणार बक्षीस

## मोफत हवाई तिकिटेही देण्याचे प्रलोभन

**◆ वॉशिंग्टन, २३ डिसेंबर**

बेकायदेशीर स्थलांतरितांवर कारवाई करणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने आता स्वेच्छेने देश सोडणाऱ्यांना एक ऑफर दिली आहे. अमेरिकेतील गृह सुरक्षा विभागाने जाहीर केले आहे की अमेरिकेत राहणाऱ्या कागदपत्र नसलेल्या परदेशी नागरिकांना स्वेच्छेने देश सोडल्यास तीन हजार डॉलर्स आणि त्यांच्या मायदेशी जाण्यासाठी मोफत हवाई तिकिट मिळेल.

आदेशात असेही म्हटले आहे की देश सोडण्यात अयशस्वी झाल्याबद्दल लावण्यात आलेला कोणताही दंड माफ केला जाईल. गृह सुरक्षा सचिव क्रिस्टी नोएम यांनी सांगितले की पूर्वी, स्वेच्छेने देशांतर करण्याचा निर्णय घेणाऱ्यांना १,००० डॉलर्स दिले जात होते. पण, ही रक्कम तिप्पट करण्यात आली आहे. सुट्टीच्या काळात अमेरिका सोडणाऱ्यांना सूट देण्यात आली आहे, असेही त्यांनी सांगितले. जानेवारी २०२५ पासून, १.९ दशलक्ष लोकांनी स्वेच्छेने अमेरिका सोडली आहे हे लक्षात घेतले पाहिजे. दरम्यान, ख्रिसमसच्या काळात स्व-निर्वासनासाठी मिळणारा स्टायपेंड तिप्पट करण्यात आला आहे. तथापि, ही ऑफर मर्यादित काळासाठी आहे. त्यांनी असेही म्हटले आहे की जे स्व-निर्वासनाचा पर्याय निवडणार नाहीत त्यांना पकडल्यास जबरदस्तीने त्यांच्या मायदेशी परत पाठवले जाईल. ◂(वृत्तसंस्था)

### रणवीरसिंहने सोडला ‘डॉन ३’



**मुंबई :** सध्या संपूर्ण देशात ‘धुरंधर’ चित्रपटाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. या चित्रपटाने २० दिवसही पूर्ण झाले नसताना साडेपाचशे कोटींहून अधिकचा गल्ला जमवला आहे. यात रणवीरसिंह मुख्य भूमिकेत असून त्याच्या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे. ‘धुरंधर’नंतर त्याच्या आगामी ‘डॉन ३’विषयी सर्वांना उत्सुकता होती. मात्र, रणवीरने ‘डॉन ३’ सोडत चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. ‘धुरंधर’च्या यशानंतर आता रणवीरला त्याच धाटणीची भूमिका नको होती. त्यामुळे त्याने ‘डॉन ३’ सोडण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. सध्या तो ‘प्रलय’च्या तयारीत आहे. आता रणवीरच्या जागी ‘डॉन ३’ मध्ये फरहान अख्तर कोणाला घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ■

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# नगराध्यक्ष महोदयांनो...

सोलापूर जिल्ह्यातल्या मोहोळ नगर परिषदेच्या अध्यक्षपदी अवघ्या २२ वर्षांची सिद्धी वस्त्रे ही युवती निवडून आली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजाच्या नगराध्यक्षपदी फक्त २१ वर्षांचा सौरभ तायडे हा तरुण निवडून आलेला आहे. या दोघांचेही पक्ष वेगवेगळे. विचार वेगवेगळे. कौटुंबिक पृष्ठभूमी वेगवेगळी. महाराष्ट्रात २८८ नगर परिषदा आणि नगर पंचायतींमध्ये असे अनेक तरुण-तरुणी निवडून आले आहेत. त्यात काही प्रौढ मंडळीही आहेत. पुरुष आहेत, तशा महिलाही आहेत. हे नगराध्यक्ष वेगवेगळ्या पक्षांचे, पृष्ठभूमीचे आहेत. निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी यातील प्रत्येकाने आपापल्या नेत्याकडे फिल्डिंग लावली असणार. कुणाचा तरी पाठिंबा घेतला असणार, पैसा खर्च केला असणार, कष्टही केले असणार. आता निवडणूक संपली आहे. निवडणूक संपल्यावर राजकारण संपायला हवे. आता पुन्हा राजकारण करायचे ते निवडणुकीच्या वेळी, अशी खूणगाठ बांधून नव्या नगराध्यक्षांनी कामाला लागले पाहिजे, अशी जनतेची अपेक्षा आहे.

महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निकालाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या राजकारणातील पिढीत बदल होत असल्याचा स्पष्ट संकेत मिळाला आहे. महाराष्ट्रातील नगरपालिका आणि नगरपंचायतींमध्ये निवडून आलेल्या २८८ नगराध्यक्षांपैकी अर्ध्याहून अधिक मंडळी तरुण आहेत. काही राजकारणासाठी अगदी नवखे आहेत, काहींना घराण्याची पृष्ठभूमी आहे. काही पूर्णपणे स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहिलेले आहेत. पण या सर्वांमध्ये एक गोष्ट समान आहे आणि ती अशी की, लोकांनी या साऱ्यांना थेट निवडून दिले आहे. याचा अर्थ असा की, ते नगरसेवकांचे बहुमत वगैरे कल्पनेच्या पल्याड मतदारांच्या आवडीचे ठरले आहेत. अशी संधी राजकारणात फार कमी लोकांना मिळते. मात्र, अशा संधी ज्याप्रमाणे अनेकांचे भविष्य घडवितात, तशा त्या अनेकानेक अपेक्षाही व्यक्त करतात. त्या अपेक्षा समजून घेऊन या नव्या नगराध्यक्षांनी आता आपापल्या नगरांसाठी झोकून दिले पाहिजे. नवनिर्वाचित नगराध्यक्ष महोदयांनी लक्षात घेण्यासारखी सर्वांत महत्त्वाची बाब अशी की, निकाल लागल्यानंतर नगराध्यक्ष हा कुठल्याही पक्षाचा राहत नाही; तो साऱ्या नगराचा होतो. प्रत्येक नागरिकाचा त्याच्यावर अधिकार असतो. रस्ता खराब झाला तर एका पक्षाचा विषय नसतो. नळाला पाणी नसेल तर तो दुसऱ्या पक्षाचा प्रश्न नसतो. दवाखान्यात औषध नसेल तर ती अमक्या पक्षाची चूक नसते. ते सारे नगराचे असते आणि नगराचा अध्यक्ष किंवा पालक म्हणून नगराध्यक्षांची जबाबदारी सर्वांत मोठी असते. नगरपालिका आणि नगरपंचायतींचा परिसर हा ना पूर्णपणे शहरी असतो, ना पारंपरिक गावासारखा. तो निमशहरी असतो आणि म्हणूनच तिथल्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या असतात. शेतीवर अवलंबून असलेली लोकसंख्या अधिक असते, पण शहरासारख्या सुविधा अपेक्षित असतात. आरोग्य, शिक्षण, पाण्याच्या सोयीचे प्रश्न कायम असतात, पण आकांक्षा मोठ्या असतात. अशा भागाचे नेतृत्व करताना नगराध्यक्षाने गावकीची संवेदनशीलता आणि शहरांचा व्यावसायिक दृष्टिकोन या दोहोंचा अंगीकार केला पाहिजे. याशिवाय, पक्षातीत काम करणे ही नगराध्यक्षांसाठी खरी कसोटी असते. काही ठिकाणी नगराध्यक्ष एका पक्षाचा आणि बहुमतात दुसरा पक्ष असेही घडले आहे. काहीही असले तरी नगरसेवक देखील शहराचे सेवक आहेत, ही बाब नगराध्यक्षांना त्या साऱ्यांच्या मनावर बिंबवावी लागेल. स्वपक्षाखेरीज विरोधी पक्षांतील नगरसेवकांशी संवाद ठेवणे, निधी वाटपात भेदभाव टाळणे, निर्णयप्रक्रियेत सर्वांना सामील करून घेणे हे सारे जमले तर नगराध्यक्ष हा नेता ठरेल अन्यथा तो राजकीय प्रक्रियेतून निवडून आलेला पदाधिकारी ठरेल. एखाद्या पक्षाचा शहराध्यक्ष आणि पालिका किंवा पंचायतीचा अध्यक्ष यातील फरक स्पष्ट होईल तो अशा भूमिकेतून.

आरोग्य आणि शिक्षण हे निमशहरी भागात कायम दुर्लक्षित राहिलेले विषय आहेत. नगरपालिकांचे दवाखाने आणि शाळा हा अत्यंत काळजीचा विषय आहे. शिक्षण आणि आरोग्याच्या उत्तम सोयी ही नगरांसाठी लक्झरी नव्हे; ती त्या भागाची मूलभूत गरज आहे, हे नगराध्यक्षांनी ओळखले पाहिजे. आरोग्य आणि शिक्षणावर काम करणारा नगराध्यक्ष पुढील किमान अर्धशतकाचा समाज घडवत असतो, हे लक्षात ठेवले पाहिजे. याला जोडूनच पाणीपुरवठा आणि स्वच्छता या विषयांचा विचार केला पाहिजे. हे काम अत्यंत कंटाळवाणे, तांत्रिक आणि सातत्याने लक्ष द्यावे लागणारे आहे. या कामांत शिस्त, निरीक्षण आणि व्यवस्थापन लागते. याच विषयांत अनेक नगराध्यक्ष अपयशी ठरतात. त्यामुळे नव्या नगराध्यक्षांनी या विषयांचा अभ्यास करून काम करणे अपेक्षित आहे. निमशहरी भागात सामाजिक सद्‌भाव राखणे हेही मोठे आव्हान आहे. जाती, धर्म, आर्थिक स्तर यांचा संगम इथे असतो. एक चुकीचा शब्द किंवा एक पक्षपाती निर्णय मोठा तणाव निर्माण करू शकतो. अशा वेळी नगराध्यक्षाला समन्वयाची भूमिका घ्यावी लागते. सामाजिक सद्‌भाव राखणारा नगराध्यक्ष सर्वांच्या आदराला पात्र ठरतो. सुरक्षित सार्वजनिक ठिकाणे, स्वच्छ शौचालये, खेळाची मैदाने, उद्याने, विरंगुळ्याची ठिकाणे, शहरातील सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम हे सारे विषय असतात. भ्रष्टाचार हा तर आपल्या साऱ्या व्यवस्थांच्या सर्व स्तरांना पुरून उरलेला विषय आहे. कोणतेही परिवर्तन, मग ते भौतिक असो वा नसो, सिस्टेमिक बदलातून होत असते. व्यवस्था बदलायची म्हटली की व्यवहार आला. व्यवहार असेल तेथे खर्च आला. खर्च असेल तेथे टेंडरिंग आले. टेंडर आले की कंत्राटदार आणि दलालांचा वावर असणार. हे सारे नगराध्यक्षाला हाताळावे लागणार आणि त्या गुंताड्यातून मार्ग काढावा लागणार. नगराध्यक्षांचे काम बोलले पाहिजे. सोशल मीडियाची टीम मागे ठेवून स्लोमो व्हिडीओजमधून चमकणे फार कठीण नाही. काम करणे कठीण आहे. त्यातही चांगले, पारदर्शी, दर्जेदार आणि लोकांना पटेल असे काम करणे अतिशय कठीण आहे. कारण आपल्या राजकारणाची व समाजकारणाची ढब अशी आहे की, सत्तेभोवती मुंगळे जमतात. सत्तापदी बसलेल्या व्यक्तीला योग्य काम करायचे असले, तरी हे मुंगळे तिला ते करू देतीलच असे नाही. त्या दृष्टीने नगराध्यक्षांना सावध राहावे लागणार आहे. सत्ता डोक्यात जाऊ न देणे कठीण आहे आणि आपल्याला हे पद निधिपती म्हणून नव्हे तर प्रतिनिधी म्हणून मिळाले आहे, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. आजचे नगराध्यक्ष हे उद्याचे आमदार, खासदार आणि मंत्री असू शकतात. पण, सर्वांना हे वास्तव लक्षात ठेवावे लागेल की, नगराध्यक्ष म्हणून तुमची कारकीर्द चांगली नसेल तर पुढच्या वाटा आपसूक बंद होतील. स्थानिक स्वराज्य संस्थेत अपयशी ठरलेला नेता मोठ्या व्यासपीठावरही अपयशीच ठरतो. याउलट ग्रामपंचायतीपासून सुरू केलेली कर्तबगारी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर घेऊन गेल्याचीही उदाहरणे आहेत. हे सारे लक्षात ठेवून सर्व नव्या नगराध्यक्षांनी पहिल्या शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम निश्चित केला पाहिजे आणि त्याच्या अंमलबजावणीचा आराखडाही तयार केला पाहिजे. हा कार्यक्रम निश्चित करण्यापूर्वी अभ्यास केला पाहिजे. आकडेवारी पाहिली पाहिजे. पदग्रहण झाल्याबरोबर कृती कार्यक्रम घोषित झालाच पाहिजे, असे नव्हे. प्रशासनासोबत बसून शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, सांडपाणी, कचऱ्याची विल्हेवाट, रस्ते, चौक, वाहतूक, बाजार, पर्यावरण, डिजिटल सर्व्हिसेस अशा सर्व विषयांची समज पक्की करून आणि प्रत्यक्ष पाहणी करून मगच बोलले पाहिजे. तातडीने करावयाची कामे, अल्पकालीन कामे आणि दीर्घकालीन कामे असे विभाजन केले पाहिजे. त्यासाठी उपलब्ध साधनसामग्री व निधी यांचा अंदाज घेतला पाहिजे. पोकळ आश्वासने जन्मभर पाठलाग करीत असतात. पदाच्या नादात घोषणाबाजी करण्याचा सोस टाळला पाहिजे. सर्वांत महत्त्वाचे आहे ते संवादी असणे. अधिकाऱ्यांशी बोला. कंत्राटदारांशी बोला. पण, जनतेला तुमच्यापर्यंत थेट पोहोचता येईल, अशी व्यवस्था निर्माण करा. तुम्हाला ज्यांनी थेट निवडून दिले आहे, ते कधीही तुम्हाला थेट जमिनीवर पण आणू शकतात हे लक्षात ठेवा... तुमची पहिली जबाबदारी नगराप्रति म्हणजे नगरातील जनतेप्रति आहे, हे कधीही विसरू नका, नगराध्यक्ष महोदयांनो!

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# रिअल इस्टेट क्षेत्र परिवर्तनाच्या वाटेवर

वाढते शहरीकरण, बदलती लोकसंख्या आणि पायाभूत सुविधांवर असलेला सरकारचा मजबूत भर यामुळे स्थावर मालमत्ता क्षेत्राला गती मिळाली आहे. या गतिशील परिस्थितीत, बांधकाम आणि बांधकाम साहित्य उद्योग एक केंद्रीय आधारस्तंभ म्हणून उभा आहे. तो या परिवर्तनाचा उत्प्रेरक आणि लाभार्थी दोन्ही आहे. भारताच्या स्थावर मालमत्ता बाजाराच्या सध्याच्या विकासामुळे साहित्य पुरवठादारांसाठी विविध संधी उपलब्ध होत आहेत. सर्वांत आशादायक क्षेत्रांपैकी एक म्हणजे टियर २ आणि ३ शहरांमधील वाढ. प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) आणि 'स्मार्ट सिटीज मिशन'सारख्या सरकारी योजनांमुळे महानगरांच्या पलीकडे बांधकामाची मागणी वाढत आहे. पुरवठादारांसाठी याचा अर्थ उत्पादन वाढवणे, प्रादेशिक पुरवठा साखळी निर्माण करणे आणि विविध प्रादेशिक गरजांनुसार उत्पादने तयार करणे आवश्यक आहे. आणखी एक महत्त्वाची संधी म्हणजे शाश्वत बांधकामाची वाढती मागणी. विकासक अधिकाधिक पर्यावरणपूरक साहित्य, जसे की फ्लाय ॲश विटा, पुनर्वापर केलेली खडी, कमी कार्बनचे सिमेंट आणि उष्णतारोधक ब्लॉक्सची निवड करत आहेत. ही ग्राहकांची जागरूकता आणि कठोर पर्यावरणीय नियमांना मिळालेली प्रतिक्रिया आहे. यामुळे साहित्य पुरवठादार संशोधन आणि विकासामध्ये गुंतवणूक करतील आणि 'आयजीबीसी', गृह किंवा 'लीड'सारख्या हरित प्रमाणन मानकांशी जुळवून घेतील. भारतातील शहरी घरांमध्ये प्रीमियम उत्पादनांचा वापर वाढत आहे.

वाढते उत्पन्न आणि महत्त्वाकांक्षी घर खरेदीदारांमुळे, विकासक लक्झरी टाईल्स, ऊर्जा-कार्यक्षम खिडक्या आणि स्मार्ट होम-सुसंगत उत्पादनांसारख्या उच्च-श्रेणीच्या साहित्यावर लक्ष केंद्रित करत आहेत. भारतातील प्रमुख शहरांमध्ये उच्च-मूल्याच्या निवासी प्रकल्पांच्या वाढत्या संख्येमुळे या बदलावर अधिक शिक्कामोर्तब होते. त्याच वेळी 'नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाईपलाईन' (एनआयपी) आणि 'गती शक्ती'सारख्या कार्यक्रमांद्वारे मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक गुंतवणुकीमुळे राष्ट्रीय पायाभूत सुविधांमध्ये अब्जावधी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. यामुळे सिमेंट, काँक्रीट, स्टील आणि इतर अनेक बांधकाम साहित्यासाठी दीर्घकालीन मागणी वाढेल. त्यामुळे उत्पादक आणि वितरक दोघांनाही स्थिर वाढीचा मार्ग मिळेल. संधी विपुल असल्या, तरी हे क्षेत्र आव्हानांपासून मुक्त नाही. त्यापैकी प्रमुख आव्हान म्हणजे कच्च्या मालाच्या किमतीतील अस्थिरता. स्टील, इंधन आणि सिमेंटसारख्या कच्च्या मालाची किंमत जागतिक आणि देशांतर्गत घटकांवर आधारित मोठ्या प्रमाणात बदलू शकते. पुरवठादारांसाठी लवचीक खरेदी धोरणे आणि शक्य असेल तिथे 'बॅकवर्ड इंटिग्रेशन'कडे वाटचाल करणे आवश्यक ठरते. लॉजिस्टिक्स हे आणखी एक महत्त्वाचे आव्हान आहे.



बाजार भौगोलिकदृष्ट्या विस्तारत आहे, तस तसे वेळेवर आणि किफायतशीर वितरण करणे गुंतागुंतीचे होत आहे. यावर मात करण्यासाठी कंपन्यांना प्रगत वेअरहाऊसिंग, लास्ट-माईल डिलिव्हरी नेटवर्क आणि डिजिटल पुरवठा साखळी उपायांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. नियामक अनुपालन आणि उत्पादन मानकीकरण यादेखील वाढत्या चिंता आहेत. उद्योग जसजसा कठोर गुणवत्ता नियंत्रण आणि शाश्वततेच्या नियमांकडे वाटचाल करत आहे, तसतसे पुरवठादारांना पुढे राहण्यासाठी त्यांच्या उत्पादन प्रक्रिया सतत अद्ययावत करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्रे केवळ अतिरिक्त मूल्यच नाही, तर प्रवेशस्तरीय अपेक्षा बनत आहेत. डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब असमान राहिला आहे. 'बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग' (बीआयएम), ईआरपी प्रणाली आणि एआय-आधारित बांधकाम विश्लेषणासारखी साधने उपलब्ध असली तरी त्यांचा दैनंदिन कामकाजात समावेश अजूनही मर्यादित आहे. उत्पादकता वाढवण्यासाठी आणि स्पर्धात्मकता टिकवून ठेवण्यासाठी ही डिजिटल दरी कमी करणे आवश्यक आहे. सामग्री विज्ञान आणि नावीन्याची भूमिका या परिवर्तनशील टप्प्यात सामग्री विज्ञान महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. अधिक टिकाऊ, ऊर्जा कार्यक्षम आणि विविध हवामान परिस्थितीशी जुळवून घेणारी प्रगत सामग्री बांधकामाची व्याख्या बदलत आहे. उष्णता-प्रतिबिंबित छतावरील कौले, ओलावा-प्रतिरोधक सिमेंट आणि 'इंजिनीअर्ड यूपीव्हीसी' दरवाजे आणि खिडक्या ही शाश्वत शहरीकरणासाठी योगदान देणाऱ्या काही नावीन्यपूर्ण गोष्टी आहेत.

आता मॉड्युलर बांधकाम आणि 'प्री-फेब्रिकेशन'चा अवलंब करणारे उत्पादकदेखील पसंतीस उतरत आहेत. या पद्धती प्रकल्पाचा कालावधी कमी करतात, गुणवत्ता नियंत्रण सुधारतात आणि पर्यावरणावरील परिणाम कमी करतात. ते आजच्या वेगवान रिअल इस्टेट क्षेत्रात महत्त्वाचे घटक आहेत. अंतिम वापरकर्त्यांच्या विकसित होत असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी, बांधकाम साहित्य पुरवठादारांनी केवळ विक्रेते न राहता धोरणात्मक भागीदार बनले पाहिजे. याचा अर्थ उत्पादनाची गुणवत्ता आणि सातत्य सुनिश्चित करताना डिझाईन सल्लामसलतीपासून जागेवरील अंमलबजावणीपर्यंत सर्वसमावेशक समर्थन देणे. सह-निवास जागा, हरित इमारती आणि स्मार्ट शहरे यासारख्या उदयोन्मुख रिअल इस्टेट ट्रेंडशी जुळवून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. या प्रत्येकासाठी नवीन प्रकारची सामग्री, तंत्रज्ञान आणि अनुपालन मानकांची आवश्यकता आहे. पुढील दशक बांधकाम साहित्य परिसंस्थेतील भागधारकांसाठी यात प्रचंड क्षमता आहे. भारतात अभूतपूर्व वेगाने शहरीकरण होत असताना, पुरवठादारांवर शाश्वतपणे विस्तार करण्याची, सतत नवनवीन कल्पना आणण्याची आणि सक्रियपणे जुळवून घेण्याची जबाबदारी आहे. गुणवत्ता, शाश्वतता आणि भविष्यासाठी सज्जता यावर स्पष्ट लक्ष केंद्रित करून या क्षेत्रातील कंपन्या भारताच्या शहरी विकासाच्या गाथेचे प्रमुख प्रवर्तक बनू शकतात. बांधकाम साहित्य उत्पादक स्वतःला केवळ सहभागी म्हणूनच नव्हे, तर भारताच्या परिवर्तनकारी शहरी प्रवासाचे शिल्पकार म्हणून स्थापित करू शकतात. भारताची शहरी गाथा प्रभावी दिसते. गगनचुंबी इमारती उभ्या राहतात. पायाभूत सुविधांचा विस्तार होतो. भांडवलाचा प्रवाह वाढतो आणि आर्थिक उत्पादन वाढते. कागदावर शहरे अधिकाधिक उत्पादक दिसतात, तर दैनंदिन जीवन अधिकाधिक आव्हानात्मक वाटू लागते. ही विसंगती दर्शवते की भारताचे शहरी आव्हान आता केवळ प्रमाणापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते प्रशासनाबद्दल आहे. 'वर्ल्ड अर्बनायझेशन प्रॉस्पेक्ट्स' अहवाल ८१ टक्के शहरी जगाकडे निर्णायक बदलाचे संकेत देतो. भारतासमोरील आव्हान हे शहरी वाढीला जबाबदार आणि न्याय्य प्रशासनाची जोड देणे आणि असुरक्षिततेकडून लवचीकतेकडे वाटचाल करणे हे आहे. हवामानामुळे प्रेरित उष्णतेच्या लाटा, पूर आणि ऊर्जेची अस्थिरता वाढत असताना लवचीकतेचा विकास केवळ एका क्षेत्रीय कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता मुख्य नियोजन तर्कशास्त्राचा भाग बनला पाहिजे. त्याच वेळी, तंत्रज्ञानाने शहरी जीवनाचा मानवी आणि पर्यावरणीय पाया मजबूत करून शहरांना भविष्यासाठी सज्ज केले पाहिजे. आज शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या लहान शहरे किंवा ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांपेक्षा जास्त आहे. 'एक शहर-एक योजने'मुळे एकाच स्थिर दस्तावेजाची जागा घेतली पाहिजे. या योजना केवळ स्थावर मालमत्तेच्या मुद्रीकरणावर आधारित नसाव्यात, तर सामाजिक-आर्थिक आणि हवामान परिणामांद्वारे मार्गदर्शन केलेल्या असाव्यात आणि त्यांनी हवामानाशी जुळवून घेणारी वास्तुकला व ऊर्जा-कार्यक्षम बांधकाम मानकांना मुख्य शहरी पायाभूत सुविधा म्हणून समाविष्ट केले पाहिजे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# इंटरनॅशनल, ग्लोबलची गच्छंती

नावात काय ठेवलंय? असं म्हणतात, पण नावात बरंच काही दडलेलं असतं. म्हणून तर काहीही नसताना मोठ मोठे 'वजनदार' शब्द लिहून भुरळ घालण्याचा प्रयत्न होतो. आता गावागावांत जिथे आरोग्याच्या चांगल्या सोयी नसतील, पण तेथे नावात 'इंटरनॅशनल' लिहिलेली शाळा असते आणि इंटरनॅशनलची मोहिनी अनेकांना पडते. पण आता नावातील हा इंटरनॅशनल, ग्लोबलपणा काढून टाकण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतल्याने कदाचित याकडे सकारात्मक बदल म्हणून पाहिले जाऊ शकते.

शिक्षण संस्थांचे पीक आले आहे. मग अगदी खेड्यातही मोठ मोठ्या शाळा उभ्या झाल्यात. मोठा तामझाम आणि आकर्षक असे नाव असलेल्या शाळा पालक, विद्यार्थ्यांना संमोहित करतात आणि अनेक शाळांचा 'व्यवसाय' सुरू होतो. आम्हाला शाळांच्या नावामध्ये असलेले 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई' असे शब्द दिसतात. त्याच्या खोलात आम्ही कधीच जात नाही. मात्र, राज्याच्या शिक्षण संचालनालयाने काढलेल्या एका पत्राने अशा शब्दांचा वापर करून शाळांचे दुकान थाटलेल्यांना विचार करण्यास भाग पाडले आहे. अनेक शाळा या राज्य मंडळाशी संलग्न असतात. त्या शाळांच्या नावात मोठमोठाल्या शब्दांचा वापर होतो. इंटरनॅशनल, ग्लोबल, इंग्लिश मीडियम स्कूल असे लिहिलेले पाहून पालक आपसूकच शाळांकडे वळतात. मात्र या शाळांना अशा शब्दांचा वापर करण्याचा अधिकार नाही, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. शाळांची मान्यता मराठी माध्यमाची असताना इंग्रजी शब्दाचा वापर करून पालक, विद्यार्थी आणि शासनाची एकप्रकारे फसवणूक करण्याचा प्रकार या माध्यमातून केला जात असल्याचा निष्कर्ष पुढे आला आणि विषय चर्चेत आला. अशा नावांचा वापर करताना एक तर शाळेची परदेशात शाखा असणे किंवा शाळेची संलग्नता आंतरराष्ट्रीय स्तराच्या मंडळाशी असणे गरजेचे आहे. खरंच, आज किती शाळा या गोष्टी पाळतात. संस्थेची एकही शाळा असेल तरी ती इंटरनॅशनल असते, हे विशेष!



राज्य प्राधिकरणाकडे शाळांची मान्यता घेताना किंवा नाव बदलण्यासाठी प्रस्ताव टाकताना आता या गोष्टींची खातरजमा केली जाणार आहे. शिक्षण संचालनालयाच्या पत्राने आता शिक्षणाधिकाऱ्यांनाही अशा शाळांना 'वजनदार' नावांची चूक लक्षात आणून देण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

शाळा चालविताना किती नियम पाळले जातात, हा प्रश्नच आहे. कदाचित या गोष्टींची जाणीव संस्था चालकांनाही असावी; मात्र वेगळेपण दाखविण्याच्या आणि पालक-विद्यार्थ्यांची गर्दी खेचण्याच्या नादात या सर्व चुकीच्या गोष्टी त्यांच्यासाठी प्रमाण असतात. मराठी माध्यमाची मान्यता आणि नावात इंग्रजीचा पसारा अशी अवस्था आज जिल्ह्यातच नव्हे तर सर्वत्र शाळांची झाली आहे. संस्था□ चालकांचा जेवढा कसूर आहे; कदाचित अधिक आमचा असावा. कारण आम्हीही नाव पाहून आमची पावले शाळेकडे वळवितो. मोठमोठाली नावे पाहून आपल्या मुलाने त्याच शाळेत शिकावे, असा आग्रह आमचा असतो. कधी त्या नावाच्या खोलात जाण्याचा प्रयत्न करीत नाही. तेव्हा खऱ्या अर्थाने आम्ही फसवणुकीत आनंद मानत असतो.

आज इंग्रजी शाळा, इंग्रजी वलय असलेल्या नावांच्या मागे धावत असताना मराठी शाळा मात्र ओस पडत आहेत. खरे तर मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये नवीन शिक्षकांमध्ये असलेली प्रतिभा इंग्रजी शाळांमध्येही मिळणार नाही. पण आमच्या शाळांचे नाव जिल्हा परिषद प्राथमिक, माध्यमिक शाळा असते आणि तेच आम्हाला भावत नाही, ही व्यथा आहे. आज ज्यांना जे करण्याचा अधिकार नाही, ते करून पालक आणि शासनाची फसवणूक होत असतानाही आम्ही नावाच्या मोहात पडतो आहे. अशावेळी शिक्षण विभागाने घेतलेली भूमिका नक्कीच सकारात्मक म्हणावी लागेल. आता गावात असलेली इंटरनॅशनल स्कूल 'राष्ट्रीय' शाळा होईल आणि खरे वास्तव लोकांपुढे येईल, अशी अपेक्षा करण्यास हरकत काय? आणि यानंतरच 'नावात काय ठेवलंय' म्हणणाऱ्यांना नावातच सर्व काही दडलंय, याची जाणीव होईल.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# वराह पुराण

परमेश्वराचा वराह अवतार ज्या पुराणात कथन केला ते पुराण म्हणजे वराह पुराण. अवताराचीही विकासात्मक उकल पाहिली पाहिजे.

पहिला मत्स्य अवतार जो जलचर आहे.
दुसरा कूर्म अवतार जो उभयचर आहे.
तर तिसरा वराह अवतार भूचर अवतार आहे.
व्यासांनी रचलेल्या वराह पुराणात वराह अवताराचे प्रयोजन आहे.

या पुराणात त्याची सुंदर कथा आहे. एकदा ब्रह्मदेवाचे मानसपुत्र सनक, सनंदन, सनातन आणि सनतकुमार भगवान नारायण विष्णूंच्या दर्शनासाठी गेले असता तिथे द्वारपाल असलेल्या जय आणि विजय यांनी त्यांना अडवले, त्यांच्याशी उन्मत्तपणा केला. त्यामुळे रागावून सनतकुमारांनी जय आणि विजय यांना शाप दिला की तुम्ही असुरांसारखे वागलात म्हणून राक्षस व्हाल. त्या शापाच्या योगाने जय-विजय दितीच्या पोटी दैत्य म्हणून जन्माला आले. जय हिरण्याक्ष तर विजय हिरण्यकश्यपू झाले.

हिरण्याक्ष दैत्याने कठोर तप करून सामर्थ्य मिळवले. त्या प्रभावाने त्याने संपूर्ण पृथ्वीवर आपल्या सामर्थ्य आणि बळाने ताबा मिळवला. त्याच्या अन्याय आणि अत्याचाराने सर्वत्र त्राही मां अवस्था झाली. पृथ्वीला त्याने पार पाताळात नेले. रसातळाला गेलेली पृथ्वी तिने स्वतःला वाचविण्यासाठी ब्रह्मदेवाची प्रार्थना केली. देवता एकत्रित झाल्या आणि सर्वांनी भगवान विष्णूंची प्रार्थना केली. प्रार्थनेचा परिणाम म्हणून ब्रह्मदेवाच्या नासिकेतून एक सूक्ष्म वराह बाहेर पडला आणि पाहता पाहता तो अनुपासोनी ब्रह्मांडाएव्हढा झाला. हा वराह म्हणजे साक्षात विष्णू होते. त्यांनी सर्वांना दिलासा दिला.

वराह भगवंतांनी पाताळात जाऊन हिरण्याक्ष दैत्याचा वध केला. आणि आपल्या प्रचंड अशा दात सुळ्यांवर पृथ्वीमातेला ठेवून तिला मुक्त केले. सृष्टीचे रक्षण आणि धर्माची पुनर्स्थापना केली. अशी या वराह पुराणाची संक्षेपात कथा आहे.

हे वराह पुराण प्रत्यक्ष वराह भगवंतांनी श्रीमाता पृथ्वीला सांगून उपदेश देखील दिला आहे. या पुराणाची सुरुवातच पृथ्वी-वराह संवादाने आहे. थोडक्यात वराह पुराण हे वराहनारायण आणि भूमाता पृथ्वी यांचा संवाद आहे.

२४००० श्लोकसंख्या असलेल्या या पुराणात एकूण २१७ विषय आहेत. या पुराणात देवर्षी नारदांना वेदमाता श्रीसावित्रीचे अद्‌भुत दर्शन, महामुनी कपिल यांनी राजा अश्वशिरा यांना दाखविलेले भगवंताचे सर्वव्यापक स्वरूप, रैभ्यमुनी आणि बृहस्पती संवाद तथा रैभ्य आणि सनतकुमार संवाद आहे. या संवादात भगवंताचे स्वरूप, त्याचे वंदन, वंदनाचे जीवनावर परिणाम आणि मोक्षप्राप्तीचे साधन यावर चर्चा आहे.

या पुराणात गयेला केलेल्या पिंडदानाचे महत्त्व, श्राद्ध, श्राद्धकल्प महत्त्व विशद केले आहे. अश्विनीकुमार उत्पत्ती, गौरी उत्पत्ती, गणेश उत्पत्ती, सर्प उत्पत्ती, कार्तिकेय, आदित्य, दुर्गा उत्पत्ती दिली आहे. त्या अनुषंगाने त्यांचे माहात्म्य विदित आहे. सर्व अवतारांचे द्वादशी व्रत जसे मत्स्य द्वादशी व्रत, कल्की द्वादशी व्रत, बुद्ध द्वादशी व्रत, श्रीराम द्वादशी व्रत इत्यादी व्रत याच पुराणात विदित आहेत.

याशिवाय धरणी व्रत, धन्य व्रत, कांती व्रत, सौभाग्य व्रत, अविघ्न व्रत, शांति व्रत, काम व्रत, साधन व्रत, आरोग्य व्रत, शौर्य व्रत, सार्वभौम व्रत देखील सांगितले आहेत. त्याची तंत्र मंत्र साधना आणि फळ श्रुती आहे. कृत, त्रेता, द्वापार आणि कलियुग या चारही युगाचे गुणधर्म या पुराणात विदित आहेत. सुमेरू पर्वत, सुमेरू पर्वतावरील विविध नद्या, विविध जलाशयांचे वर्णन इथे आहे.

भारतवर्षाच्या नऊ खंडांचे वर्णन अभ्यासाचा विषय ठरतो. कसेरु, ताम्रवर्ण, गभास्तिमान, नाग, सौम्य, गंधर्व, वारूण, भारत खंड असे ते खंड आहेत. यावरून अखंड भारताचे चित्रण करता येते. भूमीला सप्तद्वीप वसुंधरा म्हणतात. ते सप्तद्वीप या पुराणात सांगितले आहेत. जंबू द्वीप, शाक द्वीप, कुश द्वीप, क्रौंच द्वीप, शाल्मली द्वीप, गोमेद द्वीप आणि पुष्कर द्वीप ही त्यांची नावेही दिली आहेत. त्यावरून 'वसुधैव कुटुंबकम्'ची संकल्पना दिसून येते.

विविध प्रकारचे दान या पुराणात सांगितले आहेत. त्यात विविध प्रकारच्या धेनूदान सांगितल्या आहेत. जसे तिलधेनू, जलधेनू, रसधेनू, गुड धेनू, शर्करा धेनू अशा विविध तेरा धेनू दान आहेत. कळत-नकळत होणारी ३२ प्रकारची पातके, महापातके सांगितली आहेत. त्याचे प्रायश्चित्त, साधना, उपाय देखील दिले आहेत.

यमलोकांचे वर्णन याच पुराणात दिले आहे. यम नचिकेता याबाबतही विशेष दिले आहे. भगवंताने अवतारासाठी वराह रूप का निवडले असेल? वराह तर तशा अर्थांनी निषिद्ध प्राणी. वराहाची काही वैशिष्ट्ये आहेत. एक तर वराह दलदलीत जाऊ शकणारा, लढाऊ आणि शक्तिशाली प्राणी. त्याचे सुळे त्याचे बलाढ्य शस्त्र आहे. पृथ्वीला हिरण्याक्ष दैत्याने पाताळात नेल्यामुळे तेथील दलदलित जाणे आवश्यक होते. याशिवाय वराहास आपल्या सुळ्यांचा वापर करून दैत्यवध करण्यास सहजता होती.

**रसातलगतां भूमिं गजः कमलिनीमिव ।**
**उद्धार हि तं विष्णुं वन्दे वाराहरूपिणम्**

ज्याप्रमाणे हत्ती कमळाला आपल्या सोंडेने सहज उपसतो तद्वतच वराह विष्णूंनी आपल्या पुष्ट सुळ्यांनी पृथ्वीला उचलले. त्याचे बाहू देखील मजबूत आहेत. वराहाचे ध्येय सरळ असते. त्याची धडक ही आजूबाजूला न वळता सरळमार्गी असते.

**चकास्ति शृङ्गोढघनेन भूयसा कुलाचलेन्द्रस्य यथैव विभ्रमः**

सुळ्यामुळे दलदलीत फसलेल्या पृथ्वीला सहज उपसून सुळ्यावर ठेवून वर आणणे त्यामुळे शक्य होते. ज्याप्रमाणे एखाद्या पर्वतावर मेघ असावेत तसे सुशोभायमान स्वरूप दातांवर पृथ्वी घेतलेल्या वराह विष्णूंचे आहे.

भगवंताने सृष्टीचे रक्षण आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी वराह अवतार धारण केला. भगवान वराह आणि भूमाता पृथ्वी यांचा संवाद म्हणजे वराह पुराण. त्यातील मथितार्थ पुढील श्लोकात भगवान वराह स्पष्ट करतात.

**यस्यातद् विदितं सर्वं न्यासयोगं वसुंधरे**
**योगे न्यस्य सदात्मानं मुच्यते न च संशयः**

हे वसुंधरे! न्यासयोग म्हणजे सर्वस्व मला अर्पण करून कर्म करतो तो निःसंदेह मोक्षास प्राप्त होतो.

९८२२२६२७३५

## विश्वासघातकी बांगलादेशला त्याची जागा दाखवून द्या

१९७१ साली भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बांगलादेशला पाकिस्तानच्या जोखडातून मुक्त केले. त्यासाठी अनेक भारतीय सैनिकांना हौतात्म्य पत्करावे लागले. अनेक भारतीय सैनिकांच्या बलिदानानंतर बांगलादेश जगाच्या नकाशावर एक राष्ट्र म्हणून उदयास आले. त्याच बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी तेथील अराजकतेनंतर भारतात आश्रय घेतला. शरण आलेल्यांना, आश्रयास आलेल्यांना मरण द्यायचे नसते ही भारताची संस्कृती आहे. याच संस्कृतीला अनुसरण भारताने शेख हसीना यांना भारतात आश्रय दिला. त्यांना भारताने आश्रय दिला हे तिथे सत्तेवर असलेल्या मोहम्मद युनूस यांच्या हंगामी सरकारला आणि कट्टरपंथीयांना आवडले नाही म्हणूनच ते तेथील जनतेत भारत आणि हिंदू नागरिकांविषयी द्वेषपूर्ण वक्तव्य करून बांगलादेशी जनतेच्या मनात विष पेरत आहे. बांगलादेशचे हंगामी सरकार आणि कट्टरपंथीय जाणीवपूर्वक बांगलादेशमधील हिंदू धर्मीयांना लक्ष्य करत आहे. मागील काही महिन्यांपासून बांगलादेशात हिंदूंचा प्रचंड छळ सुरू आहे. मोहम्मद युनूस सत्तेवर आल्यापासून शेकडो हिंदूंची हत्या करण्यात आली आहे. मोहम्मद युनूस यांच्या सत्ता काळात हिंदू धर्मीयांची मंदिरे तोडणे, मूर्ती फोडणे, हिंदू महिला, मुली, नागरिकांचा छळ करणे, जबरदस्तीने त्यांचे धर्मांतर करणे, हिंदूंच्या मालमत्ता बळकावणे, त्यांना गावातून हाकलून देणे असे प्रकार सुरू आहेत. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार तेथील सरकारच्या पाठबळावर सुरू आहे. तेच याला उत्तेजन देत आहेत याला विश्वासघात म्हणावे लागेल. भारत सरकारने बांगलादेशच्या सरकारला या संदर्भात जाब विचारायला हवा. जर बांगलादेशने हा उद्रेक थांबवला नाही तर भारताने बांगलादेशला जशास तसे उत्तर देऊन त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

## विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण महत्त्वाचे...

आजच्या गतिमान आणि स्पर्धात्मक युगात केवळ ज्ञान पुरेसे नसून व्यक्तिमत्त्वातील नेतृत्वगुणांचीही मोठी गरज आहे. विद्यार्थिदशा ही नेतृत्वगुणांची बीजे रोवण्याची सर्वोत्तम वेळ मानली जाते. समाज, शाळा, कुटुंब आणि भविष्य यासाठी सक्षम, जबाबदार व प्रोत्साहन देणारे नेतृत्व घडवणे अत्यंत आवश्यक आहे. नेतृत्व म्हणजे केवळ इतरांना आदेश देणे नव्हे, तर स्वतःच्या कृतींनी प्रेरणा देणे होय. विद्यार्थी शालेय जीवनात विविध उपक्रम, गटकार्य, प्रकल्प आणि संघटनांमधून नेतृत्व गुणांची जोपासना करू शकतात. उत्साह, संवादकौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, टीमवर्क, आत्मविश्वास अशा अनेक बाबी नेतृत्वाच्या मुळाशी असतात. विद्यार्थी जीवनात नेतृत्वगुण विकसित झाल्यास अनेक सकारात्मक परिणाम दिसून येतात. नेतृत्व स्वीकारणारा विद्यार्थी स्वतः जबाबदार बनतो आणि इतरांनाही प्रेरित करतो. समस्यांचे विश्लेषण करून योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते. गटकार्य करताना समन्वय, सहकार्य, समजूतदारपणा आणि संघर्षनिवारण कौशल्य वाढते. मंचावर बोलणे, प्रकल्प सादर करणे, उपक्रमांचे नेतृत्व करणे यामुळे आत्मविश्वास दृढ होतो. उद्याचे डॉक्टर, अभियंते, प्रशासक, उद्योजक, शिक्षक यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नेतृत्वाची गरज असते. ज्ञानाच्या जोडीला नेतृत्व, मूल्यशिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकास यांचा संगम झाला तर विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल बनते. अशा गुणांनी विद्यार्थी समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात. विद्यार्थी हे राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांच्या मनात नेतृत्वाची जाणीव आणि कौशल्ये विकसित केली तर समाज अधिक प्रगत, सुशिक्षित आणि सक्षम बनेल. म्हणूनच शाळा, पालक आणि समाज यांनी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणांची जोपासना करण्यासाठी आवश्यक वातावरण आणि संधी उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## आजचे संघगीत-८२

बुधवार, २४ डिसेंबर २०२५

### तुझ्या पूजनी या मनाने रमावे

तुझ्या पूजनी या मनाने रमावे तुझ्या चिंतनी मी सदा मग्न व्हावे ।
तुझे स्तोत्र आई मुखाने वदावे यशोवर्धनी ह्या कुडीने झिजावे ॥१॥

किरीटी तुझ्या शोभती पुष्परत्ने तसे हार ते दिव्यही साजती गे ।
नसो स्थान तेथे परी पादस्पर्शे तुझ्या धन्य व्हावीच ही पाकळी गे ॥२॥

तुझ्या पादप्रक्षालनी पात्र व्हाया स्वतीर्थे सरीता जया अर्पिती ह्या ।
तया सागरी होउनी एक बिंदू तुझ्या पादपद्मासि माते, धुवावे ॥३॥

तुझ्या मंदिरी जो सदाही प्रकाशे प्रकाशीं जयाच्या तुझी मूर्ति हासे ।
तया नित्य दीपातला स्नेहबिंदू बनूनि तुझ्या मंदिरी मी जळावे ॥४॥

यथासांग सर्वस्व अर्पून पूजा करावी तुझे व्हावया ऊतराई ।
चिराशा मनाची असे हीच आई तथास्तू वदे, आशिषा शीघ्र देई ॥५॥

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शेतकऱ्यांच्या खात्यावर ७११ कोटी ५५ लाख रुपये थेट जमा

## ११ हजार शेतकऱ्यांची ई-केवायसी पेंडिंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आणि यातील सर्वच रक्कम मंजूर झाली आहे. यातील ६ लाख १९ हजार १४५ शेतकऱ्यांसाठी आजतागायत ७५२ कोटी ७९ लाख ०४ हजार ५४६ रूपये मंजूर झाले असून, त्यापैकी ५ लाख ८९ हजार २८० शेतकऱ्यांच्या खात्यावर आजतागायत ७११ कोटी ५५ लाख १६ हजार ८८६ रूपये झाले जमा झाले आहेत आणि ईकेवायसीअभावी ११ हजार ०६२ शेतकऱ्यांचे १२ कोटी २५ लाख ६३ हजार ११८ रूपये पेंडिंग पडले आहेत.

अतिवृष्टी होवून अडीच महिने झाले तरी अजून ११ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर ई-केवायसीअभावी पैसे जमा झाले नाहीत. शासनाच्या पोर्टलवर ही रक्कम अदा झालेली दिसत आहे मात्र केवळ ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे ही रक्कम लटकली आहे. जिल्हा प्रशासनाकडून ही रक्कम अदा करण्यासाठी धडपड चालू आहे. गावनिहाय कॅम्प सुरू केले आहेत. ई-केवायसी नसली तरी आता फार्मर आयडी शेतकऱ्यांसाठी गरजेचा आहे. यामुळे जाणकार शेतकरी आपला फार्मर आयडी ई-महासेवा केंद्र आणि प्रशासनाच्या शिबिरात जावून काढू लागले आहेत. मात्र अनेक अडाणी शेतकऱ्यांना या कामात यश येत नाही. यामुळे अशाच शेतकऱ्यांचे हे पैसे बँकांत पडले आहेत.

जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. ई-केवायसी, ॲग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे. राहिलेल्या शेतकऱ्यांनीही लवकर ई-केवायसी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महत्वाचे...



### स्मृतीदिनानिमित्त भाई छन्नुसिंह चंदेले यांना अभिवादन

**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**

भाई छन्नुसिंह चंदेले यांच्या ४० व्या स्मृतीदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.जुना एम्प्लॉयमेंट चौकातील त्यांच्या पुतळ्याला तसेच विडी घरकुल येथील चंदेले शैक्षणिक संकुलात भाई छन्नुसिंह चंदेले स्मृती केंद्राचे उपाध्यक्ष प्रा. विलास बेत, सचिव रवींद्र मोकाशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी स्मृती केंद्राच्या विश्वस्त प्रा. डॉ. रोझा चंदेले, सुधीर चंदेले, अरविंद चंदेले, राहुल चंदेले, अमृतदत्त चिन्नी, अंबादास पवार, दत्ता सोनवणे, प्रकाश परदेशी, अन्वर मिस्त्री, गंगाधर शिंदे, गोपाळ, विलास कुलकर्णी यांच्यासह भाई छन्नुसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य सिद्धार्थ गायकवाड, राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक महादेव तोळणूर, भाई छन्नुसिंह चंदेले माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक काकासाहेब गाढवे उपस्थित होते.



### जानेवारीत विशेष सिकलसेल तपासणी मोहीम

**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राज्यात १५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा राबविण्यात येणार आहे. याकालावधीत सिकलसेल आजाराचे निदान, उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा मोहिमेअंतर्गत राज्यातील सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांतील प्रत्येक नागरिकाची सिकलसेल तपासणी करण्यात येणार असून, एकही नागरिक सिकलसेल तपासणीपासून वंचित राहू नये, याची काटेकोर दक्षता सार्वजनिक आरोग्य विभागाकडून घेण्यात येईल. आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पगार प्रत्येक महिन्याच्या १ ते ५ तारखेपर्यंत अदा करण्याबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत. दिरंगाई झाल्यास संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरले जाईल. तसेच जिल्हा आरोग्य संस्थांनी आवश्यकते नुसारच खरेदी करावी, अनावश्यक खर्च टाळावा व सर्व कार्यात पारदर्शकता ठेवण्याबाबत बैठकीत सूचना दिली आहे. बैठकीस आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालिका डॉ. सुनिता गोल्हाईत उपस्थित होते.




### जिल्हा युवा महोत्सवात हर्षदा भंडारे द्वितीय

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे घेण्यात आलेल्या जिल्हास्तर युवा महोत्सवमध्ये संगमेश्वर महाविद्यालयातील एमएससी भाग २ वी विद्यार्थिनी हर्षदा भंडारे हिने लोकनृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकविले आहे. पारितोषिक वितरण समारंभात जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्या हस्ते भंडारे हिचा स्मृतीचिन्ह व पाच हजारांचा धनादेश देवून सन्मान करण्यात आला. यावेळी तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याची घोषणा करण्यात आली. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, दयानंद शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य एस.बी.क्षीरसागर, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड, तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार, निवृत्त क्रीडा अधिकारी सत्येन जाधव उपस्थित होते. यावेळी स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. पंकज पवार, मनोज अंकुश, राजेश पवार, विशाल चव्हाण, सुमित भोसले, शुभम रणखांबे, संगमेश्वर बिराजदार, राजेशेखर शिंदे, गोविंद काळे यांनी काम पाहिले.



# अबुबकर हारून सय्यद आणि नुरुद्दीन मुल्ला यांचा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते तौफिक शेख यांच्या नेतृत्वाखाली सोलापुरातील राष्ट्रवादीचे माजी उपमहापौर स्वर्गीय हारून सय्यद यांचे चिरंजीव अबुबकर सय्यद आणि नुरूद्दीन मुल्ला यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांनी रविवारी इंदापूर येथील भरणेवाडी येथे सोलापूर राष्ट्रवादीचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश केला.

यावेळी दत्तात्रेय भरणे यांनी अबुकर सय्यद, नुरूद्दीन मुल्ला, मुसा शेख, जुनेद शेख, मुसेब सय्यद, अहमद मुल्ला तसेच सर्फराज पटेल यांच्या गळ्यात राष्ट्रवादी पक्षाचे उपरणे घालून त्यांचे स्वागत केले. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत इच्छुक उमेदवारांची वाढलेली संख्या लक्षात घेता यंदा राष्ट्रवादीला मोठे यश मिळेल, असा विश्वासही संपर्कमंत्री भरणे यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी राष्ट्रवादीचे शहर - जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, ज्येष्ठ नेते तौफिक शेख,प्रदेश सरचिटणीस खलील शेख,जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, शाम राव गांगर्डे उपस्थित होते.



# बालाजी अमाईन्सच्यावतीने १० वीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित संच भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ सोलापूर यांच्यावतीने बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळाकडे सोलापूर व परिसरातील शाळांमधील गरजू विदयार्थाना आर्थिक परिस्थितीमुळे दहावीच्या परिक्षेपूर्वी सराव परिक्षेचा अभ्यास करण्याकरीता २१ अपेक्षित प्रश्नसंच मिळावे, अशी मागणी केली होती. त्यानुसार बालाजी अम ईन्सच्या वतीने सोलापूरसह धाराशिव जिल्ह्यातील १० वीच्या गरीब विद्यार्थ्यांसाठी अपेक्षित प्रश्नसंच भेट देण्यात आले.

बालाजी अमाईन्सच्या वतीने मागील दोन वर्षांपासून अपेक्षित संच सोलापूर व धाराशिव जिल्हयातील शाळांना देत आहे. या प्रमाणे यंदाच्यावर्षी संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी सोलापूर व धाराशिव जिल्हयातील काही शाळांतील गरिब विद्यार्थ्यांकरीता दहावीचे अपेक्षित प्रश्नसंच वाटप करण्यात आले. याप्रसंगी बालाजी अमाईन्स सीएसआर विभागप्रमुख अनिल विपत, मुख्याध्यापक संघाचे प्राचार्य शंकर वडणे, जिल्हा संपर्कप्रमुख महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे गुरुनाथ वांगीकर, रानमसले ब्रम्हगायत्री शाळेचे घोडके, पाटील, झाडबुके, महादेव गवळी, सारंग पाटील यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमास बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, अमोल गुंड व शाळांमधल शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते. सोलापूर शहर, उत्तर सोलापूर तालुका व मोहोळ तालुक्यातील शाळांना अपेक्षित प्रश्नसंच भेट देण्यात आले.

# शेतजमिनी खरडून गेलेल्यांनाही आता लवकरच मदत

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

जिल्ह्यात अतिवृष्टी होवून अडीच महिने झाले तरी नुकसानभरपाईचे अजून ११ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर ई-केवायसीअभावी पैसे जमा झाले नाहीत. शासनाच्या पोर्टलवर ही रक्कम अदा झालेली दिसत आहे मात्र केवळ ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे ही रक्कम लटकली आहे. जिल्हा प्रशासनाकडून ही रक्कम अदा करण्यासाठी धडपड चालू आहे. गावनिहाय कॅम्प सुरू केले आहेत. याच महापुरात ज्या शेतकऱ्यांची जम ीन, पिके वाहून गेली होती; विहिरी वाहून गेल्या होत्या या सर्व शेतकऱ्यांना येत्या काही दिवसात पैसे मिळणार आहेत.

या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांच्या ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांनाही पैसे मंजूर झाले असून, त्यांच्याही याद्या अपलोड करण्यास सुरूवात केली आहे. आजतागायत ७ हजार २०० शेतकऱ्यांची नावे पोर्टलवर लोड केली आहेत. उर्वरित शेतकऱ्यांची नावेही पुढील आठवड्यापर्यंत पोर्टलवर लोड करण्यात येतील आणिया सर्वांना येत्या काही दिवसात पैसे मिळणार आहेत. गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांची ई-केवायसी, ॲग्रीस्टॅक करून घेतले जात आहे. महापूर आणि अतिवृष्टीने जिल्ह्यातील १२ हजार ५० हेक्टर क्षेत्रावरील माती खरडून गेली. त्यामुळे या जमिनी कसण्यायोग्य राहिल्या नाहीत. यासाठी राज्य शासनाकडे ५७ कोटी रुपयांची मागणी केली होती; तीही मंजूर झाली आहे. अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या विहीरी ढासळून त्यात गाळ पडला आहे. या विहिरीच्या दुरुस्तीचेही नियोजन आखण्यात येत आहे. यासाठी रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

# क्रीडा भारतीच्या क्रीडाज्ञान परीक्षेचे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

क्रीडा ज्ञान परीक्षेतील दोन पारितोषिक वितरण समारंभ क्रीडा भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष प्रा. शैलेश आपटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

श्री सिद्धेश्वर वुमन्स पॉलिटेक्निक दुपारी १.३० वाजता श्री सिद्धेश्वर वुमन्स पॉलिटेक्निक कॉलेज पहिल्या तीन क्रमांकाच्या विद्यार्थिनींना व महाविद्यालयाला स्मृतीचिन्ह देण्यासाठी म हाविद्यालयाच्या सभागृहामध्ये याचे वितरण झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन धरणे उपस्थित होते. एस इ एस पॉलीटेक्निक इंजिनिअरिंग कॉलेज या ठिकाणी आयोजित कार्यक्रमास उपप्राचार्य पाटील व संचालक मंडळातील



सदस्य श्री देवगावकर हे उपस्थित होते. या महाविद्यालयातील ओवी शिंदे यांनी क्रीडा ज्ञान परीक्षेतील तृतीय क्रमांकाचे रुपये २५ हजारचे पारितोषिक मिळवले होते. याचा पारितोषिक वितरण समारंभ या महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये करण्यात आला. सायंकाळी सहा वाजता सक्षम महिला अभियाना अंतर्गत लाठी काठी क्रीडा केंद्राचे उद्घाटन शिवस्मारक च्या क्रीडांगणावर प्राध्यापक शैलेश आपटे यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व कार्यक्रमांसाठी क्रीडा भारती पश्चिम महाराष्ट्रचे मंत्री ज्ञानेश्वर माकल व सोलापूर जिल्हा कार्यकारणीतील सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कॉलेज युवतीचा केला पाठलाग

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २३ डिसेंबर-**

एका १९ वर्षीय कॉलेज युवतीचा मोटार सायकलवर पाठलाग करुन तु मला खूप आवडतेस माझे तुझ्यावर प्रेम आहे असे म्हणून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी शुभम पोपट डोरले याच्याविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीसांनी दिलेली माहिती अशी, फिर्यादी तथा पिडीता ही १६ ते २२ डिसेंबर पर्यंत घरातून कॉलेजला जाणेपर्यंत तिचा मोटर सायकलवर पाठलाग करुन तिच्या मोबाईलवर फोन केला. फिर्यादीने फोन करु नको व मागे येवू नको, असे वारंवार सांगूनही त्याच्यामध्ये बदल झाला नाही. १६ डिसेंबर रोजी पिडीतेस मोटर सायकलवर येवून त्याने पिडीतेस थांबवून तु मला फोन का करत नाही असे म्हणाला. त्यावेळी पिडीतेने तू मला बोलू नको माझ्या पाठीमागे का लागला आहेस? असे म्हणत असताना गाडीवरुन खाली उतरुन पिडीतेचा हात धरुन जवळ ओढून तू मला खूप आवडतेस माझे तुझ्यावर प्रेम आहे असे म्हणत लज्जा वाटेल असे कृत्य केले. तपास पोलीस हवालदार कांबळे हे करीत आहेत.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

# विधवा, घटस्फोटीत महिलांच्या ई-केवायसीला मुदतवाढ

**सोलापूर, दि.२३ डिसेंबर**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांचे ई-केवायसी करताना ज्या लाभार्थी महिलांचे पती किंवा वडील यांचा मृत्यू झाला आहे किंवा लाभार्थी महिला या घटस्फोटीत आहेत. अशा लाभार्थी महिलांचे पती किंवा वडील यांचे आधारक्रमांक ओटीपी येण्यास अडचण येत होती. त्यांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सूट देण्यात आली आहे.

त्यामुळे त्यांची ई केवायसी पूर्ण होत नाही. अशा लाभार्थी महिलांचे पती किंवा वडील यांचे मृत्यू प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचे आदेश अंगणवाडी सेविका यांच्याकडे जमा करण्यात येत आहेत. त्या आधारे अंगणवाडी सेविका शिफारस पत्र बाल विकास प्रकल्प कार्यालयास सादर करीत असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी दीपक ढेपे यांनी दिली.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात कडून सदरील लाभार्थी महिलांची माहिती शासनास सादर करण्यात येत आहे. अशा लाभार्थी महिलांचे पती किंवा वडील यांचे आधारक्रमांक ओटीपी पासून त्यांना सूट देण्यात येणार आहे. या प्रकारातील लाभार्थी महिलांनी जवळच्या अंगणवाडी सेविका यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडे संबंधित कागदपत्र जमा करावीत.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Jain Dhaval Kamlesh** HAS BEEN CHANGED TO **Kothari Dhaval Kamlesh**

Resi. - 4/2, Vardhaman Nagar, Bhavani Peth, Solapur

**KINDLY NOTE**

THE SAME.(350/25 Dtd.23.12.2025)

**CHANGE IN NAME**

I, hereby declare that My Old Name- **BANU BEGUM MOHD SATTAR** has been changed to - **BANU SARDAR PATHAN**

Resi add- At-710 Fule Plot, Paranda Road, Barshi, Tal. Barshi, Dist. Solapur Mob. No. 9322924251

Affidavit No. 04115/2025

# 'अभाविप'तर्फे उद्या यशवंत स्मृती गौरव कार्यक्रम

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे शिल्पकार प्रा. यशवंतराव केळकर यांच्या जन्मशताब्दी निमि त्त गुरुवारी सकाळी ९ वाजता श्री शिवछत्रपती रंगभवन सभागृहात यशवंत स्मृती गौरव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अभाविपच्या महानगरमंत्री अनघा जाधव यांनी दिली. यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पूर्व कार्यकर्त्यांचे संमेलन होणार आहे.

यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्व प्रचारक श्याम जाजू (दिल्ली) यांचे मुख्य मार्गदर्शन होणार असून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय कार्यकारी विशेष निमंत्रित सदस्य प्रा. प्रशांत साठे तसेच सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर यांचे मार्गदर्शन होणार आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या स्थापनेत आणि विस्तारात प्रा. यशवंतराव केळकर यांचा सिंहाचा वाटा आहे.

यंदाचे वर्ष प्रा. यशवंतराव केळकर यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. याचे औचित्य साधून सोलापुरात यशवंत स्मृती गौरव या कार्यक्रम ाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विभागाचे महानगर अध्यक्ष प्रा. प्रशांत चाबुकस्वार यांनी केले आहे.

भा.कृ.अनु.प.- राष्ट्रीय अनार अनुसंधान केन्द्र, सोलापूर

ICAR - National Research Centre on Pomegranate
(Indian Council of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255 (M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263 ,F-(0217) 2353533
E mail- nrcpomegranate@gmail.com, Website- nrcpomegranate.icar.gov.in
(ISO 9001:2015 Certified Institute)

**WALK-IN-INTERVIEW**

A Walk in interview will be held on 20.01.2026 11:00 AM at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under project on contractual basis at a consolidated remuneration under time bound project.

| Sl. No. | Name of the Project | Name of Post | Number of Posts |
|---|---|---|---|
| 1. | Indian Council of Agricultural Research | Young Professional - II | 01 (One) |
| 2. | Real-time advisory services (AI Based Mobile application): On field diagnosis and need based plant disease advisory system for sustainable disease management of pomegranate | Young Professional - I | 01 (One) |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrepomegranate.in.

Sd/-
DIRECTOR

**जाहीर नोटीस**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४०७/२०२४

१. प्रमिला राजेंद्र गरड -- अर्जदार
रा. खरटमोल प्लॉट बार्शी रोड, वैराग ता. बार्शी
(असल्यास तर्फ वकील सुधीर का कापसे)
विरुध्द
२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी -- गैर अर्जदार
तथामुख्याधिकारी न.प. वैराग

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराचा मुलगा रोहन राजेंद्र गरड, रा. खरटमोल प्लॉट बार्शी रोड वैराग ता. बार्शी यांचा मौज वैराग स्थानिक क्षेत्र राहत्या घरी ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी दिनांक ०४ ऑक्टोबर १९९९ जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वचे जन्म नोंदीचा आदेश होणेनामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा रोहन राजेंद्र गरड यांचा दिनांक ०४ ऑक्टोबर १९९९ रोजी मौजे वैराग स्थानिक क्षेत्र राहत्या घरी ता. बार्शी जि. सोलापूर या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकत न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज. ता. २३ डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**बार्शी**

Classifieds

**पाहिजेत**

**कौस्तुभ इंजिनिअरिंग येथे Office Clerk (MS-CIT, Tally) - फोन करून येणे. होटगी रोड चव्हाण मोटर्समागे. 7720087726**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### एकाच षटकात ५ गडी बादचा विक्रम



**इंडोनेशिया :** इंडोनेशियाचा वेगवान गोलंदाज गेडे प्रियंदनाने इतिहास घडविला. तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात एकाच षटकात पाच गडी बाद करणारा जगातील पहिला गोलंदाज ठरला आहे. २८ वर्षीय उजव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाने कंबोडियाविरुद्ध ही विश्वविक्रमी कामगिरी केली. इंडोनेशिया आणि कंबोडिया यांच्यातील सध्या सुरू असलेल्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील एक सामना मंगळवारी बाली येथे खेळला गेला. प्रियंदनाने एकाच षटकात पाच गडी बाद केले. इंडोनेशियाच्या संघाने सामन्यात वर्चस्व गाजवले. तथापि, कंबोडियन संघालाही पुनरागमन करण्याची संधी होती, परंतु त्यांना चांगली कामगिरी करण्यात अपयश आले. प्रथम फलंदाजी करताना इंडोनेशियन संघाने १६८ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना कंबोडियाची एकवेळ ५ बाद १०६ अशा धावा होत्या. तिथून, सामन्याचा निकाल कोणत्याही दिशेने जाऊ शकला असता. तथापि, कंबोडियन संघ प्रियंदनावर मात करू शकला नाही आणि पराभवाला सामोरे जावे लागले. प्रियंदनाने पहिल्या षटकातील पहिल्या तीन चेंडूंवर शाह अब्रार हुसेन, निर्मलजीत सिंग आणि चांथून रथनक यांना बाद करून हॅट्ट्रिक पूर्ण केली. चौथा चेंडू डॉट होता. त्यानंतर मोंगदारा सोक आणि पेल वेनाक यांना बाद करून एका षटकात पाच बळी पूर्ण केले.

### चिन्नास्वामीमध्ये विजय हजारे चषक सामन्यास नकार

**बंगळुरू :** २४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे चषकाचे सामने आता बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळले जाणार नाहीत. सुरक्षिततेच्या कारणास्तव, येथे होणारे सर्व सामने बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये हलवण्यात आले आहेत. यासोबतच, बंगळुरूमध्ये स्पर्धेतील सर्व सामने बंद दारांमागे खेळले जातील, म्हणजेच चाहत्यांना प्रवेश नसेल. यापूर्वी दिलीप चषक आणि इंडिया ए चे सामनेही याच पद्धतीने आयोजित करण्यात आले होते.

### राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत 'एसव्हीसीएस'च्या मनस्वी मानेला ३ पदके



**सोलापूर :** एस.व्ही.सी.एस. हायस्कूल, एमआयडीसी येथील विद्यार्थिनी मनस्वी राजशेखर माने हिने दिल्ली येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत २ सुवर्ण व १ रौप्य अशी ३ पदकावली. तिला प्रशिक्षक व मार्गदर्शक मनीष भावसार, शाळेचे क्रीडा प्रमुख हणमंत येळमेली, आकाश बिराजदार व कालिका बोकडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विदयार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे काशी जगदगुरु डॉ. मल्लीकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी, मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोषकुमार तारके यांनी अभिनंदन केले.

# कोहली, रोहितकडून चांगल्या खेळीची अपेक्षा

**विजय हजारे चषकाचा लौकिक कायम ठेवणार**

**प्रसिद्ध खेळाडूंच्या उपस्थितीने उत्सुकता**

◆ **बंगळुरू, २३ डिसेंबर**

भारताचे तडाखेबंद फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यासह अनेक अव्वल भारतीय क्रिकेटपटूंच्या उपस्थितीने बुधवारपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेच्या लौकिकात भर घातली आहे. ही स्पर्धा या अनुभवी खेळाडूंना देशांतर्गत क्रिकेटवर पुन्हा लक्ष केंद्रित करेल आणि त्यांचे कौशल्य सिद्ध करण्याची संधी देईल.

विजय हजारे चषकामध्ये खेळणाऱ्या स्टार खेळाडूंमध्ये ऋषभ पंत, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव आणि अभिषेक शर्मा सारखी नावे आहेत. परंतु सर्वांच्या नजरा विराट कोहली आणि रोहित शर्मावर खिळल्या आहेत.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सर्व भारतीय क्रिकेटपटूंना विजय हजारे चषकामध्ये किमान दोन सामने खेळणे अनिवार्य केल्यामुळे कोहली आणि रोहित यांना देशांतर्गत स्पर्धेत आपले कौशल्य दाखवावे लागणार आहे. कोहली १५ वर्षांनंतर या स्पर्धेत खेळणार आहे. दोन्ही खेळाडूंनी क्रिकेट विश्वात नाव कमावले असले तरी क्रिकेट वेगाने बदलत असल्यामुळे त्याचा या खेळाडूंवर परिणाम होण्याची शक्यता आहे.



बंगळुरू येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये मंगळवारी सराव सत्रादरम्यान क्रिकेटपटू विराट कोहली आणि ऋषभ पंत

रोहितने स्पष्ट केले आहे की तो २४ आणि २६ डिसेंबर रोजी जयपूरमध्ये सिक्कीम आणि उत्तराखंड विरुद्ध मुंबईचे पहिले दोन सामने खेळेल.

कोहलीने भारताचे माजी फलंदाजी प्रशिक्षक संजय बांगर यांच्यासोबत सराव केला. तो दिल्लीसाठी कोणते दोन किंवा तीन सामने खेळेल हे त्याने अद्याप ठरवलेले नाही. दिल्ली एलिट ग्रुप डी मध्ये बंगळुरूमध्ये आंध्र विरुद्ध पहिला सामना खेळेल. हा सामना एम. चिन्नास्वामी स्टेडियम किंवा बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स येथे खेळला जाईल. त्यानंतर दिल्ली गुजरातशी लढेल. मंगळवारी रात्री कोहली बंगळुरूमध्ये आल्यापासून, तो दोन्ही सामने खेळेल अशी अटकळ बांधली जात आहे.

विजय हजारे ट्रॉफीमधील त्यांच्या निराशाजनक कामगिरीचा पुढील महिन्यात होणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यांसाठी त्यांच्या निवडीवर परिणाम होणार नाही, परंतु कोहली आणि रोहित यांच्या कामगिरीकडे सर्वांच्या नजरा आहेत. त्यांना आता तरुण खेळाडूंसोबत स्पर्धा करायची आहे.

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमधील प्रभावी कामगिरीमुळे गिलला भारताच्या टी-२० विश्वचषक संघातून वगळण्यात आले आहे आणि इशान किशनचा समावेश करण्यात आला आहे. हे कोहली आणि रोहित यांना सहज धावा करण्यात अपयश आल्यास त्यांचे काय होऊ शकते याचे गंभीर संकेत आहे. रोहित आणि कोहली व्यतिरिक्त, इतर अनेक वरिष्ठ खेळाडू या स्पर्धेत चांगली कामगिरी करण्यासाठी वचनबद्ध असतील. कसोटी संघात आपले स्थान पक्के करणारा परंतु मर्यादित षटकांच्या संघात स्थान मिळविण्यासाठी संघर्ष करणारा पंत त्यात असेल.

आगामी टी-२० विश्वचषकासाठी दुर्लक्षित झाल्यानंतर गिल आपला फॉर्म परत मिळवण्याचा प्रयत्न करेल. उजव्या हाताचा फलंदाज पंजाबकडून खेळून आपली निराशा दूर करण्याचा प्रयत्न करेल. ◀(वृत्तसंस्था)



# सोलापूर विद्यापीठाकडे प्रथमच कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धेचे यजमानपद

▸ **राज्यातील २० विद्यापीठांचे संघ भिडणार**

▸ **४ ते ८ फेब्रुवारी दरम्यान सोलापुरात रंगणार टी-२० थरार**

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. आगामी महाराष्ट्र आंतर विद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्याचा मान यंदा सोलापूर विद्यापीठाला मिळाला आहे.

ही स्पर्धा ४ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत पार पडणार असल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांनी दिली. सोलापूर विद्यापीठाला या राज्यस्तरीय स्पर्धेचे यजमानपद मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील १६ ते २० विद्यापीठांचे संघ सहभागी होणार आहेत.

| या चार मैदानांवर रंगणार सामने |
|---|
| १. इंदिरा गांधी पार्क स्टेडियम |
| २. रेल्वे मैदान |
| ३. दयानंद महाविद्यालय मैदान |
| ४. भंडारी मैदान, जुळे सोलापूर. |

विद्यापीठांमधील कायमस्वरूपी अधिकारी आणि कर्मचारी या क्रिकेट स्पर्धेत आपले कौशल्य पणाला लावतील. ही स्पर्धा साखळी आणि बाद अशा दोन्ही पद्धतींनी खेळवण्यात येईल. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंची आणि संघांची निवासाची सोय केगाव येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वसतिगृहात करण्यात आली आहे.



नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि पत्नी हिमानी मोर यांनी भेट दिली.

# भारतीय खेळाडूंच्या वर्तनाने पाकिस्तान संतप्त

**नवी दिल्ली, २३ डिसेंबर**

पाकिस्तानच्या १९ वर्षाखालील संघाने भारताविरुद्ध आशिया चषक जिंकला. रविवारी सामन्यादरम्यान भारतीय संघाने गैरवर्तन केल्याचा आरोप संघाचे मार्गदर्शक सरफराज अहमद यांनी केला. त्यानंतर, पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) प्रमुख मोहसीन नक्वी म्हणाले की ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) हा मुद्दा उपस्थित करतील.

त्यांनी भारतीय खेळाडूंचे वर्तन प्रक्षोभक असल्याचे वर्णन केले. रविवारी दुबईतील आयसीसी अकादमी मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात पाकिस्तानने भारताविरुद्ध शानदार कामगिरी केली. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने ८ बाद ३४७ धावा केल्या आणि नंतर भारताला २६.२ षटकांत १५६ धावांवर गुंडाळले आणि १९१ धावांचा मोठा विजय नोंदवला. या विजयासह, पाकिस्तानने १३ वर्षांत प्रथमच १९ वर्षाखालील आशिया चषक जिंकला.

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी अंडर-१९ संघासाठी आयोजित केलेल्या स्वागत समारंभात माध्यमांशी बोलताना नक्वी यांनी भारतीय खेळाडूंच्या वर्तनावर टीका केली. ते म्हणाले की, पाकिस्तान क्रिकेट बोर्ड हे प्रकरण औपचारिकपणे आयसीसीकडे उपस्थित करेल. त्यांनी कौन्सिलला खेळ आणि राजकारण वेगळे ठेवण्याचे आवाहन केले. नक्वी म्हणाले, अंडर-१९ आशिया चषकाच्या अंतिम सामन्यादरम्यान भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंना वारंवार चिथावणी दिली. पाकिस्तान या घटनेची तक्रार आयसीसीकडे करणार आहे.



# ठोकळ प्रशालेच्या अजिंक्य वसपटेची राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

भुवनेश्वर, ओडिसा येथे २६ ते ३१ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या १९व्या राष्ट्रीय सब-ज्युनिअर सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निर्मलाताई ठोकळ प्रशालेच्या अजिंक्य वसपटे याची निवड झाली. मलकापूर (बुलढाणा) येथे झालेल्या चाचणीतून त्याची निवड झाली. गवर्षी राष्ट्रीय सब-ज्युनिअर सॉफ्ट टेनिस स्पर्धेतही अजिंक्यने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. बारामती येथील शालेय राज्य स्पर्धेतही १७ वर्षाखालील गटात कांस्यपदक पटकाविले होते. अजिंक्यला सोलापूर टेनिस असोसिएशनचे सचिव संतोष गवळी यांच्या नेतृत्वाखाली सुधीर सालगुडे, महेश झांबरे, बालाजी केदार, चंद्रकांत वाघमोडे, प्रशांत केदार, शाळेचे क्रीडा मार्गदर्शक अर्जुन सुरवसे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पाताई ठोकळ व प्राचार्य श्री. डी. गाजरे यांनी अभिनंदन शुभेच्छा दिल्या.

# भारताच्या सोनल पाटीलचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

## जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन महिला आयटीएफ टेनिस स्पर्धा

**सोलापूर, २३ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए) व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन(एसडीएलटीए) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओअॅसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत जामश्री - इलिझियम सोलापूर ओपन २०२५ महिलांच्या ३० हजार रकमेच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत क्वालिफायर भारताच्या सोनल पाटील हिने अंजली राठीचा ५-७, ७-६(८), ६-४ असा संघर्षपूर्ण पराभव करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये पहिल्या फेरीत जपानच्या मिचिका ओझेकी हिने सातव्या मानांकित हिरोको कुवाटाचा ३-६, ६-४, ६-४ असा अनपेक्षित निकाल नोंदवला. रशियाच्या मारिया कल्याकिना हिने ग्रेट ब्रिटनच्या क्वालिफायर जिझेल माटोस सिक्वेरा फर्नांडिसचा ७-५, ६-२ असा पराभव केला.





सोलापूर : जिल्हा क्रीडा संकुलातील लॉन टेनिस कोर्टवर सुरु असलेल्या जागतिक महिला मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत दुहेरीच्या सामन्यात विजय मिळविल्यानंतर भारताची श्री वल्ली आणि वैदेही चौधरीचा टिपलेला क्षण. दुसऱ्या सामन्यात जपानच्या खेळाडू बॅकहॅन्ड मारताना टिपलेले छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)

रशियाच्या व्लादा मिन्चेवा हिने वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या पार्थसारथी मुंढेचे आव्हान ६-०, ६-२ असे मोडीत काढले. जपानच्या होनोका कोबायाशीने भारताच्या वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या पूजा इंगळेला ६-१, ६-० असे पराभूत केले. रशियाच्या एकतेरिना याशिनाने वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या लालित्या कल्लुरीवर ६-३, ६-४ असा विजय मिळवला. पात्रता फेरीतून मुख्य फेरीत प्रवेश केलेल्या रशियाच्या एना सेडीशेवाने जपानच्या मना कावामुराचा टायब्रेकमध्ये ७-६(३), ६-३ असा पराभव केला.

दुहेरीत पहिल्या फेरीत दुसऱ्या मानांकित वैष्णवी आडकर व अंकिता रैना यांनी पूजा इंगळे व मधुरिमा सावंत यांचा ६-२, ७-६(४) असा तर, भारताच्या चौथ्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती व वैदेही चौधरी यांनी बेलारूसच्या पोलिना बखमुतकिना व मारिया गोलोविनाव्सचा ६-२,६-२ असा पराभव करून आगेकूच केली. स्पर्धेचे उद्घाटन पोलीस आयुक्त एम राजकुमार, अखिल भारतीय लॉन टेनिस असोसिएशनचे अंतरिम महासचिव व एमएसएलटीएचे मानद सचिव सुंदर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंकज शहा , डॉ. शंतनू गांधी , डी राम रेड्डी , माधव देशपांडे , राजेश दमाणी , चैत्राली क्षीरसागर , एमएसएलटीएचे सह सचिव राजीव देसाई , आयटीएफ सुपरवायझर शितल अय्यर आदी मान्यवर उपस्थित होते.

**आज झालेले निकालः एकेरीः**

पोलिना बखमुतकिना (बेलारूस) वि.वि.एलिना नेपली (रशिया) ६-३, २-६, ७-५.अरुझान सगंडिकोवा (कझाकस्तान) वि.वि.साहिरा सिंग (भारत) ६-३, ६-३;

**दुहेरीः**

लुंडा कुम्होम/ तनुचापोर्न योंगमोड (थायलंड) वि.वि. आकांक्षा नित्तूरे(भारत)/ सोहा सादिक(भारत) २-६, ७-६(८), १०-५;

# पश्चिम बंगालचा श्रीजीत पॉल विजेता, पुण्याच्या ओम लामकानेस उपविजेतेपद

▸▸ **'रायसोनी मेमोरियल चषक'**

▸▸ **आंतरराष्ट्रीय गुणांकन जलद बुद्धिबळ स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा.**

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

जीएच रायसोनी यांच्या स्मरणार्थ जागतिक बुद्धिबळ संघटना, अखिल भारतीय बुद्धिबळ संघटना, महाराष्ट्र चेस असोसिएशन व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने जी एच रायसोनी स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशन अँड कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशन यांनी चॅम्प चेस स्कूलच्या सहकार्याने पहिल्या जीएच रायसोनी जलद आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेत पश्चिम बंगालचा आंतरराष्ट्रीय मास्टर श्रीजित पॉल याने उत्कृष्ट खेळ करत याने नऊ पैकी साडेआठ गुणांसह विजेतेपद आकर्षक चषक व रोख रु ३१००० चे पारितोषिक पटकाविले.

पुण्याचा ओम लामकाने, कोल्हापूरचा श्रीराज भोसले व ऋषिकेश कबनूरकर यांचे प्रत्येकी आठ गुण झाल्यामुळे सरस बुचोल्स गुणपद्धतीवर ओमने उपविजेतेपद व रोख २५ हजार श्रीराजने तिसरा क्रमांक व रोख २० हजाराचे पारितोषिक संपादिले.





ऋषिकेशने चौथा व रोख १५ हजारचे बक्षिस, पुण्याचा साहिल शेजल याने ७.५ गुणांसह पाचवा व रोख १० हजार व सोलापूरच्या मानस गायकवाड याने सहावा व रोख ८ हजार तर साताऱ्याच्या अनिकेत बापट याने सातवा क्रमांक व रोख ७ हजाराचे पारितोषिक प्राप्त केले.

येथील राजस्व नगरमधील चैत्राली लॉन्स अँड बँक्वेट हॉल मध्ये येथे अतिशय चुरशीने झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण पोलीस उपायुक्त राजन माने यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मध्य रेल्वेचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार, उद्योजक धनंजय बुरुडकर, प्रथमेश बुरुडकर, कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशनचे सचिव भुषण श्रीवास, सोलापूरचे अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, सोलापूर डिस्ट्रिक्ट असोसिएशनचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, व्यवस्थापकीय समिती समितीचे अतुल कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय पंच पवन राठी, उदय वगरे, राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. तसेच विविध वयोगटात मॅथिजन कावीन, अर्णव भस्मे, सिद्धी कर्वे, अमेय शिवपुजे, चंद्रकांत पवार, नितीन अग्रवाल, अभिषेक पाटील, अथर्व अलदर, सृष्टी गायकवाड, विक्रमादित्य चव्हाण, संस्कृती सुतार, सर्वेश पोदार, निखिल मालाटी, विवान सोनी, सृष्टी मुसळे, विजय विश्रुत, पृथा ठोंबरे यांनी उत्कृष्ट खेळ करत आपापल्या गटाचे अव्वल स्थान पटकाविले.

कोल्हापूरचा आंतरराष्ट्रीय कँडिडेट मास्टर अनिश गांधी, श्रीधर तावडे, सोलापूरचा सौरभ साहु, अपूर्व देशमुख, आदित्य सावळकर, तामिळनाडूचा एस विश्वेश्वरन, सोलापूरचा विशाल पटवर्धन व कर्नाटकचा आदर्श कदम यांनीदेखील उल्लेखनीय खेळ करत खुल्या गटात अनुक्रमे आठवा ते पंधरावा क्रमांक मिळविला. स्पर्धेत सहभागी झालेल्या दिव्यांग खेळाडूंना विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

### अंतिम निकाल अनुक्रमे गुण व बोकोल्स गुणांसह : सर्वोत्तम

**१६०१ ते १७०० :** केविन माथियाझागन, साहस नारकर, अथर्व रेड्डी

**१५०१ ते १६०० :** अर्णव भस्मे,सिद्धांत कोठारी,प्रथमेश इंगोले.

**१४०० ते १५०० :** सिद्धी कर्वे,माधवी देशपांडे, शौर्य मुप्पानेनी.

**बिगरमानांकितः** अमेय शिवपुजे,स्पर्श लव्हळे, जय अनेराव.

**वयस्करः** चंद्रकांत पवार,दिलीप कुलकर्णी,महादेव तुपे.

**सोलापूरः** नितीन अग्रवाल,साईराज घोडके,स्वप्निल हदगल.

**१९ ते ५४ वर्षेः** श्रेयस पाटील,रवींद्र निकम, इंद्रजीत महेंद्रकर.

**१९ वर्षे मुलेः** अथर्व अलदर, यशवंत उबाळे, आयान शेख. **मुलीः** सृष्टी गायकवाड, समीक्षा ठाकूर, वैष्णवी येलदी.

**१५ वर्षे मुलेः** विक्रमआदित्य चव्हाण, सानिध्य जमादार, वेद आगरकर. **मुलीः** संस्कृती सुतार, समृद्धी कटले, फराह शेख.

**१३ वर्षे मुलेः** सर्वेश पोद्दार,आदित्य गायकवाड, प्रसेनजीत ईश्वर. **मुलीः** मालती निर्मल, अनन्या उलभगत,अंजली अंकुश.

**११ वर्षे मुलेः** विवान सोनी,श्रेयश कुदळे,वेदांत कुलकर्णी. **मुलीः** सृष्टी मुसळे,हर्षिता भोसले, ईश्वरी माने.

**९ वर्षे मुलेः** विश्रुत विजय,नैतिक होटकर,आशुतोष कुलकर्णी. **मुलीः** ऋता ठोंबरे पृथ्वी हरपुडे.

**७ वर्षे मुलेः** अनिरुद्ध नगरकर,नियान कंदीकटला,कृष्णराज पटाले. **मुलीः** वेदिका कुलकर्णी, ईशा पटवर्धन, स्वरांजली जाधव.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### नवीन सुरू झालेल्या पंढरपूर-हैद्राबाद-तिरुपती रेल्वे सेवेचा लाभ घ्या

**ग्राहक पंचायतीचे प्रवाशांना आवाहन**

**पंढरपूर, दि. २३ डिसेंबर-**

नव्याने सुरू झालेल्या पंढरपूर -हैद्राबाद- तिरुपती साप्ताहिक रेल्वेगाडीस ग्राहक पंचायतीतर्फे हिरवा झेंडा दाखविण्यात आला. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे रेल्वे इंजिनचे पूजन करून रेल्वेच्या चालक, स्टेशन प्रबंधक, व इतर अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रायोगिक तत्त्वावर प्रत्येक रविवारी रात्री ८ वाजता पंढरपूर येथून हैद्राबाद मार्गे तिरुपतीला जाणाऱ्या साप्ताहिक विशेष रेल्वे सेवेचा जास्तीत जास्त प्रवाशांनी लाभ घ्यावा असे आवाहन ग्राहक पंचायतीतर्फे करण्यात आले. प्रवाशांनी चांगला प्रतिसाद दिला तरच ही गाडी पुढे कायमस्वरूपी चालू राहिल. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे शुभेच्छा देण्यासाठी रेल्वेच्या विभागीय सल्लागार समितीचे सदस्य विनोद भरते, अ.भा.ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास, उपाध्यक्ष विनय उपाध्ये, पंढरपूर तालुका अध्यक्ष नंदकुमार देशपांडे, सहसचिव आझाद अल्लापूरकर, सदस्य सतिश निपाणकर, विनोद शेंडगे, वैशाली शेंडगे, प्रशांत काकडे, स्थानिक सल्लागार समितीचे जेष्ठ सदस्य सुरेश लाड, स्टेशन प्रबंधक के. के. मिश्रा, चनगौडर, वाणिज्य प्रमुख अमोल जोशी, रेल्वे चालक सुब्रत गांगुली, सत्येंद्र प्रसाद, तिकीट निरिक्षक व प्रवासी उपस्थित होते.




### कोर्टीच्या सहाय्यक वनसंरक्षकपदी तुषार धुमाळ; ग्रामस्थांच्या वतीने सन्मान

**जेऊर, दि.२३ डिसेंबर-**

कोर्टी (ता.करमाळा) येथील तुषार त्रिशला विलासराव धुमाळ यांची सहाय्यक वन संरक्षक पदी नियुक्ती झाली आहे. या निवडीबद्दल कोर्टी ग्रामस्थांच्या वतीने दुरंदे गुरुकुल येथे सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावर करमाळा खरेदी खरेदी विक्री संघाचे चेअरमन तथा बाजार समितीचे संचालक शंभूराजे जगताप, प्रा. रामदास झोळ, माजी जि. प सदस्य सविता राजे भोसले, बारामती ग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे,माजी उपसभापती प्रा संजय जाधव, पो.नि.रणजीत माने, दिनेश मते, स्नेहल मते,नायब तहसीलदार प्रज्ञा केदार, माजी प. स. सदस्य नागनाथ लकडे, डॉ. अमोल दुरंदे, अजित विघ्ने, प्रा.सुहास गलांडे, गोसेवक परमेश्वर तळेकर, कोर्टीचे सरपंच प्रतिनिधी उपअभियंता श्रीरंग मेहेर, मेजर हनुमंत जाधव, उपसरपंच पुष्पा जाधव, माजी उपसरपंच नाना झाकणे, सुनील काळे, केंद्र प्रमुख आदिनाथ देवकाते, मुख्याध्यापक बब्रुवाहन मोरे, विशाल शहाणे, नानासाहेब मोहिते, दादासाहेब शिंदे, सुनील शिंदे, भारत क्षिरसागर उपस्थित होते. यावेळी सुभाष गुळवे, सुहास गलांडे, कर्जाचे माजी जि.प.सदस्य दादासाहेब कानगुडे, उपभियंता श्रीरंग मेहेर यांनीही आपले विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन सचिन नवले यांनी केले तर आभार सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक शहाजी धुमाळ यांनी मानले.

### शिवणे येथील श्रमसंस्कार शिबिरात वृक्षलागवड, स्वच्छता व व्याख्यान

**सांगोला, दि. २३ डिसेंबर-**

शिवणे (ता.सांगोला) येथे सांगोला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा दुसरा दिवस मंगळवारी उत्साहात पार पडला. सकाळच्या सत्रात शिवणे ते हालदहिवडी रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड करण्यात आली. लावलेल्या झाडांना संरक्षक जाळ्या बसवून त्यांच्या संवर्धनाची जबाबदारीही विद्यार्थ्यांनी स्वीकारली. यासोबतच गावातील सभागृह परिसर तसेच स्मशानभूमीची स्वच्छता करून स्वच्छ व आरोग्यदायी परिसराचा संदेश देण्यात आला. दुपारच्या बौद्धिक सत्रात शाश्वत विकास : संकल्पना, गरज आणि युवकांची भूमिका या विषयावर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.मच्छिंद्र वेदपाठक यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिमन्यू भाटेकर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी डॉ.रेणुकाचार्य खानापुरे, डॉ.सदाशिव देवकर, प्रा.विकास उबाळे, प्रा.अमोल ऐवळे, प्रा.प्रज्ञा काटे-उबाळे, प्रा. मयुरी दिघे, प्रशासकीय सेवक मारुती कोळी, महादेव काशीद यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### पांडुरंग शंकू

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**



राजेंद्र चौक येथील रहिवासी तथा कुरियर व्यावसायिक पांडुरंग रामचंद्र शंकू (वय ६०) यांचे सोमवार, दि. २२ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. मंगळवारी त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमीत संस्कार करण्यात आले.

### विश्वनाथ धरणे



**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

टिळक चौकातील प्रसिद्ध जमाखर्चाच्या वह्यांचे कारखानदार व शेळगी येथील रहिवासी विश्वनाथ धरणे (वय ८०) यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# वाळवंटातील दशक्रिया विधीचे ठिकाण बदलण्याची गरज

### नमामी चंद्रभागा योजनेचा उडाला बट्याबोळ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ डिसेंबर-**

पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचे ।। जन्मोजन्मांतरी हेचि घडो मज । मागणे श्रीहरि नाही दुजे ।। या भावनेने विठुरायाच्या दर्शनासाठी, पवित्र चंद्रभागेच्या स्नानाची पर्वणी लुटण्यासाठी भाविक येथे लाखोंच्या संख्येने येत असतात. येथील चंद्रभागेच्या पात्रात अगोदरच सर्वत्र घाणीचे साम्राज्य असताना त्या मध्ये आणखीन भर पडते ती दशक्रिया विधी नंतरचे आवास्तव पडलेले केस, पिंडदानासाठींचे भाताचे गोळे, चिंध्यांचे ढिगार्यांची. या मध्येच सर्वात कहर म्हणून दशक्रिया विधीचा भाग असलेले मुंडन केल्या नंतर वाळवंटात टाकून दिलेल्या ब्लेड किंवा रेजची पाने तसेच या पानांच्या अर्ध्या तुकड्यांमुळे अनवाणी प्रदक्षिणा पूर्ण करणाऱ्या भाविकांना कमालीचा त्रास सहन करावा लागतो.

येथील चंद्रभागेच्या पवित्र वाळवंटा मध्ये सगळीकडे चिंध्याचे ढिग, निर्माल्य, भग्न अवस्थेमधील देवदेवतांच्या मुर्ती, नारळाच्या शेंड्या, कुजलेल्या अवस्थेमधील अन्नांचे ढिग, द्रोणपत्रावळींचे पडलेले ढिग, भाविकांनी पहाटेच्या वेळी उरकलेले प्रातविधीचे कार्यक्रम यामुळे प्रचंड घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसून येते.



#### दशक्रिया विधी पात्रातील सुनियोजित जागेवर करावेत

वाळवंटातील पुंडलिक मंदिरा जवळ हे सर्व कार्यक्रम अगदी बिनदिक्कतपणे चाललेले असतात. त्यामध्ये पिंडदान, मयतांच्या नातेवाईक मंडळींचे मुंडण करणे अशा प्रकारच्या कार्यक्रमांची उघड्यावरच रेलचेल असते. त्यामुळे असे विधी चंद्रभागा नदीच्या एखाद्या सुनियोजित भागात केले जावेत. या बरोबरच नदीच्या पात्रात सर्रास म्हशी, गायी आदी जनावरे धुणे, भाविक किंवा शहरातील नागरिक आपली दुचाकी, चारचाकी गाड्यांची देखील नदीच्या पात्रात स्वच्छता करीत असतात.

#### चंद्रभागेचे नंदनवन होणार तरी कधी

एकीकडे आपल्या जवळ असलेल्या सातारा जिल्ह्यातील कराड येथील कृष्णा नदीच्या काठावरील प्रितिसंगमाचे यशवंतराव चव्हाणांच्या समाधी स्थळाचे तर दुसरीकडे देशातील कन्याकुमारी येथील अथांग पसरलेल्या समुद्राच्या संगमावरील विवेकानंदांच्या स्मारकाचे उदाहरण दिसत आहे. मात्र ही दोन्ही उदाहरणे डोळ्या समोर असताना महाराष्ट्राची दक्षिणकाशी आणि लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री विठुरायाची भुवैकुंठ नगरी समजल्या जाणाऱ्या चंद्रभागेच्या वाळवंटाचे आपण नंदनवन करु शकत नाही ही बाब अतिशय खेदाची आहे.

#### नमामी चंद्रभागा अभियानाचा उडाला बोजवारा

नमामी गंगेच्या धर्तीवर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमामी चंद्रभागा अभियानाची घोषणा केली. या योजनेसाठी काही कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करुन अगदी उगमा पासून ते राज्याच्या शेवटच्या टोकापर्यंत म्हणजे कर्नाटक राज्यापर्यंत वाहणाऱ्या चंद्रभागेचा विकास करण्याचे उद्दिष्ठ डोळ्या समोर ठवलेले होते. मात्र देवेंद्र फडणवीस आता पुन्हा मुख्यमंत्री झाले आहेत तरीही या योजनेला अद्यापही गती मिळाली नाही.

#### मृतांच्या नातेवाईकांची दररोज असते मांदियाळी

या मध्येच पवित्र वाळवंटा मध्ये दशक्रिया विधी करण्यासाठी मृतांच्या नातवाईक मंडळींची दररोज मोठी मांदियाळी होत असते. पांडुरंगाच्या येथील वास्तव्यामुळे पंढरपूर ही अध्यात्मिक नगरी किंवा देवभूमी म्हणून देखील प्रसिध्द आहे.त्यामुळेच फक्त सोलापूर जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्याच्या विविध भागातून तसेच परराज्यातून देखील मृतांच्या नातेवाईक मंडळींची येथीलव वाळवंटा मध्ये दररोज मोठी वर्दळ असते.

## चेक न वटल्याप्रकरणी ‘लोकमंगल’च्या कर्जदारास एक वर्षाचा कारावास

**दोन महिन्यांच्या आत ७ लाख भरण्याचे न्यायालयाचे आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

कर्जाच्या वसुलीपोटी दिलेला चेक न वटल्या प्रकरणी ९ वे अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी, सांगली यांच्या न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय देत कर्जदारास दोषी ठरवून एक वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच फिर्यादी पतसंस्थेला नुकसानभरपाई म्हणून ७,४५,८१९ रक्कम दोन महिन्यांच्या आत भरण्याचे निर्देश दिले असून, रक्कम न भरल्यास अतिरिक्त तीन महिन्यांच्या कारावासाची तरतूद केली आहे.

सविस्तर वृत्त असे की जयकुमार श्रीपती गवंडी, रा. मजरेवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांनी लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी ५,४५,००० रकमेचा धनादेश संस्थेकडे दिला होता. सदर धनादेश बँकेत सादर केल्यावर Funds Insufficient या कारणावरून तो न वटल्याचे न्यायालयासमोर सिद्ध झाले.

हे प्रकरण संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १८५८/२०२३ (CNR No. MHSN०३००३११०२०२२) अंतर्गत दाखल करण्यात आले होते. सुनावणीत आरोपीचा चेक अनादर झाल्याचे स्पष्टपणे निष्पन्न झाल्यामुळे माननीय न्यायालयाने आरोपीस चलनविषयक कायदा कलम १३८ तसेच दंड प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अंतर्गत दोषी ठरवून शिक्षा एक वर्षाच्या साधा कारावास व दोन महिन्याच्या आत ७,४५,८१९ रुपये भरण्याची शिक्षा ठोठावली आहे.

या निर्णयामुळे पतसंस्थांच्या कर्ज वसुलीपोटी खात्यावर बॅलन्स नसतानाही चेक देणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत तसेच सभासदांच्या ठेवींचे संरक्षण आणि संस्थेची विश्वासार्हता कायम राखण्यासाठी अशा प्रकारच्या थकबाकीदारांविरोधात कायदेशीर चौकटीत कठोर पावले उचलण्याचा संस्थेचा निर्धार यामुळे अधिक दृढ झाला आहे. कर्जदार व सभासदांनी कर्जाची परतफेड वेळेत करून कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन लोकमंगल पतसंस्थेच्या प्रशासनाकडून केले आहे. पतसंस्थेच्या वतीने ॲड. एस.एस. संकपाळ तर आरोपीच्या वतीने ॲड.डी.एम.वठारे यांनी काम पाहिले.

## प्रत्येक वाहनाची नियमाप्रमाणे तपासणी करावी

**स्थिर देखरेख पथक केंद्राची महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी केली पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

महापालिका निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता व निष्पक्षता राखण्यासाठी एसएसटी तपासणी केंद्रांची (स्थिर देखरेख पथक) भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, प्रत्येक वाहनाची नियमाप्रमाणे तपासणी करावी, कोणत्याही प्रकारची निष्काळजीपणा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. संबंधित अहवाल तात्काळ वरिष्ठ कार्यालयास सादर करावेत, अशा स्पष्ट सूचना आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज विजापूर रोड, होटगी रोड येथील स्थिर देखरेख पथक केंद्राची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार निवडणूक विभागाचे अधिकारी,




पोलीस विभागाचे प्रतिनिधी व संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

निवडणूक काळात आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, बेकायदेशीर रोख रक्कम, मौल्यवान वस्तू, दारू, साहित्य यांची वाहतूक रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा यावेळी घेण्यात आला.या पाहणीदरम्यान तपासणी केंद्रावर कार्यरत असलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांशी आयुक्तांनी चर्चा केली. शहरामधील प्रमुख मार्गांवर होणाऱ्या वाहतुकी संदर्भात तपासणी कशी केली जाते, वाहनांची तपासणी करताना कोणत्या बाबींची दक्षता घेतली जाते, संशयास्पद वाहतूक आढळल्यास करण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीबाबत माहिती त्यांनी घेतली.

### कलापिनी संगीत महोत्सवाचे आयोजन

**पंढरपूर, दि. २३ डिसेंबर-**

कलापिनी संगीत विद्यालयातर्फे कलापिनी संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामधे कलापिनी विद्यालयाचे संचालक विकास पाटील यांच्या विद्यार्थ्यांचे तबला- पखावज वादन व गायन मैफल होइल. त्यानंतर युके येथील प्रसिद्ध गायीका अस्मिता दिक्षीत यांचे शास्त्रीय गायन व अभंगवाणी कार्यक्रम होइल. त्यांना अविनाश पाटील( तबला), दादासाहेब नागणे( पखावज) ओंकार पाठक ( हार्मोनियम) हे साथ करतील. यावेळी आमदार अभिजीत पाटील, गुरु पंडीत दादासाहेब पाटील तसेच ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर उपस्थित राहतील. हा कार्यक्रम गुरुवारी (दि.२५ डिसेंबर) सकाळी ८:३० वा डी. व्हि. पी. स्केअर थिएटर, दुसरा मजला,के. बी. पी. कॉलेज रोड येथे होइल. प्रवेश सर्वांना विनामूल्य आहे.

## ॲडव्हेंचर पार्क येथील डीजे बंद करा

**वीरशैव व्हिजनचे पोलिस आयुक्तांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर- .**

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिर व शाह जहुर अली दर्गा शेजारी असलेल्या डव्हेंचर पार्क येथील डीजे बंद करण्याची मागणी वीरशैव व्हिजनच्या वतीने पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार यांच्या हस्ते व संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, सहकार्याध्यक्ष राजेश नीला, कार्यकारणी सदस्य गंगाधर झुरळे व सोशल मीडिया प्रमुख अमित कलशेट्टी यांच्या उपस्थितीत हे निवेदन देण्यात आले. महापालिकेने स्मार्ट सिटी अंतर्गत डव्हेंचर पार्क उभे केले. त्याचा हेतू हा होता कि लहान



मुलांना शांत अशा नैसर्गिक वातावरणात मनोरंजन, व्यायाम आणि निसर्गाच्या जवळ जाण्याचा अनुभव मिळावा. त्यासाठी तिथे झिपलाइन, रॉक क्लाइंबिंग, रोप कोर्सेस, अडथळ्यांच्या शर्यती उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पार्क चालवायला घेतलेल्या खाजगी व्यवसायिकाने मात्र त्या हेतूला सपशेल हरताळ फासला आहे. दररोज सांयकाळी कर्णकर्कश आवाजात डिजेवर चित्रपटातील अश्लील व विचित्र गाणी लावले जातात. त्यामुळे मंदिरातील शांतता व पावित्र्य भंग पावत आहे. तेथे मोठ्या आवाजात लावल्या जाणाऱ्या चित्रपटातील गाण्यांमुळे मंदिरातील भक्तांच्या ध्यान धारणेत व्यत्यय येत आहे. तसेच डव्हेंचर पार्क शेजारी शाह जहूर अली दर्गा हे प्रार्थनास्थळ आहे. तिथे सुद्धा प्रार्थनेसाठी येणाऱ्या भक्तांना या डीजेचा त्रास होत आहे. सोलापूरात पोलीस आयुक्तांनी डिजे बंदी केली आहे. तरीही त्यांच्या आदेशाची पायमल्ली डव्हेंचर पार्क येथे होत असल्याचे निदर्शनास येते. यामुळे पोलीस आयुक्तांनी डव्हेंचर पार्क येथील डीजे बंदी करावी अशी मागणी त्यांना करण्यात आली. त्यावर पोलीस आयुक्तांनी त्याची दखल घेतली जाईल असे आश्वासित केले.

## जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूका पूर्ण ताकदीने लढणार : प्रा. शटगार

**तभा वृत्तसेवा,**
**द. सोलापूर, दि. २३ डिसेंबर -**

सोलापूर जिल्हा काँग्रेस स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत होणाऱ्या जिल्हा परिषद,पंचायत समितीच्या निवडणुका पुर्वी झालेल्या नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणूकीत झालेला दगा फटका सुधारून काँग्रेस पक्ष माजी केंद्रीय गृहमंत्री मा. सुशीलकुमारजी शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण ताकतीने लढणार असल्याची माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा.सातलिंग शटगार यांनी दैनिक तरूण भारतशी बोलताना दिली.

नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नसले तरी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत वेगळ्या प्रकारची यंत्रणा राबवून सक्षम उमेदवारांना तिकीटे देऊन निवडणूका जिंकणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

प्रदेश पातळीवर आघाडी होण्याची शक्यता असून आघाडी झाली तर आघाडीने निवडणूक लढणार. आघाडी न झाल्यास काँग्रेस पक्ष जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्वच्या सर्व जागा लढवणार असल्याचे प्रा.शटगार यांनी दिली.

यावेळी सोलापूर जिल्हा व्ही. जे.एन. टी.विभागाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, अशोक देवकते, प्रा. सिद्राम सलवदे,अरुण पाटील,सुदर्शन आवताडे, सिद्राम पवार, सचिव महंमद शेख, माजी विरोधी पक्षनेते शिवानंद बिराजदार, किरण सुर्वे, दत्तात्रय गजबार, अविनाश मोरे, देवेंद्र सैनसाखळे उपस्थित होते.

## खरीप हंगामातील ई-पीक पाहणीसाठी ग्रामस्तरीय ‘समित्या गठित’

**● २४ डिसेंबरपर्यंत शेतकऱ्यांनी संपर्क साधावा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२३ डिसेंबर-**

राज्यातील खरीप हंगाम २०२५ मध्ये ज्या शेतकऱ्यांची ई-पिक पाहणी विहीत मुदतीत नोंद झाली नाही, अशा शेतकऱ्यांसाठी शासनाने ऑफलाईन पिक पाहणीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी दि. २४ डिसेंबर २०२५ पर्यंत आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले आहे.

ग्रामस्तरीय समितीकडून प्रत्यक्ष पाहणी प्रत्यक्ष करण्यात येणार असून, मंडल अधिकारी याचे अध्यक्ष असणार आहेत. या समितीमध्ये ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विकास अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांचा समावेश असणार आहे. ग्राम महसूल अधिकारी यांनी सदर अर्ज स्विकारुन त्यांची स्वतंत्र नोंदवहीत नोंद घ्यावी व संबंधित शेतक-यास पोहोच दयावी. प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने ग्राम स्तरीय समितीने संयुक्तपणे संबंधित शेतक-यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी ही दि.२५ डिसेंबर २०२५ ते




०७ जानेवारी २०२६ या कालावधीत करावी. सदर स्थळ पाहणी करण्यापूर्वी समितीने स्थळ पाहणीची दिनांक व वेळ निश्चित करुन त्यांची पूर्व कल्पना संबंधित शेतक-यांस शेताच्या बांधाला लागून असलेल्या किमान ४-५ शेतक-यांना लेखी स्वरुपात दयावी.

प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या दिवशी खरीप हंगाम २०२५ मध्ये प्रत्यक्षात शेतक-यांनी कोणत्या पिकाची लागवड केली होती त्यांची स्थानिक चौकशी करुन पीक नोंदणीच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक पंचनामा करावा व शेताच्या बांधाला लागुन असलेले इतर शेतक-यांचे जाब जबाब नोंदविण्यात यावेत.

सदर पंचनाम्यात शेतक-यांने शेतात पीक लावण्यासाठी खरेदी केलेले बी-बियाणे, खते इत्यादी अनुषंगिक बाबींच्या खरेदी पावत्या तपासून त्याबाबत पंचनाम्यात नमूद करावे. मागील वर्षाच्या खरीप हंगामाची पिक पाहणींची नोंद तपासून नमूद करावी. चौकशीअंती पिकांचे नाव व क्षेत्र पंचनाम्यात नमूद करावे.

स्थळपाहणीचा अहवाल मंडळ अधिकारी यांनी शासन निर्णयाव्दारे उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीस गावनिहाय एकत्रित स्वरुपात दि.१२ जानेवारी २०२६ पर्यंत सादर करावा. सदरच्या अहवालात खाते क्रमांक, खातेदाराचे नाव, गट कमांक, एकूण क्षेत्र, पिकांची नावे, पिकांचे क्षेत्र इत्यादी बाबी स्पष्टपणे नमूद कराव्यात, असेही म्हटले आहे.

**प्रांताधिकारी घेणार ग्रामस्तरीय समितीचा आढावा**

उपविभागीय अधिकारीस्तरीय समितीने ग्रामस्तरीय समितीचा दररोज आढावा घ्यावा. ग्रामस्तरीय समितीकडून प्राप्त झालेले स्थळ पाहणी अहवाल उपविभागीय अधिकारी स्तरीय समितीने तपासुन दि.१३ जानेवारी ते दि.१५ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हाधिकारी यांना सादर करावा. ग्रामस्तरीय समितीच्या कामकाजाबाबत तक्रारी अथवा हरकती आले असता आवश्यकता असल्यास फेरचौकशी करावी. ग्रामस्तरीय समितीच्या कामकाजाच्या दरम्यान प्रत्यक्ष गाव भेटी देऊन कामकाजाचा आढावा घ्यावा, असेही म्हटले आहे.

### २ लाख ३० हजार रुपयाचा मुद्देमाल चोरीस

**मंगळवेढा, दि. २३ डिसेंबर-**

ब्रम्हपुरी येथे कुटूंबिय बाहेरगावी गेल्याची संधी साधून चोरट्याने भरदुपारी जिन्यातून घरात प्रवेश करुन कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा २ लाख ३० हजार रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेला असल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी सुभाष विठ्ठल पाटील हे दि.१६ डिसेंबर रोजी नातेवाईक मयत झाल्याने त्यांच्या अंत्यविधीसाठी उस्मानाबाद जिल्ह्यात गेले होते. चोरट्याने भर दुपारी छतावरुन जिन्यातून घरात प्रवेश करुन कपाटात ठेवलेले १० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी,५ ग्रॅम वजनाची अंगठी, अडीच ग्रॅम वजनाची अंगठी, २ ग्रॅम वजनाचे गळ्यातील बदाम असे सोन्याचे दागिने व ३० हजार रुपये रोख असा एकूण २ लाख ३० हजार रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# महापालिका निवडणूक पहिल्याच दिवशी १०७४ नामनिर्देशन अर्जांची विक्री

## ●नॉर्थकोर्ट येथील कार्यालयात अर्ज घेण्यासाठी मोठी गर्दी
## ●मंगळवारी एकही उमेदवारी अर्ज दाखल नाही





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज पहिल्याच दिवशी विविध ७ निवडणूक कार्यालयाअंतर्गत उमेदवारी अर्ज घेण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. इच्छुक उमेदवार आणि प्रतिनिधींनी प्रत्येकी चार नामनिर्देशन पत्र घेतले. पहिल्याच दिवशी १ हजार ७४ नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली. आजरोजी माजी सभागृह नेते सुरेश पाटील, शिवानंद पाटील यांच्यासह माजी नगरसेवकांनी उमेदवारी अर्ज घेतले आहेत. दरम्यान, मंगळवारी एकही उमेदवारी अर्ज दाखल नाही.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या आदेशानुसार सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने नामनिर्देशन अर्ज विक्री व स्वीकारण्याची प्रक्रिया महानगरपालिका प्रशासनामार्फत नियोजित वेळापत्रकानुसार राबविण्यात येत आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सोमवार,२३ डिसेंबरपासून सुरु झाली आहे. २३ ते ३० डिसेंबर या कालावधीत दररोज सकाळी ११ ते ३ यावेळेत (सुट्टीचे दोन दिवस वगळून) अर्ज भरण्यासाठी एकूण सहा दिवस मिळणार आहेत.

नॉर्थकोर्ट प्रशालेत प्रभागनिहाय असे एकूण सात निवडणूक कार्यालयांची स्थापना करण्यात आली. त्या-त्या प्रभागातील अ, ब, क, ड या गटानुसार उमेदवारी अर्ज भरुन घेतले जात आहेत. याठिकाणी आचारसंहिता कक्षही तयार करण्यात आला आहे.




महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी येथील कार्यालयांची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, विद्युत अभियंता राजेश परदेशी, कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार आदी उपस्थित होते.

### उमेदवारी अर्जासोबत भरावी लागणारी अनामत रक्कम

सोलापूर महानगरपालिकेने निवडणुकीसाठी नॉर्थकोर्ट प्रशालेत ७ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्याकडे प्रत्येकी ४ प्रभागातील उमेदवारी अर्ज घेणे, दाखल करुन घेण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. प्रति अर्जाची किंमत १०० रुपये आहे. उमेदवारी अर्जासोबत खुल्या गटातील उमेदवारांना ५ हजार रुपये तर आरक्षित गटातील उमेदवारांना २ हजार ५०० रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे.

### प्रशासकीय इमारतीतील एक खिडकीवर झुंबड

महापालिकेने अर्ज दाखल करताना ज्या एनओसी घेणे गरजेचं आहे त्यासाठी एक खिडकी योजना महापालिका प्रशासकीय इमारतीमध्ये सुरु केली आहे. याठिकाणी चार खिडक्यांची सोय करण्यात आली आहे. मंगळवारी सकाळी मपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील एक खिडकीवर झुंबड उडाली होती.

### भारतरत्न डॉ.आंबेडकर पुतळा ते डफरीन चौक रस्ता वाहतुकीसाठी बंद

नॉर्थकोर्ट प्रशालेत उमेदवारी अर्ज घेण्यासाठी लोक रांगेत थांबले होते. यात महिलांचा समावेश अधिक प्रमाणात होता. पोलीस प्रशासनाने भारतरत्न डॉ.आंबेडकर पुतळा ते डफरीन चौक हा रस्ता एका बाजूने बॅरिकेटींग करून वाहनांसाठी बंद केला होता. सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत हा रस्ता बंद करण्यात आला. महापालिका आवारात तसेच स्मृती मंदिर आवारात पार्किंगची सुविधा करण्यात आली आहे. पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता.

| कार्यालयनिहाय विक्री झालेल्या अर्जांची संख्या | |
|---|---|
| ●निवडणूक निर्णय अधिकारी १ | १६७ |
| ●निवडणूक निर्णय अधिकारी २ | १९२ |
| ●निवडणूक निर्णय अधिकारी ३ | १३० |
| ●निवडणूक निर्णय अधिकारी ४ | १२० |
| ●निवडणूक निर्णय अधिकारी ५ | १७१ |
| ●निवडणूक निर्णय अधिकारी ६ | १२६ |
| ●निवडणूक निर्णय अधिकारी ७ | १६८ |

### १९ पानांचा उमेदवारी अर्ज

महापालिकेसाठी उमेदवारांना १९ पानांचा उमेदवारी अर्ज भरावा लागेल. पहिल्या चार पानांवर उमेदवाराचे संपूर्ण नाव, प्रभाग क्रमांक, जागा क्रमांक, राखीव प्रवर्ग, वैयक्तिक माहिती आणि उमेदवाराचा मतदार यादीतील तपशील, सूचक अनुमोदकाची माहिती आणि सही आदी माहिती भरावी लागेल. शपथपत्रामध्ये स्थावर आणि जंगम मालमत्तेची माहिती. १२ सप्टेंबर २००१ नंतर दोनपेक्षा जास्त अपत्ये नसल्याची माहिती द्यावी लागेल. अन्यथा हा उमेदवार अपात्र होऊ शकतो. उमेदवारावर दाखल असलेल्या गुन्ह्यांची आणि न्यायालयीन दाव्यांची माहिती जोडणे बंधनकारक आहे.

●सोलापूर विद्यापीठाचा स्तुत्य उपक्रम●

# नव्या वर्षात रंगणार ‘बहुभाषिक साहित्य संमेलन’

## ●कुलुगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांची माहिती; भाषिक देवाण, घेवाणीला मिळणार बळ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

सोलापूर शहर हे कर्नाटक आणि तेलंगणा राज्यांच्या सीमावर्ती भागात असल्याने येथे मराठीसह तेलगू आणि कन्नड भाषेचा मोठा प्रभाव आहे. सोलापूरची ओळख बहुभाषिकांची नगरी म्हणून आहे. हीच सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी वृद्धिंगत करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने आगामी नवीन वर्षात बहुभाषिक साहित्य संमेलन आयोजित करण्याचा संकल्प केला आहे.



विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी या उपक्रमाची माहिती दिली. यासंबंधी आधिक माहिती सांगताना कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले, या संमेलनाच्या निमित्ताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होणार आहे. युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, आता विद्यार्थी आणि शिक्षकांना त्यांच्या नियमित अभ्यासक्रमाव्यतिरिक्त एक अतिरिक्त भारतीय भाषा शिकणे बंधनकारक आहे. हे संमेलन या धोरणाला पूरक ठरेल. मराठीतील दर्जेदार साहित्य इतर भाषांत जावे आणि इतर भाषांमधील समृद्ध साहित्य मराठीत यावे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

यासाठी आयआयटीच्या सहकार्याने एका विशेष डिजिटल सॉफ्टवेअरची मदत घेतली जाणार आहे. हे संमेलन किमान तीन दिवसांचे असेल. विद्यापीठ परिसर किंवा शहरातील एखाद्या मध्यवर्ती ठिकाणी महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन केले जाईल. यासाठी लवकरच अभ्यास मंडळ आणि तज्ज्ञांची समिती स्थापन केली जाणार आहे.

### भाषिक सौहार्द वाढेल, साहित्याचा परीघ रुंदावेल

‘‘सोलापूरला मराठी, कन्नड, तेलगू आणि उर्दू साहित्याचा मोठा वारसा आहे. येथे प्रामुख्याने ४-५ भाषा आणि ८-९ बोलीभाषा बोलल्या जातात. या सर्वांना एका व्यासपीठावर आणल्यास भाषिक सौहार्द वाढेल आणि साहित्याचा परीघ रुंदावेल. विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख आणि अभ्यास मंडळांशी चर्चा करून या संमेलनाचे धोरण निश्चित केले जाईल. त्यानंतर विविध भाषांतील तज्ज्ञ, लेखक आणि अभ्यासकांना या उपक्रमात सहभागी करून घेतले जाणार आहे. ‘‘

**- प्रा. डॉ. प्रकाश महानवर, कुलगुरू**

# उद्योगपती जयकुमार पाटील यांच्या कार्याचे स्वावलंबन आणि लोकसहभाग हे सूत्र : डांगरे

## ●स्व.जयकुमार पाटील पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

उद्योगपती स्व.जयकुमारजी पाटील यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संस्थाची लोकसहभागातून भक्कम उभारणी केल्यामुळे सोलापूर शहरातील लोकजीवन समृद्ध झाले. त्यांनी आयुष्यभर साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचा आदर्श जोपासला म्हणून त्यांचे कार्य वंदनीय आहे, असे प्रतिपादन आई प्रतिष्ठानचे विश्वस्त मोहन डांगरे यांनी केले.

लक्ष्मी उद्योग समूहाचे संस्थापक स्व.जयकुमारजी पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उद्योजक डॉ.अशोक पाटील होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ.सुरेश ढेरे, प्राचार्य डॉ.राजेंद्रसिंह लोखंडे, सामाजिक कार्यकर्त्या वैशाली गुंड, मुख्याध्यापक मारुती मडवळी, भारत केत, उपप्राचार्य डॉ.किशोर पवार उपस्थित होते. मोहन डांगरे पुढे म्हणाले की, जयकुमार पाटील यांनी शहर विकासाचा ध्यास घेतला होता. त्यांनी डॉ.हेडगेवार रक्तपेढी स्थापना केली. त्यामुळे रुग्णांना जीवदान मिळाले. प्रभात चित्रपटगृह, पर्यटन आदी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. त्यामुळे सोलापूरकरांचे सांस्कृतिक विश्व समृद्ध झाले. लक्ष्मी उद्योग समूहाची स्थापना करून हरित क्रांती घडवून लाणाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात लक्षणीय परिवर्तन झाले.

उद्योजक डॉ.अशोक पाटील म्हणाले की, सोलापूरच्या जडणघडणीत योगदान देत असताना जयकुमारजींनी कौटुंबिक जबाबदारीदेखील समर्थपणे सांभाळली. आमच्यावर चांगले संस्कार केले. दर्जेदार शिक्षण दिले. त्यामुळे आम्हीदेखील सक्षम झालो. त्यांचे विचार व वारसा आमचे कुटुंबीय सातत्याने पुढे नेत आहेत. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी केले. सूत्रसंचालन मृदुला मोहोळकर यांनी केले. प्रा. देवराव मुंडे यांनी आभार मानले.

### नव उद्योजिका पुरस्कार वितरण

स्व.जयकुमारजी पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांच्यावतीने दिला जाणारा ‘स्व. जयकुमारजी पाटील नव उद्योजिका पुरस्कार’ यावर्षी मेघा मोहिते आणि अंकिता पवार या विद्यार्थिनींना प्रदान करण्यात आला. शिलाई मशीन, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

### शिक्षक व विद्यार्थिनींनी केले रक्तदान

दरम्यान स्व.जयकुमारजी पाटील यांच्या स्मरणार्थ डॉ. हेडगेवार रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास विद्यार्थिनी व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन रक्तदान केले. यासाठी डॉ. आनंद वैद्य, सौख्या देसाई, रूपाली लोंढे, राजू गुजर आणि पार्वती कोळी यांचे सहकार्य लाभले.



# शिवसेना ‘उबाठा’ने घेतल्या २२४ इच्छुकांच्या मुलाखती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**

आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना उबाठाच्या वतीने इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात येत आहे. शिवसेना उबाठाकडे मुलाखती देण्यासाठी उमेदवारांची गर्दी होत असून मंगळवारी २२४ इच्छुकांनी मुलाखती घेण्यात आल्या.

शिवसेना ‘उबाठा’च्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट रोडवरील ओंकार पार्क येथील अस्मिता व्हीजनच्या सभागृहात तर जिल्हाप्रमुख प्रा.डॉ.अजय दासरी यांच्या नेतृत्वाखाली अशोक चौक येथील शिवसेना भवन येथे मुलाखती घेण्यात आल्या. इच्छुक उमेदवार मोठे शक्तीप्रदर्शन, वाजत-गाजत मुलाखतस्थळी येत होते. इच्छुक उमेदवारांच्या समर्थकांनी भगवे फेटे, शेले परिधान करुन हाती मशाल चिन्ह घेवून शिवसेना झिंदाबाद... शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अमर रहे... पक्षप्रमुख उध्दव ठाकरे आगे बढो... अशा घोषणा देत होते.जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे, लोकसभा क्षेत्र प्रमुख दीपक गायकवाड, ज्येष्ठ शिवसैनिक प्रकाश वानकर आदींनी मुलाखतस्थळांला भेटी दिल्या. यावेळी समन्वय समितीचे प्रमुख पुरुषोत्तम बरडे, जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांच्यासह प्रताप चव्हाण, दत्ता गणेशकर, रमेश चौगुले, सदानंद येलूरे, नाना मोरे, बाळासाहेब गायकवाड, दत्ता माने, दत्तात्रय वानकर, महेश धाराशिवकर, प्रिया बसवंती, पूजा खंदारे, जयंत कदम, शशिकला चिवडशेट्टी, शरणराज केंगनाळकर, स्वाती रुपनर, प्रिती नायर, ॲड. सुरेश गायकवाड उपस्थित होते.



**मेरी ख्रिसमस...**
सोलापूर शहरातील कॅथोलिक चर्च सेंट जोसेफ येथे विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# गणेशवाडी परिसरात फिरणारा तो बिबटया नसून तरस प्राणी

**मंगळवेढा दि.२३ डिसेंबर-**

गणेशवाडी व लेंडवे चिंचाळे परिसरात बिबटया फिरत असल्याचा एक व्हिडीओ प्रसार माध्यमांवर प्रसारित झाल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून सदर ठिकाणी वन विभागाच्या पथकाने भेट देवून वस्तूनिष्ठ माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता ते ठसे बिबटयाचे नसून तरस प्राण्याचे असावेत असा अंदाज वन विभागाने व्यक्त करून नागरिकांनी दक्षता घ्यावे असे आवाहन करण्यात आले आहे.



दि.२३ डिसेंबर रोजी गणेशवाडी व लेंडवे चिंचाळे परिसरात एक बिबटया फिरत असल्याचा व्हिडीओ सर्व प्रसार माध्यमावर व्हायरल झाला होता.याबाबत तेथील पोलिस पाटील संजय मेटकरी यांनी वन विभागाच्या अधिकार्यांना कॉल करून बिबटया फिरत असल्याची माहिती दिल्यानंतर पंढरपूर विभागाच्या वन परिक्षक अधिकारी शितल चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल संतोष मुंडे,वनसेवक भागवत मासाळ आदींनी सदर ठिकाणी भेट देवून त्या ठशाची सुक्ष्म पाहणी केली असता ते ठसे तरस प्राण्याचे असावेत असा त्यांनी अंदाज व्यक्त केला.

# शेतकऱ्याच्या हत्येचा कट उघड

## ▸१२ लाखांची सुपारी, तीन बंदुका जप्तीच्या मार्गावर
## ▸ऑडिओ रेकॉर्डिंग व तोंडी कबुलीने डावाचा पर्दाफाश

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी, दि. २३ डिसेंबर-**

टेंभुर्णीपासून जवळच असलेल्या टाकळी (टें) (ता. माढा) येथील तालुक्यात खळबळ उडवणारा गंभीर प्रकार समोर आला आहे. शेतकरी सत्यवान रावसाहेब जरक (वय ३८) यांच्या हत्येसाठी १० ते १२ लाख रुपयांची सुपारी देऊन कट रचण्यात आल्याचा आरोप उघडकीस आला आहे.

या कटासाठी तीन बंदुका मिळवण्यात आल्याची माहिती असून, आरोपींनी ऐकवलेली ऑडिओ रेकॉर्डिंग व दिलेली तोंडी कबुली यामुळे हा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी टेंभूर्णी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा झाला आहे. फिर्यादी सत्यवान जरक (रा. टाकळी टें) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिवाळीपासून ते २२ डिसेंबर २०२५ या कालावधीत वेळोवेळी त्यांची हत्या करण्याचा कट रचण्यात आला. आरोपींनी खून केल्यास मोठी रक्कम मिळणार असल्याचे संभाषणात सांगितले होते. खून करण्यासाठी तीन बंदुका आणण्यात आल्याचेही रेकॉर्डिंगमध्ये स्पष्ट होत असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. वैभव विलास केसरे (वय २६, व्यवसाय ड्रायव्हर, रा.टाकळी (टें), वशिष्ठ कुंडलिक जाधव (वय ४९, व्यवसाय शेती, रा. टाकळी टें), प्रतापसिंह बिभिशण चंदनकर (वय ४७, मूळ रा.पटवर्धन कुरोली, ता.पंढरपूर; सध्या रा.आलेगाव बुद्धक, ता.माढा) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात पोलिसांनी फिर्यादीने नमूद केल्यानुसार, आरोपी वशिष्ठ जाधव व वैभव केसरे यांनी दिलेल्या तोंडी कबुली आणि ऐकवलेल्या रेकॉर्डिंगवरून आपला जीव धोक्यात असल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी तातडीने टेंभूर्णी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे या घटनेची माहिती उशिरा दिल्याने रात्री उशिरा टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही तक्रार २२ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ११.०२ वाजता नोंदविण्यात आली. तक्रार नोंदविण्याचे काम पोहेकॉ आरकिले यांनी केले. टेंभूर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वाती सुरवसे पुढील तपास करीत आहेत.

### पोलिसांचा सखोल तपास सुरू

या प्रकरणात ऑडिओ रेकॉर्डिंगची तांत्रिक पडताळणी, बंदुकांचा स्रोत, तसेच आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेण्याचे काम सुरू आहे. या कटामागे आणखी कोणी सहभागी आहेत का, याचाही शोध घेतला जात असल्याचे पोलीस निरीक्षक श्री. पवार यांनी सांगितले

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## बावची विद्यालयात जागतिक गणित दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ डिसेंबर -**

बावची विद्यालय, परंडा येथे प्रसिद्ध भारतीय गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती अर्थात जागतिक गणित दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



निमित्ताने विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध गणितीय मॉडेल्सचे आकर्षक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष बिभीषण रोडगे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस थोर गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे प्रमुख उपस्थित होते. या उपक्रमाचे आयोजन व मार्गदर्शन गणित शिक्षक सचिन मोरे, प्रमोद डोके, संदीप अनभुले, गरड व फासे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त...



### विशाल सूर्यवंशी यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लातूर येथील विभागस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतून विशाल सूर्यवंशी यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विभाग स्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये विशाल सूर्यवंशी यांच्यासह इतर पंचवीस स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता, ज्यांची निवड जिल्ह्यातून करण्यात आली होती. सारोळा जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक वनकळस, सावंत, शेषणी, राजेंद्र सूर्यवंशी, अनिता सूर्यवंशी, अटपळकर, सुनिता वडगावकर, राजेंद्र अंगरखे, प्रवीण वाघमारे आदींनी सत्कार करून शुभेच्छा देत अभिनंदन केले.



### शिक्षक परिषदेच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी शुभांगी पाटील

**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या महिला आघाडीच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी शुभांगी पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. रविवारी (दि.२१) शहरात झालेल्या बैठकीत शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष वेनुनाथ कडू यांच्या हस्ते शुभांगी पाटील यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महिला आघाडीच्या मराठवाडा प्रमुख पल्लवी गोरे, राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष रमेश गटकळ, संघटनमंत्री संतोष पोतदार यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीदरम्यान पल्लवी गोरे यांनी शुभांगी पाटील यांचे नाव जिल्हाध्यक्ष पदासाठी सुचविले, तर नयना जहागिरदार यांनी त्यास अनुमोदन दिले. नुतन जिल्हाध्यक्ष शुभांगी पाटील या धाराशिव शहरातील तेरणा हायस्कूल येथे सहशिक्षिका म्हणून कार्यरत असून, शैक्षणिक व संघटनात्मक क्षेत्रात त्या सक्रियपणे कार्यरत आहेत. याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.



### एकलव्य विद्या संकुल शूटिंग बॉलचा संघ राज्यास्तरीय स्पर्धेसाठी पात्र

**तुळजापूर, दि.२३ डिसेंबर -**

नांदेड येथे पार पडलेल्या विभागीय शूटिंग बॉल स्पर्धेमध्ये तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ यमगरवाडी एकलव्य विद्या संकुल एकलव्य आश्रम शाळा येथील विद्यार्थ्यांनी १७ वर्ष वयोगट मुलांमध्ये प्रथम क्रमांक मिळवत यश संपादन केले. या संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. या संघामध्ये सार्थक माळकर, काशिनाथ जाधव, रमेश बंडगर, योगेश पवार, वरद नरवडे, माळाप्पा मंडगे, अजित पाखरे, लक्ष्मीकांत दुधाळ, अनुज चव्हाण, ज्ञानराज चव्हाण व या खेळाडूंनी अतिशय उत्तम कामगिरी करून हे संपादन केले व या संघाची पुढे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व विजयी खेळाडूंचे व क्रीडा विभाग प्रमुख ज्ञानेश्वर भुतेकर, बालाजी क्षीरसागर, प्रशिक्षक यशवंत निंबाळकर, अध्यक्ष उद्धव काळे, कार्यवाह विवेक अयाचीत, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर, विठ्ठल म्हेत्रे, संस्थेचे संचालक मंडळ व क्रीडा समितीचे सर्व सदस्य व सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### शेतातील विद्युत साहित्य चोरी

**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील शिराढोण शिवारात शेतातील विद्युत साहित्य चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी संतोष बजरंग सोनवणे (वय ४८, रा. शिराढोण, ता. तुळजापूर) यांच्या शिराढोण शिवारातील शेत गट क्रमांक १९८ मधून स्टार्टर, तीन फ्युज तसेच सुमारे ३०० फूट तांब्याची वायर असा एकूण २९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल दि.२० डिसेंबर रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याचा आरोप आहे. या प्रकरणी फिर्यादी संतोष सोनवणे यांनी दिलेल्या खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

### शालुबाई उकरंडे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२३ डिसेंबर -**



तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील रहिवासी शालुबाई सुधाकर उकरंडे (वय ६५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना व नातवंडे असा परिवार आहे. गावातील स्वस्त धान्य दुकानदार सचिन उकरंडे, किराणा व्यापारी शेखर उकरंडे यांच्या त्या मातोश्री होत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी व बंधूंनी घेतले श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन

## पहाटे दीड वाजता कडक सुरक्षेत कुलधर्म-कुलाचार पूजा...

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२३ डिसेंबर -**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी सौभाग्यवती सौ. जशोदाबेन नरेंद्र मोदी आणि पंतप्रधानांचे बंधू अशोक मोदी यांनी मंगळवारी (दि. २३ डिसेंबर) पहाटे सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीचे कुलधर्म-कुलाचारानुसार पूजाअर्चा करून दर्शन घेतले.



मिळालेल्या माहितीनुसार, सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गोपनीयता पाळत कडक सुरक्षा बंदोबस्तात पुजारी भाऊसाहेब अमृतराव यांच्या हस्ते तुळजाभवानी देवीची कुलधर्म-कुलाचार महापूजा करण्यात आली. यावेळी सौ. जशोदाबेन मोदी व अशोक मोदी यांनी मनोभावे देवीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर पुजारी अमृतराव यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तुळजाभवानी देवीच्या दर्शनानंतर त्यांनी तुळजापूरपासून अवघ्या अडीच ते तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या सिंदफळ शिवारातील मुद्गलेश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या संपूर्ण दौऱ्यादरम्यान प्रशासनाकडून अत्यंत गोपनीयता पाळण्यात आली होती. या संदर्भात मंदिर प्रशासनाशी संपर्क साधला असता, प्रसारमाध्यमांना कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

मात्र शहरात व मंदिर परिसरात दिवसभर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी व बंधूंनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतल्याची चर्चा जोरात सुरू होती.

# तुळजापूरात खंडणीसाठी किडनॅप करण्याची धमकी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

तुळजापूर शहरात खंडणीसाठी धमकी देत मारहाण व शिवीगाळ केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपी प्रशांत कांबळे, बालाजी जाधव व बाबा शेख (रा. तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दि.२२ डिसेंबर रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास जुने बसस्थानकाजवळील चेतन वाईन शॉप परिसरात फिर्यादी अमर श्रीराम नाईक (वय ५२, रा. पंढरपुरकल गल्ली, तुळजापूर) व त्यांच्या मुलाला धमकावल्याचा आरोप आहे.

आरोपींनी फिर्यादीकडून ३,१०० रुपयांचा माल जबरदस्तीने घेऊन गेले तसेच दरमहा १०,००० रुपये हप्ता न दिल्यास त्यांच्या मुलाचे अपहरण करण्याची धमकी दिली.

यावेळी आरोपींनी फिर्यादीस



शिवीगाळ केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी फिर्यादी अमर नाईक यांनी दि.२२ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# परंडा तालुक्यात २२ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

परंडा तालुक्यातील एका गावात २२ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. पीडित तरुणी (नाव गोपनीय) ही दि.२२ डिसेंबर रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास शेतात जनावरांना चारा-पाणी करण्यासाठी गेली असता, गावातील एका तरुणाने तिच्या शेतात येऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.



तसेच आरोपीने पीडितेला शिवीगाळ करून, तुला जिथे जायचे आहे तिथे जा, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पीडितेने दिलेल्या प्रथम खबरेवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# तेरा वर्षांनंतर नरसिंह साखर कारखान्याला नवसंजीवनी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२३ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात, सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गालगत असलेला अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असलेला नरसिंह साखर कारखाना अखेर पुन्हा कार्यान्वित झाला आहे. सावंतांच्या भैरवनाथ ग्रुपने हा कारखाना ताब्यात घेतल्यामुळे तब्बल तेरा वर्षांनंतर कारखान्याला नवसंजीवनी मिळाली आहे.



भैरवनाथ ग्रुपकडून कारखाना पुन्हा कार्यान्वित; शेतकऱ्यांना दिलासा...

कारखाना दीर्घकाळ बंद असल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे बागायती ऊस क्षेत्र मोठ्या प्रमाणात बाधित झाले होते. तसेच स्थानिक उद्योग-व्यवसायही ठप्प अवस्थेत होते. मात्र भैरवनाथ ग्रुपच्या पुढाकारामुळे कारखाना पुन्हा सुरू झाल्याने परिसरातील उद्योग-व्यवसायांना चालना मिळाली असून शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे.

दि.२२ डिसेंबर रोजी नरसिंह साखर कारखान्याचा मोळी पूजन कार्यक्रम भैरवनाथ ग्रुपचे चेअरमन अनिल सावंत यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

यावेळी व्हाईस चेअरमन केशव सावंत, अण्णासाहेब देशमुख, बिभीषण खामकर, सत्यवान गपाट, शिवहार स्वामी, योगीराज फरताडे, सुधीर घोलप यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# श्री साई जनविकास कृषी महाविद्यालयात इमार्टिकस कंपनीचे कॅम्पस प्लेसमेंट

## आठ विद्यार्थ्यांची यशस्वी निवड...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

व्ही.पी. शैक्षणिक संकुलातील श्री साई जनविकास कृषी महाविद्यालयात नामांकित इमार्टिकस कंपनीच्या वतीने कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले. या प्लेसमेंट प्रक्रियेत महाविद्यालयातील भक्ती सुरेश चौधरी, वैष्णवी रमेश वाघ, राजेश्वरी प्रभू जाधवर, राजश्री लक्ष्मीकांत पाठक, सौरभ हनुमंत मदने, प्रीती प्रवीण पाटील, शिवानी सुधीर गव्हाणे आणि आश्लेषा सुरेश गोरे या आठ विद्यार्थ्यांची यशस्वी निवड करण्यात आली.



निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व करण पाटील यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी ज्ञानेश खोत (महाराष्ट्र हेड, इमार्टिकस कंपनी) यांनी विद्यार्थ्यांना करिअर संधी, उद्योगजगताच्या अपेक्षा व कौशल्यविकासाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तर हेमंत जगताप (मॅनेजर, इमार्टिकस कंपनी) यांनी निवड प्रक्रियेंतर्गत विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.एम. आर. शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.एच. पाटील होते.

त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाशी थेट संपर्क साधण्याची संधी मिळते तसेच रोजगाराच्या नवीन वाटा खुल्या होतात, असे प्रतिपादन केले.

या कॅम्पस प्लेसमेंट उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून महाविद्यालयाच्या प्लेसमेंट उपक्रमांना सकारात्मक चालना मिळाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, डॉ.ए.ए. गांधले, प्रा.एस.एन. पाटील, एन.ए. मुंढे, एम.टी. लोंढे तसेच इतर प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकरी हा देशाचा खरा कणा : व्यंकट वचने

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ डिसेंबर -**

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. स्वतः उपाशी राहून इतरांच्या पोटापाण्याचा विचार करणारा एकमेव घटक म्हणजे शेतकरी राजा. शेती करणे हे अत्यंत कष्टाचे काम असून त्या कष्टाचे चीज होईलच याची शाश्वती नसतानाही शेतकरी कधीही मेहनत करणे, उत्पादन घेणे थांबवत नाही, असे प्रतिपादन सहशिक्षक व्यंकट वचने यांनी केले.

स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्या मंदिर येथे भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरण सिंग यांचा जन्मदिवस शेतकरी दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सहशिक्षक व्यंकट वचने हे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार या उपस्थित होत्या.

पुढे बोलताना वचने म्हणाले की, शेती हा दुय्यम व्यवसाय नसून आजच्या काळाची गरज ओळखून केला जाणारा एक प्रामाणिक व महत्त्वाचा व्यवसाय आहे. आपल्या देशाचा खरा कणा शेतकरी राजा आहे. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती व्यवसाय स्वीकारला आणि त्यात प्रगती साधली, तर भारत अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत जगात अव्वल स्थान प्राप्त करू शकतो.

या कार्यक्रमास सहशिक्षक गोपाळ आष्टे, दत्तात्रय कोकणे, बेबी सरोजा पवार यांच्यासह सर्व शिक्षकवृंद व उपस्थित होते.

# तुळजाभवानी मंदिरात बनावट आयएएस अधिकाऱ्याचा प्रकार उघड; व्हीआयपी दर्शनासाठी खोटे ओळखपत्र

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ डिसेंबर -**

तुळजाभवानी मंदिरात व्हीआयपी स्पेशल गेस्ट दर्शन पास मिळवण्यासाठी आयएएस अधिकारी असल्याचे खोटे ओळखपत्र दाखवून कुटुंबासह व्हीआयपी दर्शनाचा लाभ घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका बनावट आयएएस अधिकाऱ्याला मंदिर प्रशासन व सुरक्षा यंत्रणेच्या सतर्कतेमुळे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.



मंदिर संस्थानकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.२३ डिसेंबर रोजी निखिल मदनलाल परमेश्वरी (रा. शहागड) याने आपण आयएएस अधिकारी असल्याचे सांगत तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी व्हीआयपी न्हानीजवळील गेटमधून दर्शनास सोडण्याची मागणी केली. यावेळी कर्तव्यावर असलेले सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पराडे यांनी त्याच्याकडील ओळखपत्र तपासले व त्याला मंदिर प्रशासकीय कार्यालयातील जनसंपर्क विभागात नोंद करून तेथून अधिकृत दर्शन पास घेण्यास सांगितले.

दरम्यान, सुरक्षा निरीक्षकांनी संशय व्यक्त करत ही माहिती दूरध्वनीद्वारे मंदिराचे जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे यांना दिली. त्यानंतर देशपांडे यांनी संबंधित व्यक्तीची कसून चौकशी केली असता तो बनावट आयएएस अधिकारी असल्याचे उघड झाले. चौकशीदरम्यान, आपण पंढरपूर येथे दर्शन करून आलो असून तेथे व्हीआयपी दर्शनाची परवानगी मिळाल्याचा दावा त्याने मंदिर प्रशासनाकडे केला.

तपासणीदरम्यान त्याच्याकडील आयडी कार्डमध्येही गंभीर त्रुटी आढळून आल्या. आयडी कार्डवरील कॅप्टन व उत्तराखंड या शब्दांचे स्पेलिंग चुकीचे असल्याचे मंदिर अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. यामुळे संशय अधिक बळावला.

कसून चौकशीनंतर संबंधित व्यक्ती बनावट असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर निखिलच्या वडिलांनी मंदिर प्रशासनाची माफी मागितली. व्हीआयपी दर्शनाचा गैरफायदा घेण्यासाठी रचलेला हा कट मंदिर संस्थानच्या अधिकाऱ्यांनी वेळीच उधळून लावला.

यानंतर मंदिर पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्जुन चौधर यांच्या ताब्यात बनावट आयएएस अधिकारी निखिल परमेश्वरी याला त्याच्या कुटुंबासह देण्यात आले असून पुढील कारवाई सुरू आहे.


Shri Sai Janvikas Prtishthan's
**Wellness College of Physiotherapy**
NH- 52, Chha. Sambhajinagar Road, Alani, Gadpati, Dharashiv
Mo.9359098612, 9552517057, 7709332341

**College Code :- 06382** **University College Code :- 164117**
(Approved By : Govt.of Maharashtra & Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik.)

Email : wellnessphysio2021@gmail.com, Web : www.wellnessbpth.in

ADMISSION A.Y. - 2025-26

Application are invited on Prescribed application format along with all necessary copy of Certificates from the Eligible Students for the following Seats. Schedule of Online Institutional Round for BPTh course only for Academic year 2025-2026. Admission process of BPTH courses INSTITUTIONAL ROUND - I will be completed as per the schedule given in Notice No.32. Date: 11-12-2025 [Institutional Round] to fill the seats round are given below.

| SR. NO. | QUOTA | SEAT | CATEGORY WISE SEAT |
|---|---|---|---|
| 1 | STATE QUOTA | 0 | — |
| 2 | INSTITUTE QUOTA | 6 | — |

Last Date of aplication is : 27/12/2025

Sd/-
**Principal Wellness College of Physiotherpay, Dharashiv**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दुर्मिळ पोस्ट कार्ड तिकिटांचे प्रदर्शन

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, २३ डिसेंबर :** येथील यशवंत विद्यालयात कला विभागामार्फत भारतीय डाक विभागाच्या वतीने 'ढाई आखर' राष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धा व दुर्मिळ व ऐतिहासिक पोस्टाच्या तिकिटांचे आकर्षक प्रदर्शन भरविण्यात आले.

विद्यालयातील ९०० विद्यार्थ्यांनी या पत्रलेखन स्पर्धेत सहभाग नोंदविला. व अडीच हजार विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. सदरील प्रदर्शनात स्वातंत्र्यलढा, महापुरुष, ऐतिहासिक घटना, वन्यजीव, विज्ञान-तंत्रज्ञान तसेच सांस्कृतिक वारसा दर्शविणारी तिकिटे विद्यार्थ्यांसाठी मांडण्यात आली होती.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना टपाल व्यवस्थेचा इतिहास, तिकिटांचे महत्त्व व छंद म्हणून फिलेटलीची ओळख झाली. डाक विभागाचे अधिकारी डाक निरीक्षक, उदगीर उपविभाग भुरके,विपणन अधिकारी, लातूर विभाग सोनटक्के,पोस्टमास्टर, अहमदपूर पोस्ट ऑफिस भालचंद्र अलापुरे, डाक आवेक्षक, उदगीर उपविभाग रंगराव बुरकुले यांनी तिकिटांची माहिती देत टपाल सेवांचे कार्य व आजच्या डिजिटल युगातील बदल यावर मार्गदर्शन केले.

सन १९७२ पासून दुर्मिळ पोस्टाच्या तिकिटांचा संग्रह करणारे डॉक्टर कुलभूषण मोतीलाल कंडारकर व डॉक्टर माधुरी कंडारकर या दाम्पत्यांनी आजतागायत पाच हजार पेक्षा जास्त तिकिटांचा संग्रहाचे दर्शन विद्यार्थ्यांना घडविले.

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर सर्वप्रथम १९४८ रोजी महात्मा गांधी यांचे पोस्टाचे तिकीट काढण्यात आले हे तिकीट आज प्रदर्शनास पाहायला मिळाले. महात्मा गांधीजींच्या जीवन चरित्रावर १२० तिकिटांचा संग्रह सुद्धा या प्रदर्शनात दिसून आला.अयोध्या येथील राम मंदिरांचे पोस्टांचे तिकीट, गुरुता गदी तीनशे वर्षे पूर्ण झाल्यामुळे पोस्टाचे तिकीट, भारतातील प्रसिद्ध किल्ले, लेण्या, वास्तु, चित्रकला, लघुचित्रशैली,भारतातील विविध लोककला, लोकसंस्कृती, विविध पोशाख, वन्य प्राणी, भारतीय तीनही सैन्य दलातील महत्वपूर्ण घटनांचे तिकीट या प्रदर्शनात होते.

आजतागायत हयात असणारे डाक विभागामार्फत आठ व्यक्तींचे पोस्टाचे तिकीट काढण्यात आले. यापैकी पहिल्यांदा १९५८ या इसवीसनामध्ये धोंडो केशव कर्वे यांचे पोस्टाचे तिकीट काढण्यात आले. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचे १९५५ साली तिकीट काढण्यात आले, डॉक्टर राजेंद्र प्रसाद १९६२, डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन १९५४, डॉक्टर व्यंकट वऱ्हागिरी १९७५, राजीव गांधी १९९१, मदर टेरेसा १९८० आणि सचिन तेंडुलकर १४ नोव्हेंबर २०१३ रोजी तिकीट काढण्यात आले.

हा ऐतिहासिक व दुर्मिळ पोस्टाच्या तिकिटाचा प्रदर्शन विद्यालयात घडवून आणण्यासाठी उपक्रमशील कलाशिक्षक महादेव खळुरे यांनी मोलाची भूमिका बजावून विद्यालयातील २५०० विद्यार्थ्यांना या भारतीय कला संस्कृतीचे पोस्टाच्या तिकिटातून दर्शन घडविले. या प्रदर्शनास विद्यार्थी-शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.प्रास्ताविक महादेव खळुरे सूत्रसंचालन डॉ. शरद करकनाळे तर अध्यक्षीय समारोप व आभार माधव वाघमारे यांनी केले.

वरील उपक्रमाबद्दल डायटचे प्राचार्य मारोती सलगर, शिक्षणाधिकारी दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, संस्थेचे सचिव डी. बी.लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव डॉ. सुनिता चवळे,प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे,पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सुर्यवंशी आदींनी अभिनंदन व कौतुक केले.

# अनंत कदम यांच्या वाचक संवाद चळवळीचा रावसाहेब पाटील साहित्य पुरस्काराने गौरव

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २३ डिसेंबर :** प्रसिद्ध कथा कादंबरीकार सुरेंद्र पाटील यांनी आपल्या वडिलांच्या नावाने रावसाहेब पाटील साहित्य पुरस्कार ठेवला आहे. साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साहित्यिक, संस्था किंवा व्यक्तीसाठी पाच हजार रुपये, सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप असून त्यासाठी कसलीही प्रवेशिका, निवड समितीचे अवडंबर नाही. पुरस्कारप्राप्त व्यक्तीपर्यंत जाऊन हा पुरस्कार सन्मानपूर्वक दिला जातो. २०२६साठी हा पुरस्कार २००७पासून चला कवितेच्या बनात माध्यमातून वाचन चळवळीचे कार्य करणाऱ्या अनंत चंपाई माधव कदम यांना जाहीर केल्याचे सुरेंद्र पाटील यांनी कळवले आहे.



अनंत कदम हे एक उपक्रमशील शिक्षक असून त्यांनी वाचन चळवळीची गरज लक्षात घेऊन जून २०११ पासून 'वाचक संवाद' हा उपक्रम सुरु केला तो आजही समविचारी मित्रांना घेऊन अखंडपणे चालू आहे. आत्तापर्यंत ३५१ वक्त्यांनी त्यांच्या या उपक्रमात हजेरी लावलेली आहे. म्हणजेच ३५१ पुस्तकावर ३५१ संवादकांनी 'वाचक संवाद' मध्ये संवाद साधलेला आहे. त्यांच्या या

**अनंत कदम यांना रावसाहेब पाटील साहित्य पुरस्कार-२०२६ जाहीर**

यशस्वी उपक्रमशीलतेमुळे त्यांची निवड केल्याचे सुरेंद्र पाटील यांनी सांगितले.

येत्या जानेवारीमधे त्यांच्या घरी जाऊन अनंत कदम यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान केला जाणार आहे. या पुरस्काराने अनंत कदम यांच्या कार्याची दखल घेतल्याने सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे



# गांधी महाविद्यालयात स्पर्धा व व्याख्यान

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, २३ डिसेंबर :** मानवी जीवनामध्ये गणिताला अत्यंत महत्त्व असून, ज्यांना गणित जमते त्यालाच आयुष्याचे गणित सोडवता येते. म्हणून विद्यार्थ्यांनी गणित विषयाला आपला मित्र मानून त्याच्याशी दोस्ती करावी आणि स्वतःमधील रामानुजन् जागवावा असे मत डॉ प्रशांत सुतकर यांनी व्यक्त केले.

२२ डिसेंबर हा थोर गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन् यांचा जन्मदिवस संपूर्ण भारतात राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. याचेच औचित्य साधून येथील विचार विकास मंडळ संचालित महात्मा गांधी महाविद्यालयातील गणित विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांचे पोस्टर सादरीकरण स्पर्धा व व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सायन्स कॉलेज नांदेड येथील डॉ प्रशांत सुतकर हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना गणित विषयाचे मानवी जीवनातील असलेले महत्त्व विविधप्रकारे स्पष्ट केले. कार्यक्रमास आवर्जून उपस्थित असलेल्या श्रीमती रश्मी थोरात (इटली) यांनी देखील विद्यार्थ्यांना 'ज्ञान हेच शक्तीशाली शस्त्र आहे.' असा अनमोल सल्ला दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांनी अध्यक्षीय भाषणातून रामानुजन् यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. मंचावर डॉ. ए. पी. कांबळे, डॉ. ए. जी. जाधव, डॉ. आर. एम. कदम, डॉ. के. एन. शिवलकर, कु. सय्यद अख्तर, प्रा. बी. यू. मंगरूळकर उपस्थित होते.

गणित विभागातर्फे दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यातील विजेत्यांची प्रमाणपत्रे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ. बी. यू. मंगरूळकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. सुरनर सुप्रिया व कु. भदाडे साक्षी यांनी करून दिला. सूत्रसंचालन कांबळे मानसी आणि कु. केसराळीकर अस्मिता यांनी केले. डॉ. के. एन. शिवलकर यांनी आभार मानले.

कार्यक्रमासाठी डॉ. सी. टी. लोंढे, डॉ. आर. बी. देसाई, प्रा. डी. डी. कदम, डॉ. ए.आर. कराड, डॉ. एस.आर. होळकर, डॉ. आर. डी. भामरे, डॉ. एस. आर. सुळसुळे,, डॉ. राजश्री जाधव, प्रा. डी. जी. पुरी, प्रा. वळसंगे, प्रा. जांबेकर, प्रा. आकांक्षा कदम, तसेच श्री पी. बी. मुंडे यांनी परिश्रम घेतले.

# लाल बहादूर शास्त्री विद्यालयात गणित दिन

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २३ डिसेंबर :** लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस गणित दिन म्हणून मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा मारावार, रामेश्वर मलशेट्टे विद्यार्थिनी भक्ती देवनाळे पर्यवेक्षक किरण नेमट माधव मठवाले अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे सहप्रमुख निलेश मांडवकर उपस्थित होते. याप्रसंगी गणित प्रदर्शनीचे उद्घाटन व हस्तलिखिताचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी रामेश्वर मलशेट्टे यांनी रामानुजन



यांचा एकूणच जीवन प्रवास व व्यावहारिक जीवनात गणित विषयाचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. श्रीनिवास रामानुजन यांनी गणितीय विश्लेषण, संख्या सिद्धांत अनंत मालिका यासारख्या गणिताच्या अनेक शाखांमध्ये मोठे योगदान दिले. त्यांनी हजारो प्रमेय आणि सूत्रे स्वतःहून शोधलीअशी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

अध्यक्षीय समारोपामध्ये कृष्णा मारावार यांनी सर्व विद्यार्थ्यांना गणित दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखिताचे कौतुक केले व गणित या विषयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे असे विशद केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रास्ताविक व आभार विद्यार्थीनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख रामेश्वर मलशेट्टे, नीता मोरे व विद्यालयातील सर्व गणित शिक्षकांनी पुढाकार घेतला.

# उजनीत १६० रुग्णांची मोफत मोतीबिंदू तपासणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, २३ डिसेंबर :** तालुक्यातील उजनी येथे समता फाउंडेशन, जिल्हा सामान्य रुग्णालय लातूर, शंकर शेठ साबळे नेत्र रुग्णालय सोलापूर व श्री शिवछत्रपती सेवा प्रतिष्ठान उजनी यांच्या संयुक्त विद्यमाने निशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे श्री संत गणेशनाथ मंदीर सभागृहात आयोजन करण्यात आले. यामध्ये १६० रुग्णांनी तपासणी करण्यात आली. यापैकी ३४ रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे दिसून आले असून निशुल्क शस्त्रक्रिया दि.३१ डिसेंबर रोजी सोलापूर येथे करण्यात येणार आहे.

या नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीरात उजनी,एकंबी,उजनीतांडा,एकंबीतांडा येथील रुग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी अनेक रुग्णावर उपचार करण्यात आले. तर ३४ रुग्णांना मोतीबिंदू झाल्याचे दिसून आले. या रुग्णावर सोलापुर येथील शंकरसेठ साबळे नेत्र रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती शिवछत्रपती प्रतिष्ठाणचे



अध्यक्ष प्रवीण कोपरकर यांनी यावेळी दिली.

प्रतिष्ठानचे अण्णाराव कोपरकर, पद्मकुमार जंगमे,सुरेश रेकणे, पांडुरंग ढवन, प्रल्हाद कोपरकर, श्याम सूर्यवंशी, अभिजीत कोपरकर, संजय रंदवे, दिलीप कागे, अण्णाराव सगट व गणेशनाथ सेवा मंडळ यांनी शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला होता.यापुढील काळाची गरज पाहून आगामी काळात मोठ्या प्रमाणात शिबिराचे आयोजन करून निशुल्क मोतीबिंदू शस्त्रक्रिया करणार असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण कोपरकर यांनी सांगितले.



# यशवंतराव पाटील यांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, २३ डिसेंबर :** देवणी पंचायत समितीचे माजी उपसभापती यशवंतराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रहात्या घरी त्यांचा यथोचित सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस (एनसीपी) मनोज कन्नाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोबत सत्कार करताना देवणी तहसीलचे तहसीलदार सोमनाथ वाडकर , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अनिलराव कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा युवक सरचिटणीस प्रताप कोयले, होनाळी गावचे माजी सरपंच औंदबर पांचाळ आणि कोतवाल बिजापुरे सह अदिंची उपस्थिती होती.

# आशिव येथे संत गाडगे महाराजांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, २३ डिसेंबर :** तालुक्यातील आशिव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत संत गाडगे महाराजांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले.

संत गाडगे महाराजांनी लोकांना स्वच्छता, शिक्षण, साधेपणा आणि माणुसकीची सेवा, अंधश्रद्धा, व्यसने, मूर्तिपूजा, जातीयवाद यांसारख्या सामाजिक कुप्रथांविरुद्ध आवाज उठवला आणि देव दगडात नाही, माणसात आहे तसेच गरिबांची आणि गरजूंना मदत करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे, असे शिकवले. त्यांनी 'स्वच्छता ही सेवा आहे' असे सांगून गावे आणि घरे स्वच्छ ठेवण्याचा आग्रह केला. तसेच स्वच्छता हे सामाजिक शिस्तीचे प्रतीक मानले. असे मार्गदर्शन यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना कराण्यात आले.

संत गाडगेबाबा स्वतः निरक्षर असूनही, त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि शिक्षणासाठी ताटे विका पण शाळा शिका असा उपदेश केला होता.याचबरोबर त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलणाचे कार्य करून पोथी-पुराणे, चमत्कार आणि अंधश्रद्धांवर विश्वास न ठेवता, विवेकी बनण्याचा सल्ला दिला होता. तसेच जातिभेद, अस्पृश्यता मानू नका, असे सांगून सर्वांनी माणुसकीने वागण्याचे आवाहन केले होते.

दीन-दुबळ्यांची, अनाथ आणि अपंगांची सेवा करणे हेच खरे पुण्य असल्याचे त्यांनी सांगितले होते अशी माहिती केंद्र स्तरीय विशेष शिक्षक सचिन वळके यांनी याप्रसंगी दिली.त्यानंतर प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गाण्यावर कवायतीचा सराव घेण्यात आला. यावेळी विशेष शिक्षक सचिन वळके, मुख्याध्यापक महादेव गरड, बालाजी कांबळे, मोनिका शिंदे, दैवशाला पवळे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# हजरत ख्वाजा नख्शबंदींचा संदल सोहळा उत्साहात

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, २३ डिसेंबर :** औसा शहरातील ऐतिहासिक आणि प्रसिद्ध दर्गा हजरत ख्वाजा नख्शबंदी यांचा वार्षिक संदल सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

या धार्मिक उत्सवात शहरातील नागरिक आणि भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.पारंपारिक पद्धतीने निघाली संदल मिरवणूक काढण्यात आली. यावर्षी संदलची सुरुवात सायंकाळी पाच वाजता दर्गा चे सज्जादे सय्यद खाजा मुजफ्फर अली हाशमअली इनामदार नख्शबंदी यांच्या निवासस्थानापासून फुलांनी सजवलेली संदलची मिरवणूक महादेव गल्ली, गांधी चौक, भूसारवेस या मार्गाने मार्गस्थ होत दर्गा शरीफपर्यंत पोहोचली. मिरवणुकीदरम्यान 'ख्वाजा नख्शबंदी' यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला.

दर्गा परिसरात मिरवणूक पोहोचल्यानंतर परंपरेनुसार सर्व सज्जादे आणि प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत सय्यद मुजफ्फर अली



हाशमअली इनामदार नख्शबंदी यांच्या हस्ते हजरत ख्वाजा नख्शबंदी यांच्या मजारवर पवित्र चादर चढविण्यात आली. यावेळी देश आणि शहराच्या शांतता व समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली.

या संदलमध्ये, सय्यद खाजा मजहर अली खाजामिया इनामदार, सय्यद खाजा मुजफ्फर अली हाशम अली इनामदार, सय्यद खाजा झुल्फिकार अली अब्दुल मन्नान इनामदार,सय्यद खाजा झुल्फिकार अली रझा अली इनामदार, सय्यद खाजा मुजबोद्दीन खुदबोद्दीन अली इनामदार, सय्यद खाजा मोईज अली खालेक अली इनामदार, सय्यद खाजा शकील गरीब नवाज इनामदार,सय्यद खाजा सदरोद्दिन बाहोद्दीन इनामदार, सय्यद खाजा असलम अली मजहर अली इनामदार, सय्यद खाजा गयाजोद्दीन बाहोद्दीन इनामदार, सय्यद खाजा जाकेर रऊफ आली इनामदार. यावेळी सर्व हजरत ख्वाजा बाहोद्दीन नख्शबंदीचे लहान मोठे सज्जादे उपस्थित होते.

सर्व भावीकांचे शहरातून आलेल्या असंख्य मानक-यांचे भावीकांचे सय्यद खाजा मुजफ्फर अली हाशमी अली इनामदार नख्शबंदी परिवारातर्फे आभार व्यक्त करण्यात आले.यावेळी या सोहाळ्याचे विशेष मानकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ घेण्याचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**येरोळ, २२ डिसेंबर :** येरोळ (ता. शिरूर अनंतपाळ) परिसरातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या हमीभाव योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन येरोळ येथील उपसरपंच सतीश भैय्या शिंदाळकर यांच्या वतीने करण्यात येत आहे. सध्याच्या बाजार परिस्थितीत शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा, या उद्देशाने ते सातत्याने शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत.

येरोळ परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्याकडे उपलब्ध असलेले सोयाबीन ऑनलाईन नोंदणी करून घ्यावे, जेणेकरून महाराष्ट्र शासनाच्या नाफेडमार्फत सोयाबीन खरेदी होऊ शकेल, अशी माहिती शेतकऱ्यांना दिली जात आहे. या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना सध्याच्या बाजारभावापेक्षा प्रतिक्विंटल सुमारे ८०० ते ९०० रुपयांपर्यंत अधिक दर मिळण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, उपसरपंच सतीश शिंदाळकर हे स्वतः ऑनलाइन सेंटर वरती व खरेदी केंद्रावर उपस्थित राहून शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणीबाबत मार्गदर्शन करत आहेत. राम गणपत बालवाड, सिद्धेश्र्वर भुसारे, भिमराव सुमठाणे, दिलीप पालकर दैठणा येथील राजनारायण बिरादार, गोविंदराव पाटील, अशा अनेक शेतकऱ्याकडून आज ऑनलाईन करण्यात आले.

शिरूर अनंतपाळ तालुक्यात शिंदाळकर फार्मा प्रोड्युसर कंपनी ही शेतकऱ्यांची व्यक्तिगत पातळीवर काळजी घेणारी, विश्र्वासार्ह खरेदी केंद्र म्हणून ओळख निर्माण करत असल्याची चर्चा शेतकरी वर्गात सुरू आहे. शासनाच्या योजनांचा थेट लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी करण्यात येणाऱ्या या प्रयत्नांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या उपक्रमामुळे येरोळ परिसरातील शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळण्यास मदत होत असून, भविष्यातही अशाच प्रकारे शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रयत्न सुरू राहावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उमरगा पोलीसात तीन वाहनचालकांवर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -** उमरगा पोलीस ठाणे हद्दीत दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी माणकेश्वर शिवारातील शेत गट क्रमांक ६३४ येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या वाहने उभी केल्याप्रकरणी तीन वाहनचालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
आरोपी रसुल उमर शेख (वय २५, रा. रामनगर उमरगा), सचिन सतीश सोनटक्के (वय २९, रा. महादेव गल्ली उमरगा) व विनोद दिनकर जाधव (वय ३९, रा. तुरोरी, ता. उमरगा) यांनी अनुक्रमे ऑटो रिक्षा व मॅझिक एक्सप्रेस वाहने धोकादायकरीत्या उभी केल्याचे आढळून आले. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम २८५ मोवाका अन्वये उमरगा पोलीस ठाण्यात स्वतंत्र तीन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.



# धाराशिव जिल्ह्यात शेत व पाणंद रस्ते मिशन मोडवर पूर्ण होणार

## जानेवारीपासून युद्धपातळीवर कामे : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -** धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना दळणवळणाच्या मूलभूत सुविधांचा दर्जेदार लाभ मिळावा, यासाठी जिल्ह्यातील शेत व पाणंद रस्ते मिशन मोडवर पूर्ण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी येत्या जानेवारी महिन्यापासून युद्धपातळीवर सुरू होणार असून, यासाठी मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पुढाकार घेतला आहे.

जिल्ह्यात मिशन मोडवर हाती घेण्यात आलेल्या शेत व पाणंद रस्त्यांच्या कामांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) तसेच जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अंतर्गत लोकसहभागातून शेतकऱ्यांचा ५० हजार रुपयांचा सहभाग आणि शासनाचा १ लाख रुपयांचा वाटा अशा पद्धतीने निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. तसेच रोजगार हमी योजनेच्या माध्यमातूनही शेत व पाणंद रस्त्यांसाठी निधी मिळणार आहे.

महायुती सरकार शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सकारात्मक असून, जानेवारी महिन्यापासून हे काम मिशन मोडवर हाती घेतले जाणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी स्पष्ट केले आहे. शेतकरी बांधवांना मूलभूत सुविधांच्या अभावामुळे भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन शेत व पाणंद रस्त्यांची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी व संबंधित यंत्रणांना शेत व पाणंद रस्त्यांच्या कामांची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले आहे.

शेत रस्त्यांच्या कामांमध्ये कुणाकडून अडथळा निर्माण केल्यास संबंधित तहसीलदारांकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच या संदर्भात काही अडचण असल्यास ८८८८६२७७७७७ या क्रमांकावर व्हॉट्सअॅप किंवा कॉल करून तक्रार नोंदविण्याचे आवाहनही आमदार पाटील यांनी केले आहे.

### जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा : आ. पाटील



राज्याचे महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला असून, शेत व पाणंद रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. मिशन मोडवर सुरुवातीला रस्ते मोकळे करण्यात येणार असून, त्यामध्ये कोणी आडकाठी आणत असल्यास संबंधित तहसीलदारांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यानंतर लोकसहभागातून ५० हजार रुपये व शासनाच्या १ लाख रुपयांच्या निधीतून मातीकाम करण्यात येणार आहे. पुढील टप्प्यात रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

# तुळजापूर नगर परिषदेत अश्विनी रोचकरी यांची विजयाची हॅट्रीक

## सलग तिसऱ्यांदा प्रचंड मताधिक्याने नगरसेविका पदावर निवड



**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -** तुळजापूर नगर परिषदेच्या नगरसेविका पदासाठी अश्विनी विशाल रोचकरी यांनी सलग तिसऱ्यांदा प्रचंड मताधिक्याने विजय मिळवत विजयाची हॅट्रीक साधली आहे. त्यांच्या या दणदणीत यशामुळे तुळजापूर शहरात समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नगरपरिषद निवडणुकीत सुरुवातीपासूनच प्रभाग ११ मधून अश्विनी रोचकरी यांना नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळताना दिसून आला. मतमोजणीअंती त्यांनी प्रतिस्पर्धी उमेदवारावर १३६८ इतक्या मोठ्या फरकाने विजय मिळवला. विकासकामे, नागरिकांच्या दैनंदिन समस्या, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, महिला व युवकांसाठी उपक्रम अशा विविध विषयांवर त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कामाचा हा कौल असल्याचे नागरिकांमध्ये बोलले जात आहे. या विजयामागे श्री तुळजाभवानी मंदिर पाळीकर पुजारी मंडळाचे अध्यक्ष तथा समाजसेवक विशाल रोचकरी यांचे भक्कम नेतृत्व आणि जनसेवा कार्य महत्त्वाचे ठरले आहे. सामाजिक, धार्मिक आणि लोककल्याणकारी उपक्रमांमधून विशाल रोचकरी यांनी जनतेशी निर्माण केलेले विश्वासाचे नाते हे अश्विनीताईंच्या विजयाचे प्रमुख कारण मानले जात आहे.

अश्विनी रोचकरी यांनी नगरसेविका म्हणून आपल्या कार्यकाळात सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. कोणताही भेदभाव न करता सर्व घटकांसाठी काम करण्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली. त्यामुळेच मतदारांनी पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास व्यक्त करत सलग तिसऱ्यांदा निवडून दिले आहे. विजयानंतर बोलताना अश्विनी रोचकरी यांनी तुळजापूरच्या सर्व मतदारांचे आभार मानत, हा विजय माझा नसून तुळजापूरच्या जनतेचा आहे. पुढील काळात शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने काम करणार, असा विश्वास व्यक्त केला.

या विजयाच्या निमित्ताने तुळजापूर शहरात फटाके फोडून, मिठाई वाटून आणि जल्लोषात आनंद साजरा करण्यात आला. विविध सामाजिक, राजकीय व धार्मिक संघटनांकडून अश्विनी रोचकरी आणि विशाल रोचकरी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत नवउद्योजकांना अनुदान

**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. लाभार्थ्याने १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर व बँकेकडून ७५ टक्के कर्ज मंजूर झाल्यास उर्वरित १५ टक्के रक्कम राज्य शासनामार्फत फ्रंट एन्ड सबसिडी स्वरूपात देण्यात येणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, सचिन कवले यांनी केले आहे.

## डिकसळ येथील रेशन दुकानाची पर्याय व्यवस्था कळंब येथे; नागरिकांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२३ डिसेंबर -** डिकसळ येथील शासकीय रेशन दुकानाची पर्याय व्यवस्था कळंब येथे देण्यात आल्यामुळे डिकसळ परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही पर्याय व्यवस्था तात्काळ रद्द करून डिकसळ येथीलच शिधापत्रिकाधारकांना गावातच धान्य मिळावे, अशी जोरदार मागणी दयावान प्रतिष्ठानचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य इम्रान मुल्ला, मोबीन मणियार आणि अभय गायकवाड यांनी डिकसळच्या वतीने केली आहे.

डिकसळ येथील शासकीय रेशन दुकान क्रमांक २ ची पर्याय व्यवस्था कळंब येथील रेशन दुकानावर देण्यात आली आहे. त्यामुळे डिकसळमधील नागरिकांना धान्य घेण्यासाठी लांब अंतराचा प्रवास करावा लागत आहे. विशेषतः वृद्ध, महिला व गरीब नागरिकांसाठी ही व्यवस्था अत्यंत गैरसोयीची ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय संबंधित रेशन दुकानदाराकडे आधीच तीन पर्याय व्यवस्था असल्यामुळे डिकसळ येथील शिधापत्रिकाधारकांना वेळेवर धान्य मिळण्यात अडथळे येत आहेत. या पार्श्वभूमीवर कळंब येथे दिलेली पर्याय व्यवस्था तात्काळ रद्द करून डिकसळ येथील शिधापत्रिकाधारकांना डिकसळमधीलच योग्य रेशन दुकानावर पर्याय व्यवस्था देण्यात यावी, अशी मागणी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## धाराशिव बसस्थानकात प्रवाशाची पर्स चोरी; ६० हजारांचा मुद्देमाल लंपास




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -** धाराशिव बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत एका प्रवाशाची पर्स चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी शिला अविनाश रेणके (वय ५०, रा. तडोळा, ता. आळंद, जि. गुलबर्गा) या दि.२१ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ११.४० वाजण्याच्या सुमारास धाराशिव बसस्थानक येथे भुम-हैद्राबाद जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना त्यांच्या पर्समधील सोन्या-चांदीचे दागिने व घड्याळ असा सुमारे ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेऊन चोरून नेल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी फिर्यादी शिला रेणके यांनी दि.२२ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालयाचा७ वा वर्धापनदिन व गौरव पुरस्कार सोहळा २५ डिसेंबरला



मा. दामोदर पतंगे जीवन गौरव | मा. वसंतराव नागदे सहकार रत्न | डॉ. दीपक पोफळे समाजरत्न | मा.अनिल जगताप कृषीरत्न | मा. सतीश पवार उद्योगरत्न | मा.बालाजी बिराजदार पत्रकाररत्न | मा. रामजी सोळुंके शिक्षकरत्न | सौ. भाग्यश्री औरादे ग्रंथ सेवा



मा.विशाल काणेकर कला रत्न | मा. महादेव शिंदे उत्कृष्ट वाचक | मा. गौरी कांबळे संगीतरत्न

### यंदाचे गौरव पुरस्कार मानकरी

**डॉ. दामोदर पतंगे** - जीवन गौरव, **वसंतराव नागदे** - सहकाररत्न, **डॉ. दीपक पोफळे** - समाजरत्न, **अनिल जगताप** - कृषिरत्न, **बालाजी बिराजदार** - पत्रकाररत्न, **रामजी साळुंखे** - शिक्षकरत्न, **भाग्यश्री औरादे** - ग्रंथ सेवा, **सतीश पवार** - उद्योगरत्न, **विशाल काणेकर** - कलारत्न, **महादेव शिंदे** - उत्कृष्ट वाचक, **गौरी कांबळे** - संगीत रत्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ डिसेंबर -** प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुळज येथे डिसेंबर २०१८ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालयाला यंदा सात वर्षे पूर्ण होत आहेत. या कालावधीत वाचनालयाने उमरगा-लोहारा तालुक्यातील ग्रामीण भागात उल्लेखनीय कामगिरी करत आजपर्यंत १३ शाखा कार्यान्वित केल्या आहेत. तसेच एक वाचन टपरी व दोन वाचन कट्टे नियमितपणे चालवले जात आहेत.

वाचनालयाच्या वतीने सामाजिक उपक्रम राबवण्यासह उमरगा-लोहारा तालुक्यात सामाजिक, उद्योग, शिक्षण, शेती, साहित्य, पत्रकारिता, कला, क्रीडा, सहकार आणि वाचन चळवळ या क्षेत्रांत विशेष योगदान देणाऱ्या व्यक्तींचा दरवर्षी गौरव पुरस्कार देऊन सन्मान केला जातो.

वाचनालयाच्या सातव्या वर्षपूर्तीनिमित्त गौरव पुरस्कार वितरण सोहळा गुरुवार, दि.२५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता, शांताई मंगल कार्यालय, उमरगा येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे येथील प्रसिद्ध लेखक, अर्थतज्ञ व डाव्या-पुरोगामी चळवळीतील ज्येष्ठ नेते कॉ. अजित अभ्यंकर हे राहणार असून, वाचन संस्कृती, संविधान आणि आपण या विषयावर ते उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

या सोहळ्याचे दीपप्रज्वलन उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. प्रवीण स्वामी यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

गुणी रत्नांचा गौरव करणारी ही अखंड व गौरवशाली परंपरा नागरिकांतून मोठ्या प्रमाणावर कौतुकास पात्र ठरत असून, या सोहळ्यास मित्रपरिवार व कुटुंबियांसह उपस्थित राहावे, असे आवाहन गौरव पुरस्कार सोहळ्याचे संकल्पक ड. शीतल चव्हाण व आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## २२ जानेवारीपर्यंत मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२३ डिसेंबर -** उमरगा तालुक्यातील येणेगुर गावात ग्रामपंचायतीमार्फत स्वच्छतेची कामे होत नसल्याने तसेच सार्वजनिक गटारी तुंबलेल्या अवस्थेत असल्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. यासह अनेक नागरी समस्या कायम असल्याने त्यांचे तात्काळ निराकरण करण्याच्या मागणीसाठी मंगळवार, दि. २३ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य तथा तंटामुक्त समितीचे उपाध्यक्ष अप्पू हिप्परगे यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले.

या आंदोलनादरम्यान तालुक्याचे गटविकास अधिकारी यांनी घटनास्थळी उपस्थित राहणे अपेक्षित होते. मात्र ते जिल्हाधिकाऱ्यांसोबत असल्याने वेळ मिळू शकला नसल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक लक्ष्मण कांबळे तसेच उपसरपंच बाबा गायकवाड यांनी येत्या २२ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व मागण्यांचे पूर्ण निराकरण करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. येणेगुर गावातील अशोकनगर, जिल्हा परिषद शाळा परिसर, हनुमान मंदिर रोड, करिबसवेश्वर मठ, मुस्लिम कब्रस्तान, विठ्ठल मंदिर परिसर तसेच आठवडी जनावरांच्या बाजार परिसरात अस्वच्छता, तुंबलेल्या गटारी, रस्त्यावर सांडपाणी साचणे व नादुरुस्त वीजपुरवठा अशा विविध नागरी समस्या आढळून येत आहेत.

या आंदोलनास शरण गावकरे, मोहन माळी, सिद्धेश्वर स्वामी, नरसिंह बिराजदर, मुरूम बाजार समितीचे संचालक भीमाशंकर स्वामी, सतीश मुदकन्ना, सागर पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य संदीप बिराजदर, विजयकुमार सोनकटाळे, अशोक माळी, दिलीप संगशेट्टी, महेश माने, प्रकाश कलशेट्टी, महादेव बिराजदर, शिवाजी गायकवाड, सतीश गायकवाड, बालाजी पोफळे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## युवकांसाठी मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम कौशल्य अभ्यासक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -** उद्योग क्षेत्राला आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे तसेच युवक-युवतींना रोजगाराच्या संधी वाढाव्यात, या उद्देशाने राज्य शासनामार्फत मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम कौशल्य अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत.

या योजनेंतर्गत दरवर्षी सुमारे ७५ हजार युवक-युवतींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालयांमध्ये आयटी, ड्रोन तंत्रज्ञान, खेळ, सायबर सुरक्षा, सोलार टेक्निशिअन, मोबाईल रिपेअर, ग्राफिक डिझाइन, टुरिझम व हॉस्पिटॅलिटी आदी आधुनिक अभ्यासक्रमांचे कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## खरीप २०२५ : ई-पीक पाहणी नोंद न झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा

### उमरगा तालुक्यात ऑफलाईन पाहणीचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ डिसेंबर -** राज्यातील खरीप हंगाम २०२५ मध्ये विहित मुदतीत ई-पीक पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची ऑफलाईन पाहणी करण्याबाबत महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाने दि.१४ डिसेंबर रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या निर्णयामुळे उमरगा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

शासन निर्णयानुसार, ई-पीक पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची ऑफलाईन पाहणी करण्यासाठी संबंधित मंडळ अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांची ग्रामस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांना काही कारणास्तव खरीप हंगाम २०२५ मध्ये पिकांची नोंद करता आली नाही, अशा शेतकऱ्यांनी दि.१७ डिसेंबर ते २४ डिसेंबर या कालावधीत आपल्या गावच्या ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे पीक नोंदणीसाठी अर्ज सादर करावा व अर्जाची पोहोच घ्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी उमरगा दत्तु शेवाळे व तहसीलदार उमरगा गोविंद येरमे यांनी केले आहे.



प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने ग्राम स्तरीय समिती संयुक्तपणे संबंधित शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन दि.२५ डिसेंबर २०२५ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत प्रत्यक्ष स्थळपाहणी करणार आहे. स्थळपाहणीपूर्वी समितीकडून पाहणीची तारीख व वेळ निश्चित करून त्याबाबतची लेखी पूर्वसूचना संबंधित शेतकरी तसेच शेताच्या बांधालगत असलेल्या किमान चार ते पाच शेजारील शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

प्रत्यक्ष पाहणीदरम्यान खरीप हंगाम २०२५ मध्ये शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष कोणत्या पिकाची लागवड केली होती, याबाबत स्थानिक चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक पंचनामा करण्यात येणार असून शेजारील शेतकऱ्यांचे जबाबही नोंदविण्यात येणार आहेत. ज्या शेतकऱ्यांची पीक नोंदणी यापूर्वी गाव नमुना १२ वर प्रतिबिंबित झालेली नाही, अशा शेतकऱ्यांसाठी ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

तरी उमरगा तालुक्यातील सर्व संबंधित शेतकऱ्यांनी दिलेल्या कालावधीत अर्ज सादर करून या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## प्रतिनिधी नेमणे आहेत...

सोलापूर तरुण भारत

### धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट त्वरीत नेमणे आहेत...

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-१ (कमिशनवर) येडशी, तेर, ढोकी, कसबे तडवळे, बेंबळी, पाटोदा, पळसप, मुरुड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, आरळी (बु.), मंगरूळ, काटगाव, किलज, सलगरा, वागदरी, नंदगाव.

**लोहारा तालुका :** लोहारा तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, सास्तुर, जेवळी, आष्टा, अचलेर, माकणी

**उमरगा तालुका :** नाईचाकुर, समुद्राळ, मुरूम ग्रामीण, बलसुर, येणेगुर, दाळींब, आलुर, बेळंब, कदेर, औराद, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, माडज, जेकेकुर.

**कळंब तालुका :** कळंब तालुका प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, चोराखळी, रांजणी, शिराढोण, डिकसळ, इटकूर.

**वाशी तालुका :** पार्डी, सरमकुंडी, अजनसौंडा, गिरवली, पारगाव, हातोला, पारा, दसमेगाव, मांडवा, गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, आसू, कात्राबाद, सोनारी, डोंजा, अनाळा, रोहकल.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, माणकेश्वर, वांगी ब्रु, वालवड, अंभी, पाथरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा.
**टीप-** इच्छुक वार्ताहरांनी कागद पत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस यावे. (अटी शर्ती लागू)

**: कार्यालय पत्ता :**
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय,रामदासी निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.

**- अनिल आगलावे**
(जिल्हा प्रतिनिधी), संपर्क मो.नं. ९७६७०९९७११

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## होर्डींग्ज लावताना प्राधिकरणाची परवानगी बंधनकारक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. ही निवडणूक संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत.

त्यानुसार निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच त्या निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या ग्रामीण क्षेत्रामध्ये निवडणूक कालावधीत होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, जाहिरात लावताना स्थानिक प्राधिकरणाची परवानगी बंधनकारक राहणार आहे. तसेच परवानगी संपल्यानंतर इमारती, मालमत्ता पूर्ववत करून घेणे, जाहिराती तत्काळ काढून घेणे आवश्यक आहे. तसेच या क्षेत्रात शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपता करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. १६ जानेवारी २०२६ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.




# मनपा निवडणुकीपूर्वीच भाजपमध्ये नाट्यमय घडामोडी..?

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर :** होऊ घातलेल्या लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीपूर्वीच लातूर भाजपमध्ये अचानक नाट्यमय घडामोडी घडल्या असून निवडणूक प्रमुख पदाची डॉ.अर्चना पाटील चाकूरकर यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी अचानक काढण्यात आल्याने तर्कवितर्कांना एकच उधाण आले आहे. चाकूरकरांच्या कौटुंबिक दुःखाचे कारण पुढे करून निवडणूक प्रक्रियेतून डॉ. अर्चना पाटील चाकूरकरांना जाणीवपूर्वक बाजूला करण्याचे षडयंत्र रचले गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. याचे परिणाम मनपा निवडणुकीत निश्चितच पाहायला मिळतील, असाही कयास लावला जात आहे.

नऊ वर्षांपूर्वी पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत लातूरच्या इतिहासात पहिल्यांदा भारतीय जनता पार्टीने मनपावर ताबा मिळवला होता. त्या विजयाचे श्रेय अर्थातच संभाजी पाटील निलंगेकरांना होते. होऊ घातलेल्या मनपा निवडणुकीतही संभाजी पाटील निलंगेकर यांच्यावर प्रभारीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. ही जबाबदारी आता पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे सोपविली गेली आहे. त्यामुळे डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्याकडे यापूर्वी देण्यात आलेली जबाबदारी निलंगेकर यांच्याकडे दिली गेली आहे. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये करण्यात आलेला हा बदल येणाऱ्या काळातील बदलाची नांदी तर नाही ना? असा अंदाजही राजकीय वर्तुळात लावला जात आहे. डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी अल्पावधीत भाजपमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण करण्यात कमालीचे यश मिळवले आहे. याकामी अर्थातच त्यांना त्यांचे दिवंगत श्वशुर, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्याकडून योग्य मार्गदर्शन मिळाले होते, हे कोणालाही सांगण्याची आवश्यकता नाही. शिवराज पाटील चाकूरकर एक कुशल राजकीय नेता होते. स्वपक्षीयच नव्हे तर विरोधकही त्यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व डोळे झाकून मान्य करत असत, असे ते अजातशत्रू व्यक्तिमत्वाचे धनी होते.





आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसशी एकनिष्ठ राहणाऱ्या चाकूरकरांनी आपल्या स्नुषा डॉ. अर्चना पाटील यांना मात्र त्यांच्या इच्छेनुसार कार्य करण्याची अनुमती दिली होती. त्यामुळेच डॉ.अर्चना पाटील भाजपमध्ये कार्यरत झाल्या.

आपल्या राजकीय जीवनातील पहिली वाहीली विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी लातूर शहर विधानसभा मतदार संघात विद्यमान आमदार अमित देशमुख यांना विजयासाठी शेवटच्या क्षणापर्यंत झुंजवले, हे सगळ्यांनी पाहिले आहे. डॉ. अर्चना पाटील यांच्या रूपाने लातूर जिल्हा तसेच प्रदेश भाजपाला एक कणखर चेहरा मिळाला आहे. त्यातच लातूर भाजपच्या काही नेत्यांवर ते काँग्रेसशी हातमिळवणी करतात, असाही आरोप वर्षानुवर्षे केला जात असल्याचे पाहण्यात आले आहे. या गोष्टींपासून डॉ. अर्चना पाटील कोसो दूर आहेत, ही बाबही भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना ज्ञात असल्यानेच मनपा निवडणुकीसाठी त्यांच्यावर निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी सोपविली गेली होती. शिवराज पाटील चाकूरकर यांचे नुकतेच वार्धक्याने देहावसान झाले. त्यामुळे डॉ. अर्चना पाटील चाकूरकर व त्यांचे कुटुंबीय दुःखाच्या छायेत असणार हे खरे आहे. नेमके याच गोष्टीचा लाभ उठविण्यासाठी भाजपमध्ये खलबते शिजली.

मुळात डॉ. अर्चना पाटील या अतिशय कणखर विचाराच्या आहेत. कितीही नाही म्हटले तरी त्यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांचे राष्ट्रीय पातळीवरील राजकारण, कार्य अतिशय जवळून पाहिले आहे. कोणत्या प्रसंगी कशा पद्धतीने वागले पाहिजे, कार्य केले पाहिजे याची त्यांना उत्कृष्ट जाण आहे. त्यातच डॉ. अर्चना पाटील चाकूरकर या लिंगायत समाजातून येतात. लिंगायत समाजात कुटुंबातील कोणतीही व्यक्ती मयत झाल्यास तिसऱ्या दिवशीच्या विधीनंतर त्या कुटुंबातील व्यक्ती आपल्या नियमित व्यवहारासाठी मोकळे होत असतात. त्याप्रमाणे डॉ. अर्चना पाटील त्यांच्यावर पक्षाने सोपविलेली जबाबदारी निश्चितपणे पार पाडण्यास सक्षम होत्या. मात्र, त्यांना या जबाबदारीपासून बाजूला करण्यासाठी त्यांच्या कौटुंबिक दुःखाचे कारण पुढे केले जाणे संयुक्तिक वाटत नाही. लातुरात नुकत्याच पार पडलेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात स्वतः डॉ.अर्चना पाटील यांनी आपण आपले दुःख बाजूला सारून सार्वजनिक, सामाजिक कार्यात पुढे येणार असल्याचे बोलून दाखवले होते. असे बोलून दाखवतानाच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उदाहरण प्रस्तुत केले होते. नरेंद्र मोदींनी आपल्या जन्मदात्या मातेश्रींचे देहावसान झाल्यानंतर सुद्धा दुखवटा पाळण्यापेक्षा आपल्या कार्याला, कर्तव्याला प्राथमिकता देत अंत्यविधीनंतर कॅबिनेटच्या बैठकीला त्यांनी उपस्थिती लावल्याचे उदाहरण प्रस्तुत करून डॉ. अर्चना पाटील यांनीही आपण शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाचे दुःख बाजूला सारून आपल्या कर्तव्याला प्राधान्य देणार असल्याचेच जणू सूचवले होते. त्यांची पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्ण क्षमतेने, सक्षमतेने पार पाडण्याची तयारी असतानाच हा बदल केला गेल्याबद्दल आश्चर्यही व्यक्त केले जात आहे.

मनपा निवडणुकीपूर्वीच भाजपमध्ये घडलेल्या या नाट्यमय घडामोडीमुळे डॉ.अर्चना पाटील यांचे भाजपमधील वाढते प्रस्थ कोणाच्या तरी डोळ्यांत नक्कीच खुपते आहे की काय? असाही अंदाज लावला जात आहे. भाजपाला हा बदल करण्यास भाग पाडणाऱ्यांनी नेमके भाजपचे हित डोळ्यासमोर ठेवले की काँग्रेसचे? की केवळ स्वतःचा राजकीय स्वार्थ पाहिला? असे एक ना अनेक प्रश्न येणाऱ्या काळात उपस्थित होणार आहे. या प्रश्नांची उत्तरे नजीकच्या काळात नक्कीच नागरिकांसमोर येतील, मात्र तोपर्यंत मनपा निवडणूक पार पडलेली असेल.

## विकासासाठी भाजपाच्या पाठीशी उभे राहा : कव्हेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** लातूर शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी रस्ते, पाणी व नाल्यांची सुविधा



करून नागरिकांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम झालेले आहे. निराधारांच्या पगारी, लाडक्या बहिणीच्या खात्यावर दीड हजाराची मदत अशा सुविधा देऊन महिलांना आधार देण्याचे कार्य महायुती सरकारने केलेले आहे. शहराच्या चौफेर विकासासाठी भाजपा व मित्रपक्षाच्या पाठीशी उभे राहाण्याचे काम करावे, असे आवाहन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते नंदनवन कॉलनी येथील व्यंकटराव नागिमे यांच्या निवासस्थानी आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी या बैठकीला सूर्यकांतराव शेळके, माजी नगरसेवक सुभाषअप्पा सुलगुडले, दिलीप पाटील, बाबासाहेब कोरे, बालाजी शेळके, प्राचार्य डॉ.आर.एस.अवस्थी, प्रभाकर कदम, लालासाहेब पाटील, गोविंद सोदले, विठ्ठलराव इर्ले, दिगंबर शेटे, नितीन कोरे, चांडक, लेनेकर, विजय पाटील, औसेकर, मल्लिकार्जून नळगिरे, प्रभूअप्पा खळगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र लातूरकरांसाठी रेल्वे बोगी कारखाना आणून लातूर जिल्ह्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे या विकासाच्या प्रवाहात कायम राहण्यासाठी भाजपा व मित्रपक्षाला साथ देण्याचे काम आपण करावे, असे आवाहनही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नागिमे परिवाराच्यावतीने माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी या बैठकीला नंदनवन कॉलनी येथील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर हे शहरातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सदैव लढा देण्याचे काम करीत आहेत. त्यांनी गेल्या पाच वर्षामध्ये प्रभाग १८ सह शहरातील अनेक प्रभागांचा चेहरामोहरा बदलण्याचे काम केलेले आहे. शहरातील कुठल्याही नागरिकांचा प्रश्न असेल तर ते पोटतिडकीने मांडून तो प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहतात. त्यांनी यापूर्वी भाजपा युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष व आता भाजपा शहर जिल्हाध्यक्ष पदावर कार्य करीत प्रभाग क्र.१८ चा चौफेर विकास करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे अजित भैय्या कव्हेकर यांचे हात बळकट करण्यासाठी व हिंदूत्वासाठी काम करणार्या तरुणाच्या पाठीशी आपण सक्षमपणे उभे राहावे असे आवाहन चांडक यांनी केले.

## पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे.

त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या काळात धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्गमित करण्यात हे आदेश १६ जानेवारी २०२६ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे लागू राहतील.

## २७५ जणांचे ऐच्छिक रक्तदान



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** येथील जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शासकीय रक्त केंद्राच्या मार्फत एकूण २७५ रक्तपिशव्या संकलित करण्यात यश आले.

जिल्ह्यात रक्ताची कमतरता जाणवत असल्याने जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षामार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अविनाश माणिकराव बारगळ, पोलीस निरीक्षक तथा उपप्राचार्य रफिक रज्जाकमियाँ सय्यद, राखीव पोलीस निरीक्षक तथा बाह्यवर्ग प्रमुख शिवाजी माधवराव पाटील यांचे सहकार्य लाभले.

रक्त केंद्रप्रमुख डॉ. शिवराज कंठीकर, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. रणजित चव्हाण व डॉ. मधुरा मुळे यांच्या टीमने तर मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) सिद्धेश्र्वर चौधरी व नितीन पोतदार यांनी संकलनाची जबाबदारी पार पाडली.

## निवडणुकीत ध्वनिक्षेपक वापरावर निर्बंध लागू

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून ही निवडणूक विना अडथळा व शांततेत पार पडण्यासाठी निवडणुकीच्या काळात ध्वनीक्षेपक वापरावर प्रतिबंध घालण्यात आले आहेत. याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी निर्गमित केला आहे.

कोणत्याही वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून त्याचा वापर फक्त सकाळी ६ वाजलेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत संबंधित पोलीस अधिकारी यांची रीतसर परवानगी घेवूनच करता येईल. फिरत्या वाहनावर ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही, विशिष्ट ठिकाणी थांबूनच ध्वनीक्षेपकाचा वापर करावा. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार किंवा इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील, असे जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

## प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर झेंडे लावण्यास प्रतिबंध

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकीची प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पडावी, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार स्थानिक स्वराज्य मतदारसंघ कार्यक्षेत्रासह या निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या ग्रामीण क्षेत्रात वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबीसाठी निर्बंध घालण्यात आले आहेत.

त्यानुसार फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनावर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुनेच लावण्यात यावा. इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही.

फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधीत पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी, निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर लावता येणार नाही.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या या आदेशानुसार निर्गमित केलेले हे आदेश १६ जानेवारी २०२६ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

## कव्हेकरांच्या हस्ते ब्रम्हकुमारी वर्षा दिदींचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** माऊंट अबू राजस्थान येथील ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या




संचालिका तथा आंतरराष्ट्रीय पातळीवरील मुख्य प्रवक्त्या राजयोगिनी ब्रम्हकुमारी उषा दिदी या लातूर दौर्यावर आल्या असताना त्यांच्या दयानंद सभागृहातील व्याख्यानास उपस्थित राहून त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण बंकटलाल लाहोटी, संस्थेचे सचिव रमेश गोविंदलाल बियाणी, इंदिराताई लाहोटी, मंगलताई बियाणी, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, ब्रम्हकुमारी सेवा केंद्र लातूरच्या संचालिका राजयोगिणी ब्रम्हकुमारी नंदादिदी, दिव्या दिदी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व राजयोगिणी ब्रम्हाकुमारी उषादिदी यांच्यामध्ये देश आणि राज्यातील आध्यात्मिक विषयावर सविस्तर चर्चा झाली.

यावेळी सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय कार्यालयात सभा घेण्यावर निर्बंध

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिता लागू केली आहे. या निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार स्थानिक स्वराज्य मतदारसंघ कार्यक्षेत्रात निवडणूक कालावधीत शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालये, विश्रामगृहे इत्यादी परिसरात मिरवणुका, घोषणा देणे, सभा घेणे इत्यादीवर निर्बंध घातले आहेत.

## ऑफीसर्स कल्ब जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्यान दिवस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** २१ डिसेंबर जागतिक ध्यान दिवसा निमित्त सनराईज योगा स्टुडिओच्या संचालिका नंदिनी पडिले व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मिळून ऑफीसर्स कल्ब जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्यान दिवस साजरा केला. सर्वांनी सूर्योदयापूर्वी एकत्र येऊन सामुहिक सूर्यनमस्कार करत या दिवसाची सुरुवात केली. सनराईज योगा स्टुडिओच्या वत्तीने हा अंतरराष्ट्रीय ध्यान दिवस मागील वर्षापासून साजरा केला जातो.

संयुक्त राष्ट्र महासभेने ६ डिसेंबर २०२४ रोजी सर्वसहमतीने



२१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिवस म्हणून घोषित केला. यावेळी संचालिका नंदिनी पडिले म्हणाल्या अश्या पध्दतीने सामुहीकपणे हा दिवस आम्ही साजरा करत आहोत.या दिवसाचा उद्देश ध्यानाच्या लाभांबद्दल जागरूकता वाढवणे आणि मानसिक शांति आणि समृद्धीला प्रोत्साहन देणे आहे. सनराईज योगा स्टुडिओच्या सर्व सहकाऱ्यांनी सकाळी पहाटे ६.३० वाजता ऑफिसर्स कल्ब जिल्हाधिकारी कार्यालय येथे एकत्र येऊन जागतिक मेडीटेशन डे ध्यान दिवस साजरा केला.

मानसिक शांति, ध्यानामुळे मानसिक शांति आणि स्थिरता प्राप्त होते. नियमित ध्यानामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य पण सुधारते असे नंदिनी पडिले यांनी याप्रसंगी सांगितले.